म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ....आ. चा....
दा. क्र. २८६

२८६

BVBK-0400286

बा. बा
जौ ९१ २८८

लाल
ला. क्र. 21.9 दिनांक
वि. क्र. किशोर 265

म. सं. मं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ...२८६... दिनांक ......
विषय ...किशोर... क्र. . २८६

खुबीदार गोलंदाजी

• • • •

मधु रेगे

• • • •

मूल्य
सहा रुपये

• • • •

BVBK-0400286

इनामदार बंधु प्रकाशन, पुणे.

इनामदार बंधु
प्रकाशन

प्रकाशन ८४ वे

●

© मधु रेगे

●

प्रथमावृत्ती
विजयादशमी, १० ऑक्टोबर १९७०

●

सजावट
अनंत सालकर

●

प्रकाशक
बा. शा. इनामदार
इनामदार बंधु प्रकाशन
६३७ (नवा) सदाशिव, पुणे ३०

●

मुद्रक
सुजित पटवर्धन,
संगम प्रेस लि.,
१७ ब, कोथरूड, पुणे ४

गुरुवर्य

प्रा. दि. ब. देवधर

यांस

कृतज्ञतापर्वक

आभार

माझ्या ' शैलीदार फलंदाजी ' या पुस्तकास राज्यसरकारने विशेष पारितोषक देऊन गौरव केला. तसेच छोटचा क्रिकेटपटूंनीही त्या पुस्तकाचे मःनपूर्वक स्वागत केले. परंतु त्याचबरोबर गोलंदाजीवरील पुस्तकाची त्यांना गरज भासू लागली. त्यामुळे ' खुबीदार गोलंदाजी ' या पुस्तकाचा जन्म झाला.

हे पुस्तक लिहिण्यास मला ज्या ज्या मित्रांनी उत्स्फूर्त केले त्या सर्वांचा मी अभारी आहे.

माझ्या काही शिक्षकांनी व मित्रांनी हे पुस्तक लिहिण्यास मला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हरऱ्हेचे सहाय्य केले. त्याबद्दल त्या सर्वांचा मी ऋणी अ

प्रकाशक श्री. बाबूराव इनामदार आणि चित्रकार श्री. अनंत सालकर यांनी मन लावून व मेहनत घेऊन हे पुस्तक मूर्त स्वरूपाला आणले, त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक अभार मानतो.

श्री शिवाजी प्रिपेरेटरी
मिलिटरी स्कूल,
शिवाजीनगर, पुणे ५.

मधुसूदन रामचंद्र रेगे

क्रिकेटची व्याख्या

क्रिकेट हे एक गहन शास्त्र आहे. समर्पित भावनेने अगदी उभी हयात या शास्त्राचे अध्ययन करण्यात व्यतीत करावयाची म्हटले तरी या शास्त्राचा पार लागणे कठीण! उलट स्वत:वर 'नेति नेति' म्हणत निवृत्त होण्याची पाळी मात्र येण्याची शक्यता अधिक!

क्रिकेट हे एक देदीप्यमान द्वंद्व किंवा समरप्रसंगच आहे. या युद्धात कस लागतो तो मनस्वीपणा, व्यूहरचनेतील व्यासंग, कौशल्य, मनोधैर्य इत्यादी नेतृत्वाला आवश्यक असणाऱ्या गुणांचा!

ह्या खेळात परीक्षा होते मनाच्या समतोलपणाची, पणाला लागतो मान आणि अग्निपरीक्षेत उजळून निघतात मानवाचे स्वभावविशेष! क्रिकेटमध्ये माणूसकीची नि सभ्यतेची पारख होते.

क्रिकेट म्हणजे ईश्वरनिर्मित विश्वात मुक्तसंचार, निसर्गाच्या नजीक जाण्याची आणि मनाची कोळिष्टके झाडून टाकून थकल्या-भागल्या अवयवांना संजीवन देणारा मोकळ्या हवेतील तो व्यायाम आहे. क्रिकेट हा काळजीवर उतारा आहे आणि चिंतेवरील गुणकारी मात्रा आहे.

मित्रत्व आणि सहचारित्व यांचा सुरेख संगम क्रिकेटमध्ये होतो. समाजात सहज मिसळून सहिष्णुता नि सौहार्द दाखविण्याची आणि प्रतिपक्षाविषयी उदार भावना व्यक्तविण्याची संधीही यामध्ये आहे. थोडक्यात सांगावयाचे तर शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक जोमाचा विकास करणारा क्रिकेट हा एक खेळ आहे.

सर फ्रेड्रिक टून

क्रिकेटबद्दल मला काय वाटते ?

स्वत:पुरते बोलायचे झाले तर माझ्या हातात फारच थोडी कलाकुसर होती. परंतु जीवनाच्या संध्यासमयी आपल्या हातातले अल्पस्वल्प कौशल्य लोपले तरीही क्रिकेट पाहणारी आणि वाचणारी दृष्टी आणि जुन्या स्मृती मनाला विरंगुळा देतात. शिवाय मनामध्ये चैतन्य निर्माण करू शकते ती केवळ कल्पकता. क्रिकेटचा खेळ हा सर्व खेळांत अतिशय सुसंस्कृत आहे तो याच विशेषधर्मामुळे !

क्रिकेटचे सर्वांगपरिपूर्ण ज्ञान असणारा प्रेक्षक क्रिकेटविषयी अधिक चिंतनशील बनतो आणि त्याकडे तत्त्ववेत्त्याच्या तौलनिक दृष्टीकोनातून पाहू शकतो. प्रत्येक खेळाडूत मुरलेल्या कलागुणांचे तो निरीक्षण करतो आणि त्याचे रसग्रहणही तो तितक्याच आत्मीयतेने करू शकतो. फार काय शेजाऱ्याशी क्रिकेटसंबंधी बोलताना तो स्नेहभावाने रसपूर्ण चर्चाही करू शकतो. त्या प्रेक्षकाला निरीक्षण करण्याबरोबर विचार समाधी लावण्यासाठी भरपूर वेळ आणि वावही असतो. मग गतकाळातील वैभव - स्मृतींची तो जुळणी करतो आणि त्या वैभवसंपन्न कतृत्वाची कोण वाटचाल करीत असेल तर त्याकडेही त्याचे डोळे लागलेले असतात. खेळातील सूक्ष्म छटांचीही त्याला सहज जाणीव होते. फलंदाजाचा सुवर्णगुणसंपन्न शैलीदारपणा, गोलंदाजाचा वेग किंवा कावेबाज कुशलता, सर्वस्व पणाला लावणारे यष्टिरक्षकाचे कसब आणि क्षेत्ररक्षकाचे चापल्य आणि अनुमानशक्ती या खेळातील सगळ्या अंगोपांगांच्या बारकाव्यांची आणि सौंदर्याची त्यास आपोआपच जाण येते.

सर रॉबर्ट मेन्झिस्

अनुक्रम

१. छोटा गोलंदाज ... ९

सरावाचे पहिले वर्ष

२. जाळ्यातील सरावास सुरुवात ... ११
३. गोलंदाजीची पद्धत ... १४
४. गोलंदाजाची महत्त्वाकांक्षा व कौशल्य ... २७
५. चेंडूचा टप्पा ... ३०

सरावाचे दुसरे वर्ष

६. स्वर्व्ह आणि स्विंग् ... ३४
७. कटर्स् ... ४८
८. ऑफ्ब्रेक ... ५१
९. लेग्स्पिन् किंवा लेग्ब्रेक ... ६१

सरावाचे तिसरे वर्ष

१०. टॉपस्पिन् व गुगली ... ६९
११. विविध चेंडू ... ७९
१२. चेंडूचा हवेतील मार्ग, उंची व गती ... ८२
१३. डावखुरे गोलंदाज ... ९४
१४. खेळपट्टीची मदत ... १००
१५. फलंदाजीतील दोष हेरणे ... १०४

सरावाचे चौथे वर्ष

१६. द्रुतगती गोलंदाजी ... ११६
१७. उपयुक्त सूचना ... ११९
१८. फलंदाजाचे स्वभावदोष ... १२३
१९. काही जागतिक विक्रम ... १३३



१

छोटा गोलंदाज

छोटया मित्रांनो, पाच तास शाळेत अभ्यास करून घरी परतल्यावर मैदानावर लगेच जाण्याची तुम्ही घाई करता. आई पेरू कापून देण्यास तयार असली तरीही पेरूच्या फोडी खाण्यास तुम्हांला वेळ नसतो. परंतु त्याच वेळी बाबांनी तुमच्याकडे पेरू फेकला तर तुम्ही तो कसा कौशल्याने झेलता ! आणि तुमची कळी कशी चटकन खुलते ! तुमच्यातला क्रिकेटपटू कसा एकदम जागा होतो ! तो पेरू म्हणजे क्रिकेटचा चेंडूच ! तो तुम्ही हातातल्या हातात फिरवून पाहता आणि थोडीशी धाव घेऊन फलंदाजाची कशी एकदम दांडी उडवता !

होय, विसरलोच की मी, तुम्हांला मैदानावर जायचे आहे. चला, आज मी पण तुमच्याबरोबर मैदानावर येतो. थोडयाशा गप्पाही मारता येतील आणि मैदानावर तुमचा खेळही पाहता येईल. मित्रांनो, तुमचा आवडता गोलंदाज कोणता ? तो गतिमान गोलंदाज आहे की फिरकी गोलंदाज आहे ? भारत संघाकडून गोलंदाज म्हणून तुम्हांला खेळावेसे वाटते का ? होय ना ? मग भारत संघाचे द्रुतगती का मंदगती फिरकी गोलंदाज व्हावेसे वाटते तुम्हांला ? अजून ते ठरले नाही, होय ? बरोबर आहे. ते पुढे कधीतरी ठरविता येईल. परंतु भारताचा गोलंदाज होण्याची मनीषा मनात ठेवून गोलंदाजी करा. हीच का तुमची खेळपट्टी ? आता मी पाहतो तुम्ही गोलंदाजी कशी करता ते. तुमचा खेळ झाला की मग आपण पुन्हा बोलू या.

× × ×

सरावानंतर

वा! फारच मजेचा झाला की तुमचा खेळ! याने झेल तर चांगलाच पकडला. पंचाने त्याला अगदी चटकन पायचीत दिला हं! याने आपली बॅट तर स्टंप्स्नाच मारली आणि त्याच्या बॅटीला चेंडू चाटून जाऊन तो स्टंप्स्वर आदळला. तू तर दोघांच्या दांड्याच उडवल्यास! दांडी उडवायला कोणता चेंडू टाकला होतास? आठवत नाही, की माहीत नाही? बरे, ठीक आहे. घेऊ आपण पुढे कधीतरी समजावून. सध्या तुम्हांला आवडेल तशी गोलंदाजी टाका. चारसहा पावले धावत जाऊन चेंडू फेका. मात्र तो चेंडू स्टंप्स्च्या रेषेत टाका. कारण चेंडू स्टंप्स्च्या रेषेत पडला तरच दांडी उडेल! परंतु तुम्ही चेंडूचा टप्पा कोठे टाकणार? नको, विचारच नको त्याचा आज. प्रत्येक चेंडू स्टंप्स्मध्ये टाका म्हणजे झाले.

आजच्या या तुमच्या खेळपट्टीवर फारच खड्डे आहेत. खड्डे बाजूला करून ही खेळपट्टी थोडीशी साफ केली तर गोलंदाजी करायला आणखीनच मजा येईल. तुमचा टेनिसचा चेंडू वेडावाकडा उडणार नाही आणि काही दिवसांनी कातड्याच्या लालभडक क्रिकेट चेंडूनेसुद्धा तुम्हांला येथे खेळता येईल. ती पाहा मुले, क्रिकेटच्या चेंडूने जाळ्यात सराव करीत आहेत. तुम्ही आता पाचवी-सहावीत आहात. आज खेळत होतात तसे मनापासून आणि हिरीरीने खेळत राहिलात तर दोनतीन वर्षांतच तुम्हांला त्या शालेय संघाच्या जाळ्यात सराव करण्याची संधी मिळविता येईल.



२

जाळ्यातील सरावास सुरुवात

गेली दोनतीन वर्षे मैदानावर स्टंप्स् रोवून तुम्ही खेळत होतात. यंदा मिळविलीत की तुम्ही जाळ्यात सराव करायची संधी ! आता तुम्हांला क्रिकेटचे बूट घालून खेळायची सवय करावयास हवी. सरावाच्या वेळी अर्धी चड्डी घातली तरी चालेल. परंतु सदरा मात्र चड्डीत व्यवस्थेशीर खोवलेला असला पाहिजे. तसेच सदऱ्याच्या बाह्यांची घडी कोपराच्या वर एक-दोन इंच नीटनेटकी बसवायला हवी. नाहीतर चेंडू टाकताना हात अडखळेल.

प्रथम काही दिवस तुम्हांला पाहिजे तेव्हा गोलंदाजी करायला मिळेलच असे नाही. तुम्ही नवीन आहात, नवशिके आहात. तुमची गोलंदाजी खेळण्यास फलंदाजास कदाचित मजा वाटणार नाही. परंतु गोलंदाजी मिळाली नाही म्हणून तुम्ही नाउमेद होऊ नका. धीर धरा आणि संधीची वाट पाहत राहा. पण जर तुमच्या हाती चेंडू दिलाच तर मात्र मी देतो त्या सूचनांचा विचार करा.

(१) फलंदाज खेळावयास तयार आहे हे पाहूनच त्यास चेंडू टाकण्यास सुरुवात करा.

(२) एखादा गोलंदाज लांबून धावत येऊन चेंडू टाकतो. त्याने धाव सुरू केलेली पाहिली नसल्यामुळे तुम्ही मध्येच चेंडू टाकण्यासाठी आपली धाव सुरू करून त्या मागून धावत येणाऱ्या गोलंदाजाचा मार्ग रोखण्याची शक्यता आहे. असा अचानक मार्ग रोखल्यामुळे त्या गोलं-

दाजास काय वाटेल याची कल्पना करा. तेव्हा चेंडू टाकण्यासाठी धाव घेण्यापूर्वी मागे वळून पाहावे व इतर गोलंदाजाने धाव घेतलेली नाही याची खात्री करून मगच स्वत: गोलंदाजी करण्यास सुरुवात करावी.

(३) स्टंप्स्च्या रेषेत आणि फलंदाजाच्या पुढे चारपाच फूट चेंडूचा टप्पा टाका.

(४) फलंदाजाने चेंडू टाकल्यावर खेळपट्टीच्या थोडे बाहेर यावे. टाकलेला चेंडू यष्टिरक्षकाकडून परत घेण्यासाठी तुम्ही खेळपट्टीवर थांबलात तर दुसऱ्या गोलंदाजास चेंडू टाकता येणार नाही.

(५) फलंदाजाने तडकावलेला तुमचा चेंडू क्षेत्ररक्षक अडवून तुमच्याकडे टाकण्यास सिद्ध होतो. त्या वेळी गोलंदाजी करण्याच्या जागेपासून थोडेसे दूर जाऊन क्षेत्ररक्षकाने टाकलेला चेंडू घ्यावा. नाहीतर, क्षेत्ररक्षकाने टाकलेला चेंडू इतरांच्या गोलंदाजीत अडथळा आणण्याचा संभव असतो.

(६) नेहमी व विशेषत: क्षेत्ररक्षकाने टाकलेला चेंडू घेताना फलंदाजाच्या फटक्याकडे लक्ष ठेवावे. क्षेत्ररक्षकाने टाकलेला चेंडू आणि फलंदाजाने टोलविलेला चेंडू हे दोन्ही एकाच वेळी तुमच्याकडे आले तर साहजिकच तुमची तिरपीट उडेल. परंतु दोन्हींपैकी एकाच चेंडूकडे लक्ष दिले तर दुसऱ्या चेंडूचा मार बसेल. म्हणून शक्य तो फलंदाज फटका मारीत असताना क्षेत्ररक्षकाने गोलंदाजाकडे चेंडू टाकू नये आणि गोलंदाजानेही क्षेत्ररक्षकास त्याप्रमाणे खूण करावी.

सर्व फलंदाजांचा सराव संपल्यावर रोज थोडा वेळ तरी फक्त गोलंदाजीचा सराव करावा. स्टंप्स्च्या पुढे आठ-दहा फुटांवर खडूने एक चक्र काढावे, किंवा तेथे रुमाल किंवा एक स्टंप् ठेवावी आणि त्या खुणेवर लक्ष देऊन रोज पंधरा-वीस तरी चेंडू टाकावेत.

सरावाने मन तृप्त झाले तरच तो खरा सराव. परंतु सरावाने समाधान वाटो वा ना वाटो, सराव झाल्यानंतर तुमची इतर कर्तव्ये पार पाडण्यासाठी तुमचे मन वळले पाहिजे. सरावानंतर इतरत्र वेळ न दवडता घरी जाऊन तास दीड तास अभ्यास केलात तर तुमच्या आईवडिलांना व शिक्षकांना तुमचा अभिमान वाटेल. शिवाय अभ्यास व



क्षेत्ररचनेतील जागा

इतर कर्तव्ये टाळून केवळ क्रिकेट खेळण्यामुळे तुमचा फायदा ोणार नाही. उलट अभ्यासू वृत्ती आणि विचारशक्ती यांमुळे उत्तम गोलंदाज म्हणून नाव कमविणे तुम्हांला शक्य होईल.

साधारणपणे एक महिन्याने तुम्ही जाळ्यातील सरावात रुळल्यानंतर मी तुम्हांस एके दिवशी तुमची गोलंदाजीची पद्धत कशी असावी हे सविस्त समजावून सांगेन.



३

गोलंदाजीची पद्धत

छोट्या मित्रांनो, आता तुमचे चेंडू फारसे वेडेवाकडे पडत नाहीत. याचे कारण माहीत आहे का तुम्हांला ? गेला महिनाभर तुम्ही अगदी एकाग्र मनाने जाळ्यामध्ये गोलंदाजी करीत आहात. म्हणूनच तुमच्या गोलंदाजीत समाधानकारक प्रगती दिसते. पण लक्षात ठेवा ही तुमच्या गोलंदाजीतील प्रगतीची सुरुवात आहे.

अजून गोलंदाज म्हणून तुम्हांस नाव कमवायचे आहे. पुढील काही वर्षे तुम्ही क्रिकेट खेळणार आहात आणि गोलंदाजी करणार आहात. या काळात तुम्हांला हजारो चेंडू टाकावे लागतील. प्रत्येक चेंडू टाकताना तुमच्या शरीरातील नसानसांतून रक्त तर उसळेलच, परंतु तो टाकल्या-वर आनंदाच्या लहरीही उठल्या पाहिजेत. आनंदाचे क्षण वेचण्यासाठी तुमच्या गोलंदाजीची पद्धत निर्दोष आहे याची तुम्हांला आताच खात्री करून घेतली पाहिजे.

गोलंदाजी करण्याच्या पद्धतीचे तीन भाग करता येतील : (१) गोलंदाजाची धाव, (२) चेंडू टाकताना शरीराची हालचाल व (३) चेंडू टाकल्यानंतरची शरीराची हालचाल (फॉलो थ्रू). या तीन भागांचे वर्णन करून नंतर तुमच्या गोलंदाजीच्या पद्धतीत आवश्यक ती सुधारणा घडवून आणू या.

तुम्ही उजव्या हाताने गोलंदाजी करता असे गृहीत धरून मी आता गोलंदाजी करण्याच्या पद्धतीच्या तीन भागांचे सविस्तर वर्णन करतो.

वरील पद्धतीने तालबद्ध धाव घेतल्यामुळे गोलंदाज स्टंप्स्जवळ येई-पर्यंत त्याच्या शरीराला व हाताला जास्तीत जास्त गतिवेग मिळेल व त्यास इच्छित टप्प्यावर प्रभावी चेंडू टाकणे सुलभ जाईल. असे अनेक चेंडू तो सहजतेने टाकू शकेल.

(२) चेंडू टाकताना शरीराची हालचाल

चेंडू टाकण्यापूर्वी व, टाकताना गोलंदाजास शरीरावर ताबा ठेवून, शरीर समतोल ठेवून सहजगत्या बोटे, मनगट, हात, खांदे, पाय व शरीराचे इतर अवयव यांचे एकमेकांस अधिकाधिक मदत करणारे कार्य साधता आले पाहिजे.

उजव्या हाताचा गोलंदाज धाव घेऊन स्टंप्स्जवळ आल्यापासून ते चेंडू टाकीपर्यंत त्याच्या शरीराची जी हालचाल होते तिचे खालील चार भाग करता येतील :

(अ) डाव्या पायावरची उडी,

(आ) उजवा पाय टेकल्यावर,

(इ) डावा पाय टेकताना व

(ई) चेंडू टाकताना.

(अ) डाव्या पायावरची उडी

चेंडू प्रत्यक्ष हातातून सोडताना डावा पाय पुढे व उजवा पाय मागे असतो. हेच चेंडू टाकण्याच्या वेळचे पाऊल. या पूर्वीचे पाऊल डाव्या पायाने सुरू होते. डाव्या पायावर उडी घेऊन गोलंदाज उजवा पाय जमिनीवर टेकवितो.

ही उडी घेतल्यावर, शरीर हवेत असताना, गोलंदाजाचा डावा खांदा फलंदाजाच्या बाजूस, छाती मिड्ऑन्कडे किंवा शरीर उजव्या बाजूस वळण्यास सुरुवात होते, डावा हात वर आकाशाकडे जाऊ लागतो आणि चेंडू पकडलेला उजवा हात, कोपरात वाकून, तोंडाच्या, गळ्याच्या किंवा छातीच्या समोर येतो. या वेळी स्प्रिंग्प्रमाणे हात, पाय व शरीर एकत्र येतात.

डाव्या पायावरून उडी घेतल्यानंतर

डाव्या पायावरून उडी घेतल्यावर खांदा फलंदाजाकडे व छाती मिड्ऑन्कडे वळली आहे. डावा हात वर सरळ होऊन उजवा पाय टेकण्याच्या बेतात आहे.

(आ) उजवा पाय टेकल्यावर

डाव्या पायावर उडी घेऊन उजवा पाय जमिनीवर टेकण्यापूर्वी उजवा खांदा मागे कललेला असला म्हणजे उजवा पाय जमिनीवर टेकल्यावर कमरेवरील शरीर मागे झुकते व पाठ किंचित आत वाकते किंवा कमानदार होते. यामुळे टेकलेल्या उजव्या पायावर शरीराचा सर्व भार राहून उजव्या पायाने जमीन घट्ट पकडली जाते.

उजवा पाय स्टंप्स्च्या आसपास पॉपिंग् क्रीझ्ला समांतर पडणे आवश्यक आहे किंवा उजवा पाय टेकल्यावर त्याची बोटे मिड्ऑन्च्या बाजूस रोखली गेली पाहिजेत. यामुळे साहजिकच डावा खांदा फलंदाजाकडे रोखला जाईल, छाती मिड्ऑन्च्या बाजूस वळेल किंवा शरीर संपूर्णपणे उजव्या बाजूस फिरेल.

डावा हात कोपरात विशेष न वाकविता वर करून गोलंदाजाने डाव्या खांद्यावरून चेंडू टाकावयाच्या टप्प्याकडे पाहावे. डावा हात वर जातानाच उजवा हात छातीकडून खाली उजव्या मांडीच्या बाजूस फिरतो.

शरीराचे वजन उजव्या पायावर असताना कमरेवरील शरीर मागे झुकल्यामुळे व डावा हात सरळ व उंच केल्यामुळे उजवा खांदा मागे खाली पडतो आणि डावा खांदा पुढे उंचावतो. या वेळी डावा पायही शक्य तो वर यावयास हवा.

(इ) डावा पाय टेकताना

डावा पाय जमिनीवर टेकताना प्रथम उजव्या पायावर मागे झुकलेले शरीर सरळ होते, मग डावा पाय, डावा कटिप्रदेश, डावा हात व डावा खांदा यांच्या नेतृत्वाखाली शरीर पुढे झुकते आणि डावे पाऊल जमिनीवर टेकले जाते.

डावा पाय जमिनीवर टेकताना त्या पायाची बोटे लाँग्लेग्कडे रोखलेली असावीत. शिवाय डावा पाय उजव्या पायाच्या रेषेतच जमिनीवर टेकवावा. तो फारसा डाव्या किंवा उजव्या बाजूस किंवा ऑफ्च्या किंवा ऑन्च्या बाजूस टाकू नये. यामुळे डावा खांदा व डावा कटिप्रदेश फलंदाजाकडे जास्तीत जास्त वेळ रोखला जातो.

उजवा पाय टेकल्यानंतर

उजवा पाय पॉपिंग् क्रीझ्ला समांतर पडला आहे. त्याची बोटे मिड्ऑन्कडे रोखली आहेत. डाव्या खांद्यावरून चेंडू टाकावयाच्या टप्प्यावर नजर खिळली आहे. कमरेवरील शरीर मागे झुकले आहे. डावा खांदा उंचावला आहे. डावा पाय अगदी वर उचलला आहे. शिवाय शरीराचा तोल उत्कृष्टपणे सांभाळला आहे.

या चेंडू टाकण्याच्या पावलांतील अंतर किंवा उजव्या व डाव्या पायांतील अंतर किती असावे हे गोलंदाजाचे शरीर व उंची यांवर

डावा पाय टेकताना

डावा पाय उजव्या पायाच्या रेषेतच जमिनीवर टेकणार आहे. डावा हात खाली फेकून उजवा हात वर येताना शरीर पुढे झुकण्याच्या बेतात आहे. अद्यापि डावा खांदा फलंदाजाकडे व छाती मिड्ऑन्‌कडे रोखलेली आहे.

अवलंबून राहील. छोटे पाऊल टाकल्यास गोलंदाजास आपल्या शारीरिक सामर्थ्याचा संपूर्ण उपयोग करता येणार नाही. फार मोठे पाऊल टाकल्यास शरीराचा तोल जाऊन गोलंदाजास आपल्या उंचीचा फायदा करून घेता येणार नाही.

डावा पाय जमिनीवर टेकतानाच वर गेलेला डावा हात फलंदाजाच्या रोखाने खाली फेकला जातो आणि उजवा हात मांडीजवळून वर फिरण्यास सुरुवात होते. आता डावा व उजवा हात साधारणपणे एकाच रेषेत येतात.

या वेळी डोके स्थिर ठेवून खांद्यावरून चेंडू टाकावयाच्या टप्प्याकडे एकाग्रतेने पाहून चेंडू टाकण्यास सिद्ध व्हावे.

(ई) चेंडू टाकताना

डावा पाय जमिनीवर टेकल्यावर शरीराची डावी बाजू त्या पायावर भक्कम रोवली पाहिजे.

चेंडू हातातून सोडताना

शरीराची डावी बाजू डाव्या पायावर भक्कम रोवली आहे. छाती फलंदाजाकडे रोखलेली आहे. खांदा ९०° फिरला आहे. उजवा हात शिरोबिंदूकडे पोहोचला आहे. डाव्या पायावर शरीराचे वजन आल्यामुळे उजवा पाय गुडघ्यात वाकला आहे.

याच वेळी डावा हात खाली डाव्या मांडीच्या बाजूस नेऊन चेंडू टाकण्यास उजवा हात वर येतो. डावा हात जितक्या कार्यक्षमतेने व वेगाने खाली येईल तितक्याच गतीने उजवा हात वर फिरेल. उजव्या हाताच्या फिरण्यास उजवी पाठ, उजवा कटिप्रदेश वगैरे शरीराच्या उजव्या बाजूच्या अवयवांची मदत झाली पाहिजे. तसेच उजवा हात मांडीपासून वर अर्धवर्तुळ फिरताना तो कोपरात अजिबात वाकवू नये.

चेंडू टाकताना उजवा खांदा, उजवा कटिप्रदेश व उजवा घोटा उजव्या बाजूस फिरल्यावर उजवा खांदा साधारणपणे नव्वद अंशांपेक्षा अधिक फिरतो व फिरला पाहिजे.

उजव्या पायावरील शरीराचा भार डाव्या पायावर संपूर्णपणे येऊन उजवा पाय नाममात्र जमिनीवर टेकलेला असताना, उजवा हात काना-जवळून शिरोबिंदूकडे पोहोचलेला असताना व छाती गोलंदाजाकडे रोखली गेली असताना चेंडू हातातून सुटावयास पाहिजे.

(३) चेंडू टाकल्यानंतरची हालचाल

चेंडू टाकल्यानंतर गोलंदाजाच्या शरीराची जी हालचाल होते तीस इंग्रजीत 'फॉलो थ्रू' असे म्हणतात. गोलंदाजाची धाव, चेंडू टाकणे व फॉलो थ्रू एकमेकांत गुंतलेली व एकमेकांवर अवलंबून असलेली गोलंदाजाची एकच कृती आहे, शरीराच्या निरनिराळ्या अवयवांचे प्रभावी चेंडू टाकण्यास एकमेकांना मदत करणारे एकच कार्य आहे.

उजव्या हातातून चेंडू सुटल्यानंतर डावा हात डाव्या मांडीजवळून मागे वर जातो. उजवा हात, तोंडाच्या उजव्या बाजूकडून, डाव्या

फॉलो थ्रू

डावा हात मागे वर गेला आहे आणि उजवा हात डाव्या हातामागून वर जात आहे. उजवा पाय गुडघ्यात वाकून डाव्या पायाच्या पुढे आला आहे. उजवा खांदा फलंदाजाकडे व छाती मिड्ऑफ्कडे वळली आहे. मोकळेपणाने फॉलो थ्रू घेण्यास सुरुवात झाली आहे. लक्ष चेंडूकडे आहे.

हाताच्या मागोमाग डाव्या मांडीपर्यंत फिरतो. उजवा खांदा फलंदाजा-कडे रोखला जातो.

डाव्या पायावर शरीराचे सर्व वजन आल्यामुळे उजवा पाय ढिला पडून गुडघ्यात वाकतो आणि तो डाव्या पायाच्या पुढे जाण्यास तयार होतो.

डोके सरळ व स्थिर ठेवून आपण ठरविलेला टप्पा आणि चेंडू यांकडे दृष्टी खिळून राहावयास पाहिजे.

जोराने 'पॅड्ल्' मारल्यानंतर सायकल वेगाने चालते. 'पॅड्ल' मारणे थांबविले तरी सायकल चालूच राहते. काही वेळाने ती आपोआप थांबते. त्याप्रमाणे चेंडू टाकल्यानंतर आपले शरीर मोकळेपणाने पुढे जाऊ द्यावे. काही पावले पुढे गेल्यावर शरीर आपोआप थांबेल.

चेंडू टाकल्यावर डाव्या पायावरून शरीराचे वजन पुढे झुकले म्हणजे आपोआपच उजवा पाय डाव्या पायाच्या पुढे जाऊन जमिनीवर टेकतो. या वेळी गोलंदाजाने एकदम डावीकडे वळू नये. कारण त्यामुळे फॉलो थ्रू-मध्ये अडथळा येईल. तसेच खेळपट्टीवर सरळ धावू नये. कारण खेळपट्टी बुटांच्या खिळ्यांनी खडबडीत होईल. म्हणून चेंडू टाकल्यावर गोलंदाजाने हळुहळू खेळपट्टीबाहेर म्हणजे आपल्या डाव्या बाजूस वळावे.

चेंडू टाकून खेळपट्टीबाहेर डाव्या बाजूस वळतानासुद्धा गोलंदाजाची दृष्टी चेंडूकडेच हवी आणि फलंदाजाने मारलेला झेल पकडण्यास किंवा चेंडू अडविण्यास गोलंदाजाने टपून राहावयास हवे.

प्रात्यक्षिक

छोट्या मित्रांनो, सुलभ, सुरळीत, तालबद्ध, मोकळी, सहज आणि शरीराचे निरनिराळे अवयव एकमेकांना मदत करणारे कार्य साधतील अशी गोलंदाजीची पद्धत तुम्हांस जमते का पाहू या. घ्या चेंडू.

किती पावले धावणार ते प्रथम ठरवा. धाव फार लांब नको, छोटी पण नको, पावले मोजून खूण करा. चेंडू कोठे टाकायचा ते ठरवा. चेंडू बोटात धरा, डावा पाय व उजवा हात पुढे नेऊन हळुहळू धावण्यास सुरुवात करा. सरळ धावायचे आहे. शरीर पुढे झुकवा. स्नायू सैल सोडा. चेंडूच्या टप्प्याकडे लक्ष द्या. वेग वाढवा, आणखी वेग वाढवा.

स्टंप्स्‌जवळ आलात. डाव्या पायावर उडी घ्या. शरीर उजव्या बाजूस वळवा. खांदा फलंदाजाकडे रोखा. डावा हात वर न्या. उजवा हात वाकवून तोंडाजवळ आणा. शरीर स्प्रिंग्‌प्रमाणे आकसून घ्या. कमरेवरील शरीर मागे झुकवा, उजवा पाय जमिनीवर टेकत आहे. त्या पायाची बोटे मिड्‌ऑनकडे करा. डावा पाय वर करा. डावा हात उंच करा. चेंडूच्या टप्प्याकडे खांद्यावरून पाहा. उजवा हात खाली उजव्या मांडीच्या बाजूस फिरवा. आता डावा पाय टेकवायचा आहे. डावा पाय फार लांब किंवा फार जवळ टाकू नका. मागे झुकलेले शरीर सरळ करा. आता डावा पाय टेकला. त्या पायाची बोटे लाँग्‌लेग्‌ला रोखा. डावा हात खाली फेका. चेंडूच्या टप्प्याकडे पाहा. उजव्या पायावरचे वजन डाव्या पायावर बदला. उजवा गुडघा व उजवा घोटा उजव्या बाजूस फिरवा. डावा हात खाली व उजवा हात कानाजवळून कोपरात न वाकविता वर आणा. चेंडू सोडा. डावा हात मागे वर न्या. त्याच्या मागोमाग उजवा हात डाव्या मांडीकडे फिरवा. उजवा पाय वाकवून पुढे आणा. मोकळेपणाने शरीर पुढे जाऊ द्या. हळुहळू डाव्या बाजूस वळा.

सर्व ठीक झाले. परंतु हा 'नो बॉल' होता ! अजून एक पाऊल धाव मागून सुरू करा.

नेहमी या पद्धतीप्रमाणे चेंडू टाकावेत. रोज दोनचार वेळा तरी आपली नुसती धाव आणि फक्त चेंडू टाकण्याचे पाऊल यांची पद्धत स्वतंत्रपणे करून पाहावी. अशा सरावाने गोलंदाजीच्या पद्धतीत हळुहळू तालबद्धता येईल.

असे करू नका

(१) जितकी लांब धाव असेल तितका चेंडू वेगाने जाईल ही कल्पना चुकीची आहे. फार लांब धाव घेतल्याने जास्तीत जास्त गतिवेग संपून गेल्यावर चेंडू पडेल, म्हणून फार लांब धाव घेऊ नका.

(२) चेंडू कसा व कोठे टाकावयाचा ते ठरविण्यास विसरू नका. विसरलात तर हेतुपुरस्सर व योजनापूर्वक गोलंदाजी होणार नाही आणि चेंडू कसाही आणि कोठेही पडेल.

(३) धाव कोणत्या पायाने सुरू करावयाची हे माहीत नसल्यास

काही वेळा धाव सुरू करताना घोटाळा होईल.

(४) नागमोडी धाव घेऊ नका. धावताना थबकू नका.

(५) सुरवातीपासून जोराने धाव घेऊ नका.

(६) दात ओठ खाऊन, स्नायू आखडून किंवा ताठ करून चेंडू टाकू नका. सहजतेने व मोकळी धाव झाली नाही तर परिणामकारक चेंडू पडणार नाही.

(७) शरीर तिरके करून किंवा डावा खांदा साधारणपणे फलंदाजाकडे रोखून धावू नका. अशाने धावेला वेग येणार नाही. म्हणून डाव्या पायावरची उडी घेईपर्यंत छाती फलंदाजाकडे रोखावी. तसेच उडी घेणाऱ्या डाव्या पायाची बोटे फलंदाजाच्या बाजूस रोखावीत.

(८) चेंडू टाकण्याच्या वेळी उजवा पाय टेकताना त्याची बोटे मिड्-ऑन्कडे रोखण्यास विसरू नका. ती बोटे मिड्विकेट, लेग्स्लिप्स् किंवा फलंदाजाकडे रोखली तर डाव्या पायावर शरीराचे वजन येण्यापूर्वीच डावा

चेंडूचा टप्पा पाहताना

चेंडू टाकावयाच्या टप्प्याकडे खांद्यावरून पाहावे, काखेच्या बाजूने पाहू नये.

खांदा व कटिप्रदेश डावीकडे वळून छाती फलंदाजाकडे रोखली जाईल आणि फक्त हात फिरवूनच चेंडू टाकला जाईल किंवा हात फिरविण्यास

शरीराच्या इतर अवयवांची मदत मिळणार नाही. म्हणजे आतापर्यंत शरीरास मिळवलेला गतिवेग निरुपयोगी होईल आणि शरीराचा तोल डावीकडे जाऊन प्रभावी व अचूक चेंडू पडणार नाही.

(९) वरील कारणामुळेच चेंडू टाकावयाच्या टप्प्याकडे डाव्या खांद्यावरून पाहा. डाव्या हाताच्या उजव्या बाजूने किंवा काखेच्या बाजूने पाहू नका. तसेच चेंडू टाकताना डावा पाय उजव्या पायाच्या समोर टाका, डावीकडे टाकू नका.

(१०) उजवा पाय टेकल्यावर डावा हात उंच व सरळ न्या. तो कोपरात वाकवून ठेवल्यास शरीराचे वजन उजव्या पायावरून डाव्या पायावर परिणामकारक रीतीने बदलता येणार नाही.

(११) उजवा हात उजव्या मांडीपासून वर चेंडू टाकीपर्यंत अर्धवर्तुळ फिरविताना कोपरात वाकवू नका. या अर्धवर्तुळात तो कोपरात वाकवून पुन्हा सरळ व ताठ करून चेंडू टाकल्यास तो ' थ्रो बॉल ' म्हणून पंच जाहीर करतील.

(१२) ' नो बॉल ' टाकू नका.

(१३) चेंडू हातातून सोडताना उजवा पाय रोवून ठेवू नका किंवा त्यावर शरीराचे वजन ठेवू नका. ठेवल्यास शरीर व हात जोराने फिरणार नाही व चेंडू हळू जाईल.

(१४) चेंडू टाकल्यावर चटकन डावीकडे वळून किंवा थांबून फॉलो थ्रूमध्ये अडथळा आणू नका. तसेच चेंडू टाकल्यावर सरळ खेळपट्टीवर धावू नका. एकतर खेळपट्टी खराब होईल व दुसरे, पंचांस चेंडू व फलंदाज दिसणार नाहीत आणि त्यामुळे फलंदाज बाद असला तरी तो बाद आहे असा निर्णय त्यांना देता येणार नाही.

मित्रांनो, चेंडू टाकण्याच्या पद्धतीचे सविस्तर वर्णन मी केले आहे. ही पद्धत तुम्हांस पूर्ण समजली का ? होय ? मग आता या पद्धतीने चेंडू टाकण्याचा सराव तुम्ही महिनाभर करा. एक महिन्यात ही पद्धत तुम्हांस किती आत्मसात करता येते ते पाहू या.



४

गोलंदाजाची महत्वाकांक्षा व कौशल्य

छोट्या मित्रांनो, जवळजवळ महिन्यापूर्वी मी तुम्हांस गोलंदाजीची योग्य पद्धत समजावून सांगितली होती. आता तुम्ही पूर्वीपेक्षा पुष्कळशी सहजतेने धाव घेऊन बऱ्याच कार्यक्षमतेने चेंडू टाकू शकता. शिवाय गोलंदाजी करतानाही तुम्हांस खरोखर मजा वाटते. याचे कारण म्हणजे गेले तीनचार महिने तुम्ही चिकाटीने व योग्य मार्गाने गोलंदाजी टाकीत आहात. असाच प्रयत्न चालू ठेवलात तर गोलंदाजीतील निराळीच मजा तुम्हांस चाखावयास मिळेल.

आता तुम्हांला मित्रत्वाच्या सामन्यात खेळण्याची संधी मधुनमधून येत आहे. त्या वेळी तुम्ही पाहताच की एखाद्या फलंदाजाने पन्नास धावा केल्या की टाळ्यांचा कडकडाट होतो. त्याच्या एखाद्या चौकाराचेसुद्धा कौतुक होते. त्याच्या साध्या चेंडू ढकलण्यात प्रेक्षकांना कला दिसते. गोलंदाजाने मात्र उत्कृष्ट चेंडू टाकले किंवा कितीही धडपड केली तरी त्याचे प्रेक्षकांना काहीच वाटत नाही. एखाद्या गोलंदाजाने पाचसहा गडी बाद केले तर 'त्याने यशस्वी गोलंदाजी केली' एवढेच उद्गार प्रेक्षकांच्या मुखातून बाहेर पडतात. मेहनतीने आत्मसात केलेली कौशल्यपूर्ण गोलंदाजी करूनही प्रेक्षक गोलंदाजाच्या गुणांचे फारसे कौतुक करीत नाहीत याबद्दल तुम्हांस आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. सामन्यात प्रेक्षकांचे सर्व लक्ष फलंदाजावर केंद्रित झालेले असते. फलंदाजीची कला प्रेक्षकांना चटदिशी समजू शकते. फलंदाज गोलंदाजी कशी

फोडतो हे पाहण्यासाठीच प्रेक्षक आलेले असतात. म्हणून साहजिकच फलंदाजावर त्यांचे अधिक प्रेम असते. परंतु त्यामुळे तुम्ही गोलंदाजांनी नाराज होता कामा नये. फलंदाजीमुळे सामने वाचविले जातात, क्वचितच ते जिंकले जातात. परंतु उत्कृष्ट गोलंदाजीमुळे बहुतेक सामने जिंकले जातात. म्हणूनच कौशल्यपूर्ण गोलंदाजाचे खरे महत्त्व संघनायकच जाणू शकतो. संघनायकाप्रमाणे फलंदाजसुद्धा गोलंदाजाच्या गुणांची पारख करू शकतो. प्रतिपक्षाच्या फलंदाजाकडून कोणत्याही प्रकाराने मिळालेली शाबासकी हाच गोलंदाजाचा खरा आनंद ! संघाला विजय मिळवून देण्यासाठी आणि खेळाचा खरा आनंद लुटण्यासाठी तुम्ही उत्तम गोलंदाज होण्याची मनीषा धरली तर नवल नाही.

दम वाढविण्यासाठी रोज पहाटे उठून पाच-पाच मैल धावणारे आणि तासतास गोलंदाजीचा सराव करणारे काही गोलंदाज जगप्रसिद्ध आहेत. ही एवढी मेहनत कशासाठी ? उत्कृष्ट गोलंदाज होऊन नामवंत फलंदाजास नामोहरम करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा असते आणि ती पुरी करण्यासाठी सतत कष्ट करणे हाच एक मार्ग त्यांच्यापुढे खुला असतो.

फलंदाजास नामोहरम करावयाचे आहे म्हणून फलंदाज आपला शत्रू आहे असे वाटण्याचे कारण नाही. फलंदाज प्रतिपक्षाच्या बाजूने खेळत असल्यामुळे त्यास शक्य तितक्या लवकर बाद करण्यासाठी तुम्ही आकाशपाताळ एक केले तर त्यात काय बिघडले ? फक्त फलंदाजास बाद करण्यासाठी कोणत्या मार्गाने प्रयत्न करावयाचा हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

गोलंदाजाने शैलीदार किंवा कौशल्यपूर्ण गोलंदाजी करून फलंदाजाच्या कौशल्यावर मात करावयाची हा एक गोलंदाजीचा राजमार्ग आहे. गोलंदाजी कौशल्यपूर्ण करण्यासाठी गोलंदाजाने प्रथम चांगल्या चेंडूच्या टप्प्याच्या जागेचा शोध घेतला पाहिजे, नंतर चेंडूची दिशा बदलण्याचे तंत्र आणि चेंडूमध्ये निरनिराळ्या मार्गांनी बदल घडवून आणण्याची कला आत्मसात केली पाहिजे.

फलंदाजाच्या खेळातील किंवा फटक्यातील तांत्रिक दोष ओळखून

व त्याचा फायदा उठवून त्यास बाद करण्याचा प्रयत्न गोलंदाजास करता येईल. तसेच स्वभावदोषांचा फायदा घेऊन फलंदाजास चुकीचा खेळ करण्यास उद्युक्त करून त्यास बाद करता येईल.

मी तुम्हांस फलंदाजीतील कौशल्य हळुहळू उघडे करून सांगेन. परंतु सर्वांत आधी चेंडूच्या टप्प्याविषयी आपण बोलू. आता संध्याकाळ झाली. उद्याच बोलू या विषयावर.



५

चेंडूचा टप्पा

छोट्या मित्रांनो, इकडे या, पॉपिंग क्रीझजवळ या. बॅट आणा. बॅट घेऊन पॉपिंग क्रीझवर पाय ठेवून चेंडू खेळायला उभे राहा. चेंडू खेळत आहात असे समजून पाय शक्य तितका पुढे टाका. या तुमच्या पुढच्या पायाच्या पुढे सुमारे तीनचार फुटांच्या दरम्यान चेंडू टाकला तर तो तुम्हांला नीट मारता येईल का ? आहेत तसे पाय ठेवून किंवा पाय पुढे टाकून तो चेंडू तुम्हांस नीट मारता येणार नाही. तसेच तो चेंडू तुम्हांस मागे पाय नेऊनही मारता येणार नाही. अशा चेंडूला अचूक टप्प्याचा किंवा 'गुड लेंग्थ्' चेंडू म्हणतात. अचूक टप्प्याचा चेंडू जेथे टाकतात त्या जागेस 'गुडलेंग्थ् स्पॉट्' किंवा अचूक चेंडूच्या टप्प्याची जागा असे म्हणतात.

अशा अचूक चेंडूच्या टप्प्याच्या जागी चेंडू टाकला की तो चेंडू पुढे खेळावा की मागे खेळावा असे फलंदाजाचे मन द्विधा होते. असा चेंडू फलंदाज पुढे खेळला तर तो त्याच्या बॅटीत येणे कठीण जाते आणि मागे खेळण्यासाठी त्यास पायाची हालचाल करण्यास पुरेसा वेळ मिळत नाही. असा अचूक टप्प्याचा चेंडू फलंदाज केवळ तटविण्याचा प्रयत्न करतो.

निरनिराळ्या फलंदाजाच्या निरनिराळ्या अचूक चेंडूच्या टप्प्याच्या जागा असतात. बुटक्या फलंदाजापेक्षा उंच फलंदाजास पाय अधिक पुढे टाकता येतो. तेव्हा उंच फलंदाजाची अचूक चेंडूच्या टप्प्याची जागा

बुटक्या फलंदाजापेक्षा थोडी पुढे किंवा गोलंदाजाच्या बाजूस राहील.

तसेच काही फलंदाज पुढचा किंवा डावा पाय पुढे टाकून तर काही मागचा किंवा उजवा पाय मागे नेऊन खेळण्यात तरबेज असतात. तेव्हा पहिल्या प्रकारच्या फलंदाजांची अचूक चेंडूच्या टप्प्याची जागा दुसऱ्या प्रकारच्या फलंदाजांपेक्षा अलीकडे म्हणजे गोलंदाजाच्या बाजूस येईल.



खेळपट्टी

सुमारे तेरा ते पंधरा वर्षांच्या मुलांसाठी खेळपट्टी २१ यार्डांची असते. सोळा वर्षांच्या वरील क्रिकेटपटूंसाठी खेळपट्टी २२ यार्डांची असते.

पुढे पाय टाकून खेळण्यात तरबेज असलेला व मागे पाय नेऊन खेळण्यात तरबेज असलेला फलंदाज, उंच व बुटका फलंदाज किंवा डावखुरा व उजव्या हाताने खेळणारा फलंदाज जोडीने सामन्यात फलंदाजी करण्यास आले तर गोलंदाजाचे काम कठीण होते. कारण त्या दोघांच्या अचूक चेंडूच्या टप्प्याच्या जागा निरनिराळ्या असतात. तेव्हा अशा वेळी गोलंदाजाने दोन्ही फलंदाजांच्या अचूक चेंडूच्या जागा निरनिराळ्या आहेत, हे ओळखून व त्या जागा हेरून गोलंदाजी करावयास पाहिजे.

अचूक चेंडूच्या टप्प्याची जागा खेळपट्टी व गोलंदाजीचा प्रकार यांवरही अवलंबून असते.

खेळपट्टीवर चेंडूचा टप्पा पडल्यावर तो मंद गतीने येत असेल, अधिक वळत असेल किंवा अधिक वर येत असेल तर अचूक चेंडूच्या टप्प्याची जागा फलंदाजाच्या पुढे टाकलेल्या

पायापासून अगदी थोड्या अंतरावर येईल.

याउलट खेळपट्टीवर चेंडूचा टप्पा पडल्यावर तो जलद गतीने येत असेल, फार वळत नसेल किंवा फार वर येत नसेल तर अचूक चेंडूच्या टप्प्याची जागा फलंदाजाने पुढे टाकलेल्या पायापासून थोडी दूर जाईल.



निरनिराळ्या चेंडूच्या टप्प्यांची जागा व त्यांना मारावयाचे फटके

मंदगती गोलंदाजाचा अचूक टप्प्याचा चेंडू फलंदाजाने पुढे टाकलेल्या पायापासून सुमारे एकदोन फूट अलीकडे पडतो, मध्यमगती गोलंदाजाचा

तीनचार फूट अलीकडे व द्रुतगती गोलंदाजाचा सुमारे पाचसहा फूट अलीकडे पडतो.

सध्या तुम्ही या पॉपिंग् क्रीझ्पासून पाचसहा फुटांवर एक आडवी स्टंप्, एक कागदाचा तुकडा किंवा रुमाल ठेवून त्यावर चेंडू टाकण्याचा सराव करा. काही महिन्यांनी ही कागदाची किंवा रुमालाची खूण न ठेवता या अचूक चेंडूच्या टप्प्यावर फक्त नजर ठेवून चेंडू टाकण्याचा सराव करा. काही वर्षांनी निरनिराळ्या फलंदाजांच्या निरनिराळ्या अचूक टप्प्याच्या जागा हेरून तेथे चेंडू टाकावे लागतील.

अचूक चेंडूवर उत्तम फलंदाजसुद्धा सहजासहजी धावा जमवू शकत नाही. उलट अशा चेंडूंच्या माऱ्याने काही फलंदाज बेजार होतात, त्यांचा धीर सुटतो, ते गोंधळतात आणि उतावीळ होऊन अविचारी फटके मारतात. म्हणून फलंदाजाचा गुड्लेंग्थ् स्पॉट् ओळखून तेथे अचूकतेने चेंडू टाकणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

सध्या जाळ्याच्या सरावात तुमच्या हाती चेंडू आला किंवा सामन्यात गोलंदाजी मिळाली तर तुम्ही अचूक चेंडूच्या टप्प्याच्या जागेवर प्रत्येक चेंडू टाकण्याचा प्रयत्न करा. या प्रयत्नात तुमचा चेंडू ओव्हरपिच्ड् पडला तर हरकत नाही, परंतु आखूड टप्प्याचा चेंडू कटाक्षाने टाकू नका. कारण ओव्हरपिच्ड् चेंडूपेक्षा आखूड टप्प्याचा चेंडू मारणे फलंदाजास सोपे जाते.

पहिल्या दर्जाच्या सामन्यात मात्र गोलंदाज बहुतेक चेंडू अचूक चेंडूच्या टप्प्याच्या जागी टाकतो आणि फलंदाजाचीसुद्धा असे चेंडू खेळण्याची तयारी झालेली असते. म्हणून गोलंदाजास अचूक चेंडूच्या टप्प्याच्या जागी चेंडू टाकून त्याची दिशा बदलावी लागते.

चेंडूची दिशा कशी बदलावयाची हे मी तुम्हांस पुढच्या वर्षाच्या क्रिकेट मोसमाच्या सुरुवातीस सांगेन. या वर्षी गोलंदाजीची योग्य पद्धत घटवून तुम्हांस चांगल्या चेंडूच्या टप्प्याच्या जागी चेंडू टाकता आले तरी पुरे.



६

स्वर्व्ह आणि स्विंग्

छोटया मित्रांनो, गेल्या वर्षाच्या क्रिकेट मोसमात तुम्ही गोलंदाजीचा सराव समजून उमजून केल्यामुळे तुमची गोलंदाजीची पद्धत किंचित आकर्षक होऊ लागली आहे. तसेच तुमच्या सहा चेंडूपैकी निदान तीन चेंडू तरी गुड्लेंग्थ् स्पॉट्वर पडतात व ते फलंदाज मारू शकत नाही. या वर्षी तुम्ही सुरुवातीपासूनच उत्साहाने सरावास सुरुवात केली आहे. शिवाय गोलंदाजीतील नवीन गोष्टी शिकण्यासही तुम्ही उत्सुक दिसता. यामुळेच आपल्या गोलंदाजीत तुम्ही यंदा भराभर प्रगती करू शकाल, असा मला भरवसा वाटतो.

तुमच्यामध्ये काही मध्यमगती तर काही मंदगती गोलंदाजआहेत द्रुतगती किंवा मध्यम द्रुतगती गोलंदाज कोणीच नाही. परंतु हे मध्यम-गती गोलंदाज काही वर्षांनी द्रुतगती गोलंदाज म्हणून नावारूपाला आल्यास मला आश्चर्य वाटणार नाही. परंतु त्यासाठी त्यांनी आता अवलंबलेल्या सुरळीत गोलंदाजीच्या पद्धतीनेच चांगल्या चेंडूच्या टप्प्याच्या जागी प्रत्येक चेंडू टाकण्याचा प्रयत्न करावयास हवा. तीन-चार वर्षांनी या छोटया मध्यमगती गोलंदाजांची उंची, ताकद आणि हिंमत वाढली की आपोआपच त्यांच्या गोलंदाजीचा वेग वाढेल. तसेच योग्य सरावानेच या मंदगती गोलंदाजांचीही अचूकता फलंदाजास भीतिदायक वाटेल.

तुम्ही कोणत्याही गतीने गोलंदाजी करीत असलात तरी तुम्हांस

अचूक टप्प्याचे चेंडू टाकणे भाग आहे. शिवाय तुम्हांस आणखी एक महत्त्वाची गोष्ट आत्मसात करणे आवश्यक आहे. ती गोष्ट म्हणजे चेंडूची दिशा बदलणे ही होय. चेंडूचा टप्पा पडल्यावर तर त्याची दिशा बदलता येतेच, शिवाय चेंडू हातातून सुटून त्याचा टप्पा खेळपट्टीवर पडेपर्यंत किंवा चेंडू हवेत असतानासुद्धा त्याची दिशा बदलता येते किंवा त्यास एका बाजूस झुकविता येते. जर तुम्हांस चेंडूची दिशा उत्तम प्रकारे बदलता आली तर साहजिकच फलंदाजास तुमचा चेंडू खेळणे कठीण जाईल किंवा तुमचा चेंडू खेळावयास फलंदाजाचे कौशल्य अपुरे पडेल.

आज सरावासाठी तुम्हांस नवीन, चकचकित चेंडू मिळाला आहे. तेव्हा प्रथम नवीन चेंडू टाकणाऱ्या उजव्या हाताच्या मध्यमगती गोलंदाजांस चेंडूची दिशा कशी बदलावयाची ते सांगतो.

एका विशिष्ट पद्धतीने बोटांची पकड नव्या चेंडूवर ठेवून तो विशिष्ट पद्धतीने टाकल्यास चेंडू हवेत असताना एका बाजूस झुकतो आणि टप्पा पडल्यावर आपली दिशा बदलतो. नवीन चेंडूंच्या हवेतील झुकण्यास स्वर्व्ह म्हणतात आणि टप्पा पडून नवीन चेंडूची दिशा बदलण्यास स्विंग् म्हणतात.

गेला आहे. डाव्या
आला आहे. उजवा
धरू घ्यावयाचा आहे
या कृतीतील का
(१) उजवा पाय
खांदा लेग्स्लिप्कडे
आणि छाती संपूर्ण
खांदा नव्वद अंशांपेक्षा
शरीर, खांदा व हात

आउटस्वर्व्ह व आउटस्विंग्
आउटस्वर्व्ह आणि आउटस्विंग् टाकताना चेंडूवरील बोटांची पकड अशी असावी.

आउटस्वर्व्ह आणि आउटस्विंग्

जो चेंडू गोलंदाजाच्या हातातून सुटल्यानंतर, हवेत असताना, लेग्च्या बाजूने ऑफ्च्या बाजूस झुकतो त्या चेंडूस आउटस्वर्व्ह म्हणतात. तसेच जो नवीन चेंडू टप्पा पडल्यावर लेग्च्या बाजूने ऑफ्कडे वळतो त्या चेंडूस आउटस्विंग् म्हणतात. आउटस्वर्व्ह टाकलेला चेंडू टप्पा पडल्यावर आउटस्विंग् होतो. त्यामुळे हे दोन्ही चेंडू टाकण्याची पद्धत एकच आहे.

आउटस्वर्व्ह किंवा आउटस्विंग् चेंडू टाकण्यासाठी, चेंडू हवेत असताना आणि त्याचा खेळपट्टीवर टप्पा पडताना, त्याची शिवण पहिल्या स्लिप्कडे रोखली गेली असली पाहिजे.

चेंडूची दिशा बदलण्यासाठी प्रथम चेंडूवर विशिष्ट प्रकाराने आपली बोटे रचावयास हवीत किंवा विशिष्ट प्रकाराने चेंडू आपल्या बोटांत पकडावयास हवा. आउटस्वर्व्ह किंवा आउटस्विंग् चेंडू टाकण्यासाठी गोलंदाजाने आपल्या उजव्या हाताच्या पहिल्या व दुसऱ्या बोटांमध्ये चेंडूची शिवण ठेवून आणि अंगठ्याची उजवी बाजू खालच्या बाजूने शिवणीवर ठेवून चेंडू पकडावा. अशा रीतीने चेंडू पकडल्यावर तो डाव्या बाजूस इतका कललेला असावा की चेंडू हातातून सुटताना त्याची शिवण पहिल्या स्लिप्कडे रोखली जाईल.

आउटस्वर्व्ह व आउटस्विंग्

आउटस्वर्व्ह व आउटस्विंग् टाकताना शरीराची हाल[illegible] पाय लाँग्लेग्ला रोखला आहे. उजवा हात किंचित का[illegible] सरळ आहे. चेंडूची शिवण पहिल्या स्लिप्कडे रोखली आहे. डाव्या हातामागोमाग उजवा हात फिरत आहे. खांदा फलंदाजाकडे व छाती मिड्ऑफ्कडे वळत आहे.

तो नवीन चेंडू माझ्याकडे टाका. हे पाहा, चेंडूवर बोटांची अशी पकड ठेवायची. आता मी तुम्हांला एक आउटस्विंग् चेंडू टाकून दाखवितो. वळला का तो हवेत? आणि टप्पा पडल्यावर? होय. आता शरीराची हाल-चाल अगदी हळू करून हा चेंडू कसा टाकावयाचा ते स्पष्ट करून

सांगतो. ही पाहा धाव व डाव्या पायावरची उडी. उजवा पाय क्रीझ्‌ला समांतर पडला. डावा हात उंच व सरळ गेला. उजवा हात उजव्या मांडीकडे येत आहे. आता डावा पाय टेकला. डावा पाय उजव्या पायाच्या रेषेत आहे. डाव्या पायाची बोटे लाँग्‌लेग्‌ला रोखली आहेत. डावा खांदा लेग्‌स्लिप्‌कडे रोखला आहे. डाव्या खांद्यावरून चेंडू टाका-वयाचा टप्पा मला दिसत आहे. आता उजव्या पायावरचे वजन डाव्या पायावर बदलताना कमरेवरील शरीर सरळ राहून दोन्ही हात फिरले. डावा हात डाव्या मांडीजवळ गेला. उजवा हात वर आल्यावर कानापासून थोडासा दुरून फिरविला आहे. उजवे मनगट सरळ किंवा ताठ ठेवले आहे. आता चेंडू सोडतो. चेंडू पहिल्या दोन बोटांनी सोडून त्या बोटांच्या टोकांनी चेंडू किंचित मागे फिरविला व हात खाली ओढला. चेंडू हवेत लेग्‌च्या बाजूने ऑफ्‌च्या बाजूस झुकत आहे. आता उजवा पाय गुडघ्यात वाकून पुढे आला आहे. डावा हात मागे व वर गेला आहे. डाव्या हाताच्या मागोमाग उजवा हात डाव्या मांडीपर्यंत आला आहे. उजवा खांदा फलंदाजाकडे रोखला. आता सुरळीत फॉलो थ्रू घ्यावयाचा आहे.

या कृतीतील काही गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत.

(१) उजवा पाय क्रीझ्‌ला समांतर जमिनीवर टेकल्यामुळे, डावा खांदा लेग्‌स्लिप्‌कडे व डाव्या पायाची बोटे लाँग्‌लेग्‌ला रोखल्यामुळे आणि छाती संपूर्ण मिड्‌ऑन्‌कडे वळविल्यामुळे चेंडू टाकताना उजवा खांदा नव्वद अंशांपेक्षा अधिक फिरतो. या वेळी उजव्या पाठीचीही मदत शरीर, खांदा व हात फिरविण्यास घेतली पाहिजे.

(२) उजवा हात उजव्या कानाच्या थोडासा दुरून फिरविल्यामुळे आणि चेंडू टाकताना मनगट ताठ ठेवून उजव्या हाताचा पंजा किंचित डाव्या बाजूस फिरविल्यामुळे चेंडूची शिवण पहिल्या स्लिप्‌कडे रोखण्यास सोपे जाते.

(३) मनगट ताठ न ठेवल्यास किंवा मनगटाला हिसका दिल्यास चेंडू स्वर्व्ह किंवा स्विंग् होणार नाही. कारण चेंडूची शिवण सरळ राहणार नाही. म्हणून मनगट ताठ ठेवून चेंडू दोन बोटांनी सोडावयास हवा

आणि तो सोडताना बोटांच्या टोकांनी किंचित मागे फिरवून हात थोडासा सरळ खाली ओढावा किंवा थोडासा खालच्या पातळीवर आणावा, म्हणजे चेंडू मागे फिरत राहून शिवण सरळ राहते व चेंडू झुकू शकतो.

(४) चेंडू टाकताना कमरेवरील शरीर सरळ ठेवल्यामुळे चेंडूची शिवण पहिल्या स्लिप्‌कडे रोखण्यास मदत होते.

(५) शिवण पहिल्या स्लिप्‌कडे रोखून चेंडू हवेतून पुढे नीट जावा म्हणून उजवा हात डाव्या हाताच्या मागोमाग डाव्या मांडीकडे फिरला पाहिजे.

मित्रांनो, आता नवीन चेंडू घ्या आणि एकदोन आउटस्विंग् चेंडू टाकून पाहा. काय ? जमत नाही ? मग इकडे या. मी तुम्हांला काही प्रश्न विचारतो त्यांची उत्तरे द्या.

(१) तुमचा उजवा पाय क्रीझ्‌ला समांतर होता का ?

(२) डावा खांदा लेग्‌स्लिप्‌कडे रोखला होता का ?

(३) डावा पाय उजव्या पायाच्या रेषेत होता का ?

(४) डाव्या पायाची बोटे लाँग्‌लेग्‌ला रोखली होती का ?

(५) चेंडू टाकताना कमरेवरील शरीर सरळ होते का ?

(६) मनगट सरळ ठेवले होते का ?

(७) चेंडूची शिवण व उजव्या हाताचा पंजा पहिल्या स्लिप्‌कडे रोखलेला होता का ?

(८) चेंडू पहिल्या दोन बोटांनीच सोडलात ना ?

(९) चेंडू सोडताना पहिल्या दोन बोटांच्या टोकांनी तो मागे फिरविला होता का ? नंतर हात किंचित खाली ओढला का ?

(१०) डाव्या हातामागोमाग उजवा हात डाव्या मांडीपर्यंत फिरला का ?

(११) फॉलो थ्रू सुरळीत घेतला होता का ?

जेव्हा या सर्व प्रश्नांची उत्तरे होकारार्थी येतील तेव्हा तुमचा चेंडू सहज आउटस्विंग् होईल.

आता चेंडू टाकण्याचे शेवटचे पाऊल टाकून आउटस्विंग् टाकण्यासाठी नुसती शरीराची हालचाल करा. उजवा पाय क्रीझ्‌ला समांतर ठेवा. डावा पाय उजव्या पायाच्या रेषेत टाका. डाव्या पायाची बोटे

लाँग्लेग्ला रोखा. डावा खांदा लेग्स्लिपकडे रोखा. डावा हात वर करा. उजवा हात मांडीजवळ ठेवा, आता चेंडू टाकावयाचा आहे. डाव्या पायावर शरीराचे वजन आणून हात फिरवा. उजवा हात कानापासून थोडासा दुरून फिरवा. डावा हात मागे वर जाऊ द्या. उजवा हात डाव्या हातामागोमाग डाव्या मांडीपर्यंत फिरू द्या. फॉलो थ्रू घ्या. अशी पाचसहा वेळा शरीराची हालचाल करून चेंडू टाकण्याच्या पावलांचा, हात फिरविण्याचा व फॉलो थ्रूचा सराव करा. मग नवीन चेंडू आउटस्वर्व्ह व आउटस्विंग् करण्याचा प्रयत्न करा. तुम्हांस नक्की यश येईल.

इन्स्वर्व्ह किंवा इन्स्विंग्

जो चेंडू गोलंदाजाच्या हातातून सुटल्यावर हवेत असताना ऑफ्च्या बाजूने लेग्च्या बाजूस झुकतो त्यास इन्स्वर्व्ह चेंडू म्हणतात. असा झुकलेला चेंडू किंवा जो नवीन चेंडू खेळपट्टीवर पडल्यावर ऑफ्च्या बाजूने लेगकडे वळतो त्यास इन्स्विंग् चेंडू म्हणतात. म्हणजे इन्स्वर्व्ह आउटस्वर्व्हच्या विरुद्ध दिशेस झुकतो व इन्स्विंग् चेंडू आउटस्विंग्च्या विरुद्ध दिशेस वळतो.

इन्स्वर्व्ह व इन्स्विंग् चेंडू टाकण्याची पद्धत एकच आहे. इन्स्वर्व्ह व इन्स्विंग् चेंडू टाकण्यासाठी चेंडू हवेत असताना व त्याचा टप्पा खेळपट्टीवर पडताना त्याची शिवण फाईन्लेग्कडे रोखली गेली असली पाहिजे. त्यासाठी चेंडूवरील पकड आणि चेंडू टाकण्याची पद्धत कशी असावी ते सांगतो.

चेंडूच्या वरील बाजूने शिवणीच्या मध्यभागी किंवा किंचित डाव्या बाजूवर उजव्या हाताचे मधले बोट रचून त्याच्या जवळच पहिले बोट डाव्या बाजूस ठेवावे आणि खालच्या बाजूच्या शिवणीजवळ अंगठ्याने चेंडू धरावा. अशा रीतीने चेंडू पकडल्यावर तो उजव्या बाजूस इतका कललेला असावा की चेंडू

(१) डावा खांदा
(२) डावा पाय उ
वा ऑफ्च्या बाजूस
त.
(३) दोन्ही खांदे
ोदरच फलंदाजाकडे
(४) उजवा हात
ातो.
(५) चेंडू सोडतान

इन्स्वर्व्ह व इन्स्विंग्
इन्स्वर्व्ह व इन्स्विंग् टाकताना चेंडूवर बोटांची पकड अशी असावी.

हातातून सुटताना त्याची शिवण फाईन्लेग्च्या बाजूस रोखली जाईल.

आता मी तुम्हांला एक इन्स्वर्व्ह व इन्स्विंग् चेंडू टाकून दाखवितो. हा पाहा. वळला का हवेत? आणि टप्पा पडल्यावर? होय. आता शरीराची हालचाल अगदी हळुहळू करून हा चेंडू कसा टाकावयाचा ते

ते का ?

पहिल्या स्लिपक

इन्स्वर्व्ह व इन्स्विंग्

इन्स्वर्व्ह किंवा इन्स्विंग् टाकताना डावा पाय किंचित बाजूस टाकून त्या पायाची बोटे पहिल्या स्लिप्कडे किंवा असतात. दोन्ही खांदे ताणून त्यांमध्ये बाक आणला आहे. नेऊन त्या हाताचा पंजा फॉईन्लेग्कडे रोखला आहे. चेंडू उजव्या मांडीकडे जाईल.

? कांनी तो मागे फिर
ा का ?
डाव्या मांडीपर्यं

सांगतो. ही पाहा धाव व डाव्या पायावरची उडी.

समांतर पडला. डावा हात उंच व सरळ गेला. उजवा हात उजव्या मांडीजवळ आला. डावा पाय किंचित ऑफ्च्या बाजूस खेळपट्टीवर टेकला. डाव्या पायाची बोटे फलंदाजाकडे रोखली आहेत. डावा खांदा पहिल्या स्लिप्कडे रोखला आहे. दोन्ही खांदे मागे ताणले जाऊन त्यांमध्ये बाक आला आहे. डाव्या खांद्यावरून चेंडू जेथे टाकावयाचा

आहे ती जागा मी पाहात आहे. आता उजव्या पायावरचे वजन डाव्या पायावर बदलताना दोन्ही हात फिरले. डावा हात डाव्या मांडीजवळ गेला आहे. उजवा हात कानाजवळून शिरोबिंदूवर येत आहे. उजव्या हाताचा पंजा व चेंडूची शिवण फाईन्‌लेग्‌कडे रोखली आहे. मनगट सरळ आहे. आता चेंडू सोडतो. चेंडू सोडताना पहिल्या दोन बोटांनी चेंडू सोडून त्या बोटांच्या टोकांनी चेंडू किंचित मागे फिरविला आहे. चेंडू हवेतून ऑफ्‌कडून लेग्‌कडे जात आहे. उजवा पाय गुडघ्यात वाकून पुढे येत आहे. डावा हात थोडा मागे व वर जात आहे. उजवा हात उजव्या मांडीजवळून मागे जात आहे. आता सुरळीत फॉलो थ्रू घ्यावयाचा आहे.

इन्‌स्वर्ङ्‌ व इन्‌स्विग्‌ चेंडू टाकण्याच्या कृतीतील काही महत्त्वाचे मुद्दे लक्षात ठेवा. चेंडू हवेतून जात असताना व त्याचा टप्पा पडताना त्याची शिवण फाईन्‌लेग्‌कडे वळलेली असली पाहिजे, तरच चेंडू इन्‌स्विग्‌ होईल. म्हणून मूळच्या चेंडू टाकण्याच्या पद्धतीत थोडासा बदल करावा लागतो.

(१) डावा खांदा पहिल्या स्लिप्‌कडे रोखावा लागतो.

(२) डावा पाय उजव्या पायाच्या रेषेत न टाकता किंचित डाव्या किंवा ऑफ्‌च्या बाजूस टाकून त्याची बोटे फलंदाजाकडे रोखावी लागतात.

(३) दोन्ही खांदे मागे ताणून त्यांमध्ये बाक आणल्यामुळे छाती अगोदरच फलंदाजाकडे वळते.

(४) उजवा हात शिरोबिंदूकडे आणून चेंडू शक्य तो उंचून सोडावा लागतो.

(५) चेंडू सोडताना उजव्या हाताचा पंजा उजवीकडे वळवून चेंडूची शिवण फाईन्‌लेग्‌कडे रोखावी लागते. मनगट सरळ ठेवून चेंडू बोटांनी मागे ओढावयाचा असतो.

(६) चेंडू सोडताना सबंध छाती फलंदाजाकडे रोखली जाते.

(७) चेंडू हातातून सुटल्यावर उजवा हात उजव्या मांडीजवळून मागे न्यावा लागतो.

आता तुम्ही एक दोन इन्‌स्विंग् चेंडू टाकून पाहा. जमते का ? नाही. मग इकडे या. मी तुम्हांला आउटस्विंग् व इन्‌स्विंग् चेंडू टाकताना होणाऱ्या शरीराच्या हालचालींतील फरक समजावून सांगतो.

आउटस्वर्व्ह व आउटस्विंग् चेंडू टाकताना	इन्‌स्वर्व्ह व इन्‌स्विंग चेंडू टाकताना
(१) डावा खांदा पहिल्या स्लिप्‌कडे रोखावा.	डावा खांदा लेगस्लिप्‌कडे रोखावा.
(२) डावा पाय उजव्या पायाच्या रेषेत टाकावा.	डावा पाय किंचित ऑफ्‌च्या बाजूस टाकावा.
(३) डाव्या पायाची बोटे लाँग् लेग्‌ला रोखावीत.	डाव्या पायाची बोटे फलंदाजाच्या बाजूस रोखावीत.
(४) कमरेवरील शरीर सरळ ठेवावे.	दोन्ही खांदे मागे ताणून त्यांमध्ये वाक आणावा.
(५) उजवा हात कानाच्या दुरून फिरवावा.	उजवा हात उंच शिरोबिंदूकडे फिरवावा.
(६) चेंडूची शिवण व उजव्या हाताचा पंजा पहिल्या स्लिप्‌कडे रोखावा.	चेंडूची शिवण व उजव्या हाताचा पंजा फाईन्‌लेग्‌कडे रोखावा.
(७) डाव्या हातामागोमाग उजवा हात डाव्या मांडीपर्यंत फिरवावा.	उजवा हात उजव्या मांडीच्या बाजूने मागे फिरवावा.

चला, आता सराव करा. तुम्हांला आवडेल, सहज टाकता येईल तो स्विंग् चेंडू टाकण्याचे पाऊल घटवा व मग तसा चेंडू टाकण्याचा प्रयत्न करा. सराव संपल्यावर मी तुम्हांस स्विंग् गोलंदाजीबद्दल आणखी माहिती सांगेन.

× × ×

स्वर्व्ह व स्विंग्‌बद्दल अधिक माहिती

झाला का सराव ? आता या येथे. मी तुम्हांस स्विंग् चेंडू टाकण्याविषयी आणखी माहिती सांगतो. या माहितीचा उपयोग तुम्हांला या मोसमात आणि पुढेही होईल.

आउटस्विंग् चेंडू गुड्लेंग्थ् स्पॉट्च्या किंचित पुढे फलंदाजाच्या बाजूस टाकावा किंवा तो फलंदाजास पुढे पाय टाकून खेळावयास लावावा. म्हणजे चेंडूची दिशा किती बदलते याचा पूर्ण अंदाज फलंदाजास येणार नाही. चेंडू आखूड टप्प्याचा टाकल्यास चेंडू किती झुकला व वळला आहे, याचा फलंदाजास पूर्ण अंदाज येऊन त्यास तो चेंडू खेळणे सोपे जाईल.

आउटस्विंग् चेंडू शक्य तो लेग् किंवा मधल्या स्टंप्च्या रेषेत टाकावा. म्हणजे चेंडू स्टंप्स्वर जाईल या भीतीने फलंदाजास चेंडू खेळणे भाग पडेल व त्याचा अंदाज थोडासा जरी चुकला तरी चेंडू त्याच्या बॅटीला चाटून जाऊन त्याचा झेल स्लिप्स्मध्ये उडेल.

इन्स्विंग् चेंडूसुद्धा फलंदाजास पुढे खेळावयास लावण्यात फायदा आहे. काही वेळा चेंडू पुढे खेळताना फलंदाज बॅट व पाय यांमध्ये मोकळी जागा ठेवतो. या मोकळ्या जागेतून चेंडू स्टंप्स्वर जाण्याची शक्यता असते. परंतु त्यासाठी इन्स्विंग् चेंडू ऑफ्स्टंप्च्या किंचित बाहेर टाकला पाहिजे. कधीकधी असा चेंडू पुढे खेळल्यास फलंदाजाचा झेल लेग्स्लिप्स्मध्ये उडतो.

काही गोलंदाजांचा चेंडू लेग्स्टंप्च्या रेषेत टाकला तरच इन्स्विंग् होतो व ऑफ्स्टंप्वर टाकला तर होत नाही. तसेच काही गोलंदाजांचा चेंडू ऑफ्स्टंप्च्या रेषेत टाकला तरच आउटस्विंग् होतो व लेग्स्टंप्वर टाकला तर होत नाही. अशा गोलंदाजांनी आपली स्विंग् टाकण्याची पद्धत सुधारली पाहिजे. नाहीतर त्यांची गोलंदाजी संघास उपयुक्त होणार नाही.

आउटस्विंग् चेंडू ऑफ्स्टंप्च्या रेषेत टाकल्यास किंवा इन्स्विंग् चेंडू लेग्स्टंप्च्या रेषेत टाकल्यास फलंदाज तो चेंडू सोडून देईल. असे चेंडू वारंवार बाहेर टाकल्यास नवीन चेंडूचा उपयोग होणार नाही.

नवीन चेंडू स्विंग् करावयाचा नसल्यास त्याच्या शिवणीवर आडवी बोटे ठेवून तो टाकावा. म्हणजे तो सरळ जाईल. काही स्विंग् चेंडू टाकून एखादा अचानक सरळ टाकल्यावर फलंदाजास तो चेंडू सरळ येत आहे हे ओळखणे कठीण जाऊन तो पेचात पडेल.

प्रत्येक गोलंदाजास दोन्हींपैकी एक स्विग् स्वाभाविकपणे व सहजतेने करता येतो. परंतु एकच स्विग् करणाऱ्या गोलंदाजास फलंदाज हार जाणार नाही. म्हणून प्रत्येक नवीन चेंडू टाकणाऱ्या गोलंदाजास दोन्ही बाजूंस स्विग् करता आले पाहिजे. तुम्ही शाळकरी मुलांनी सहांपैकी पाच चेंडू एका बाजूला स्विग् करून एक चेंडू दुसऱ्या बाजूला झुकवावा. चेंडू अकस्मात दुसऱ्या बाजूस वळला म्हणजे फलंदाज पेचात पडतो आणि नंतर इतर पाच चेंडू खेळताना त्या एका दुसऱ्या बाजूस वळणाऱ्या चेंडूची वाट पाहात बसतो. शिवाय आलटून पालटून दोन्ही बाजूंस स्विग् करणाऱ्या गोलंदाजासाठी क्षेत्ररचना करणे अवघड जाते.



दोन्ही स्विंग टाकणाऱ्या गोलंदाजासाठी क्षेत्ररचना

दोन्ही बाजूंस स्विग् करणाऱ्या मध्यमगती गोलंदाजासाठी दोन लेग्-स्लिप्स्, दोन स्लिप्स्, एक गली, एक थर्डमॅन्, एक कव्हर्, एक मिड्ऑफ् व एक मिड्ऑन् असे नऊ क्षेत्ररक्षक ठेवावयास पाहिजेत. उरलेले दोन

क्षेत्ररक्षक कोण ? एक यष्टिरक्षक व दुसरा गोलंदाज.

फक्त नवीन किंवा थोडीफार चकाकी असलेला आणि शिवण ठळक-



मोठा आउट स्विंग लेट आउट स्विंग

पणे वर असलेला चेंडूच हवेत झुकू शकतो. म्हणूनच सामान्यात क्षेत्ररक्षक व गोलंदाज चेंडूवरील चकाकी ठेवण्याचा प्रयत्न करतात. दमट हवेत किंवा खेळपट्टीवरील हिरवळ दाट व हिरवीगार असेल तर चेंडू अधिक झुकतो. तसेच ऑफ्च्या बाजूने वाऱ्याची झुळूक येत असेल तर इन्स्वर्व्ह चेंडू अधिक आत झुकतो आणि लेग्च्या बाजूने वारा येत असेल

तर आउटस्वर्ह्‌ चेंडू अधिक बाहेर झुकतो. गोलंदाजाच्या समोरून वारा वाहत असेल तरीही चेंडू अधिक झुकतो. चेंडू झुकण्यास ही अनुकूल परिस्थिती सांगितली. परंतु कोणत्याही परिस्थितीत चेंडू थोडाफार झुकविता येतो.

परिस्थिती अनुकूल असली तर काही वेळा चेंडू अतिशय झुकून तो स्टंप्स्‌च्या बाहेर जातो व त्याचा फलंदाजास बाद करण्यास उपयोग



मोठा इनस्विंग लेट इनस्विंग

होत नाही. अशा वेळी गोलंदाजाने चेंडू अधिक वेगाने टाकून किंवा चेंडू मागे न फिरविता टाकून चेंडूच्या झुकण्यावर ताबा ठेवला पाहिजे.

चेंडू अवास्तव झुकण्यापेक्षा चेंडू उशिरा झुकल्यास किंवा अर्ध्याअधिक खेळपट्टीच्या पुढे गेल्यावर झुकल्यास तो फलंदाजास खेळणे अवघड जाते. कारण, त्यामुळे चेंडू किती झुकणार आहे ते फलंदाजास अगदी उशिरा समजू शकते. स्वर्व्ह चेंडू टाकण्यास परिस्थिती अनुकूल असल्यास चेंडू टाकण्याच्या वेळी तो बोटांत कललेला न धरता त्याची शिवण फलंदाजाकडे रोखल्यास, चेंडू मागे न फिरविल्यास, हात खाली न ओढल्यास किंवा अधिक वेगाने टाकल्यास तो उशिरा झुकण्यास सुरुवात होते. गोलंदाजाच्या समोरून वारा वाहत असल्यास चेंडू अगदी उशिरा किंवा हवेतून खाली खेळपट्टीवर पडताना झुकतो.

आउटस्वर्व्ह चेंडू स्टंप्स्च्या डाव्या बाजूने व स्टंप्स्जवळून टाकल्यास तो हवेत जास्त झुकतो. परंतु तो स्टंप्स्च्या डाव्या बाजूने अगदी दुरून टाकल्यास तो उशिरा स्वर्व्ह होतो आणि शिवाय त्याचा हवेतील मार्ग तिरका होतो. त्यामुळे असा चेंडू फलंदाजास खेळणे कठीण जाते.

चेंडूची दिशा तर बदलता आलीच पाहिजे. परंतु त्याचबरोबर त्याची दिशा कमीअधिक करता आली पाहिजे. म्हणजेच चेंडूच्या दिशेवर गोलंदाजास ताबा ठेवता आला पाहिजे.

चेंडू झुकविण्याबाबत किंवा चेंडूची दिशा बदलण्याबाबत प्रत्येक गोलंदाजाने स्वत: प्रयोग करीत राहिले पाहिजे. त्या प्रयोगातून मिळालेले यश हेच तुमच्या चेंडू वळविण्याबद्दलचे वैशिष्टच राहील.

चला, जाऊ या घरी आता. घरी जाऊन तुम्हांस तास-दीडतास वाचन करावयाचे आहे.



७

कटर्स्

छोटया मित्रांनो, कोठे आहेत तुमचे सगळे ' सीम् बोलर्स ' ? या पाहू इकडे. ' सीम् बोलर्स् ' म्हणजे काय ? तुम्हांला माहीत नाही का ? सीम् म्हणजे शिवण आणि ' सीम् बोलर्स् ' म्हणजे शिवणीचा उपयोग करून चेंडूची दिशा बदलणारे गोलंदाज. काल नाहीं का मी मध्यमगती गोलंदाजांना सीम्चा उपयोग करून चेंडू स्विंग् कसा करावयाचा ते सांगितले ? पाहू तो काल तुम्ही वापरलेला नवीन चेंडू. त्याच्यावरची चकाकी तर निघून गेली आहे. ही शिवणसुद्धा खाली दवली आहे. आता हा चेंडू क्वचितच स्विंग् होईल. परंतु असा चेंडू मध्यमगती गोलंदाजांस निराळ्या तऱ्हेने वळविता येईल. कसा ते सांगतो.

असा थोडाफार चकाकी गेलेला किंवा संपूर्ण चकाकी नाहीशी झालेला चेंडू ' कट् ' करून, किंवा चेंडूला बोटाने एका बाजूस फिरक देऊन त्याची दिशा बदलता येते. चेंडू ' कट् ' करून त्याचा खेळपट्टीवर टप्पा पडल्यावर तो ऑफ्कडून लेग्कडे वळला तर त्या चेंडूस ऑफ्कटर म्हणतात आणि चेंडू लेग्कडून ऑफ्कडे वळला तर त्यास लेग्कटर म्हणतात.

ऑफ्कटर टाकण्यासाठी शिवणीवर ठेवलेल्या पहिल्या दोन बोटांचा दाव किंवा जोर चेंडूच्या पकडीवर अधिक असावा. कारण या बोटांनीच चेंडू उजव्या बाजूला ' कट् ' केला, किंवा फिरविला म्हणजे चेंडू ऑफ्कडून लेग्कडे वळतो.

लेग्कटर टाकण्यासाठी शिवणीवर ठेवलेल्या पहिल्या दोन बोटांचा—विशेषत: मधल्या बोटाचा—दाव किंवा जोर चेंडूच्या पकडीवर अधिक

ऑफ्कटर

ऑफ्कटर टाकण्यासाठी चेंडूवरील बोटांची पकड अशी असावी.



लेग्कटर

लेग्कटर टाकण्यासाठी चेंडूवरील बोटांची पकड अशी असावी.

असावा. कारण या बोटांनीच चेंडू डाव्या बाजूला 'कट्' केला, किंवा फिरविला म्हणजे चेंडू लेग्कडून ऑफ्कडे वळतो.

'कटर्स्' टाकताना चेंडू मुख्यत: बोटांनी फिरवावयाचा असतो. म्हणून गोलंदाजाची बोटे जेवढी मोठी आणि मजबूत असतील तेवढा चेंडू गरंकन फिरविता व वळविता येईल.

'कट्' करताना चेंडू बोटांनी घट्ट पकडला असला तरी मनगटाला ओढ लागू न देता ते ढिले ठेवणे आवश्यक आहे. कारण, त्यामुळे मनगटाला हिसका देऊन चेंडू जोराने कट् करता येतो किंवा फिरविता येतो.

'कटर्स्' टाकताना मूळची गोलंदाजीची पद्धत अंमलात आणावी. उजव्या हाताच्या गोलंदाजाने उजवा पाय क्रीझ्ला समांतर टाकून कमरेवरील शरीर किंचित मागे झुकवावे. डावा पाय उजव्या पायाच्या रेषेत टाकावा. उजव्या पायावरील शरीराचे वजन डाव्या पायावर बदलताना उजवा खांदा व उजवे शरीर जोराने फिरवावे आणि चेंडू टाकल्यावर डाव्या हातामागोमाग उजवा हात डाव्या मांडीपर्यंत फिरवावा. चेंडू टाकताना शरीराची, मनगटाची व बोटांची हालचाल जितकी चटकन होईल तितक्या वेगाने चेंडू फिरेल.

लेग्कटर, आणखी एका पद्धतीने टाकता येतो. शिवणीवर पहिली दोन बोटे आडवी ठेवून खालून चेंडू अंगठ्याने व तिसऱ्या बोटाच्या आतल्या कडेने पकडावा. नंतर मधल्या बोटाने चेंडू डाव्या बाजूस 'कट्' करताना तिसरे बोट वर अ ... ऱ्या व



दिल्या ... शा

र हिरव ... त

ाजास खे ... तो.

रक रीती ... ता

टर लेग्कट ...

७

कटर्स्

परतु तुम्हास दोन्ही कटस् टाकता आले त ...

पेचात टाकू शकाल. ... ठे 'सीम बोलर्स' ? या पाहू.

कटर्स् टाकण्याचे काही फायदे आहेत. हा चेंडू मध्यम गतीने टाकून त्याची दिशा वदलता येते. ज्या खेळपट्टीवर चेंडूचा टप्पा पडल्यावर तो मंद गतीने येतो त्या खेळपट्टीवर मंद गतीने चेंडू फिरवून टाकण्यापेक्षा मध्यम गतीने चेंडू 'कट्' करून टाकल्यास तो अधिक परिणामकारक ठरतो. 'कट्' केलेला चेंडू वळतो, तसाच टप्पा पडल्यावर तो वर येतो. त्यामुळे सामन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी खेळपट्टी फुटल्यावर किंवा मॅटिंगच्या खेळपट्टीवर सामना खेळताना उत्तम रीतीने 'कटर्स्' टाकणारा गोलंदाज भीतिदायक ठरतो.

आज जुन्या चेंडूने कटर्स् टाकण्याचा प्रयत्न करा. काय होते ते पाहू.

दा. क्र. २६८ दिनांक
किशोर क्र. २६५



फरत हातातून सुटल्या
ा उघडला जातो व तो चेंडू गेला त्या दिशेने थोडा सरकून
ो व खाली डाव्या मांडीकडे फिरतो. या वेळी उजवा पंजा आक
रोखला जातो व अंगठा साधारणपणे फलंदाजाच्या ब
ळला जातो.

छोट्या मित्रांना, गेले दोन दिवस मी मध्... लत होतो. आज तुमच्यातील काही मंदगती गोलंदाजांना चेंडूची दिशा कशी वदलावयाची ते सांगणार आहे. मंदगती गोलंदाजांमध्ये आपणांस दोन भाग करता येतील. पहिला : चेंडूची दिशा ऑफ्कडून लेग्कडे वळविणारे ऑफ्ब्रेक गोलंदाज आणि दुसरा : चेंडूची दिशा लेग्कडून ऑफ्कडे वळविणारे लेग्ब्रेक गोलंदाज. आज मी ऑफ्ब्रेक चेंडू कसा टाकावयाचा ते सांगणार आहे.

उजव्या हाताच्या गोलंदाजाची ऑफ्ब्रेक चेंडू टाकण्याची पद्धत आणि डावखुऱ्या गोलंदाजाची लेग्ब्रेक चेंडू टाकण्याची पद्धत साधारण एकच असते. तेव्हा उजव्या हाताच्या गोलंदाजांस ऑफ्ब्रेक कसा टाकावयाचा हे मी समजावून सांगितले म्हणजे डावखुऱ्या गोलंदाजांस लेग्ब्रेक कसा टाकावयाचा हे आपोआपच समजून येईल.

तुमच्यापैकी उजव्या हाताने ऑफ्ब्रेक गोलंदाजी करण्याचे कोणी कोणी ठरविले आहे ? तुम्ही, होय ? तुमचा निर्णय खरोखर योग्य आहे. कारण उजव्या हाताच्या गोलंदाजास ऑफ्ब्रेक चेंडू सर्वांत अधिक अचूकतेने टाकणे सोपे जाते. शिवाय निरनिराळ्या प्रकारच्या खेळपट्टीवर ऑफ्ब्रेक गोलंदाजीचा उपयोग होतो.

ऑफ्ब्रेक टाकण्यासाठी चेंडू घड्याळाच्या काट्याप्रमाणे डावीकडून उजवीकडे फिरविला पाहिजे. म्हणजे चेंडूचा टप्पा ऑफ्स्टंप्च्या रेषेत

पडला असेल तर तो लेग्स्टंप्च्या दिशेस जाईल. त्यासाठी चेंडचा टप्पा खेळपट्टीवर पडताना त्याची शिवण फॉईन्लेग् व स्क्वेअरलेग् यांच्या मध्ये रोखलेली असेल तर उत्तमच.

' करताना तिसरे बो



दिल्या

र हिरव

जास खे

रक रीती

टर लेग्कट

तुम्हास दोन्हा कटस् टाकता आले त

त टाकू शकाल.

कटर्स्

हे 'सीम बोलर्स' ? या

ऑफ्ब्रेक

ऑफ्ब्रेक टाकताना छोटया मुलांनी चेंडूवर बोटांची पकड अशी ठेवावी.

ऑफ्ब्रेक

काही ऑफ्ब्रेक गोलंदाजांस या पद्धतीने बोटांची पकड चेंडूवर ठेवण्यास सोयीस्कर जाते.

आता चेंडूवर बोटांची पकड कशी ठेवावयाची ते सांगतो. पहिल्या बोटाच्या टोकाचा आतील भाग शिवणीवर आडवा ठेवून दुसरे बोट पहिल्या बोटापासून थोडे दूर शिवणीवर रचावे. पहिल्या व दुसऱ्या बोटातील अंतर तुम्हांला सोयीस्कर वाटेल तेवढे असावे. खालून अंगठ्याने व तिसऱ्या बोटाने चेंडूचा तोल सांभाळावा. तिसरे बोट व करंगळी एकमेकांजवळ वाकलेली राहतात.

आता सांगितल्याप्रमाणे चेंडू बोटांत पकडून तो हातातल्या हातात डावीकडून उजवीकडे फिरवा. चेंडू जरा जोरात फिरवा! पाहा. चेंडू फिरविताना पहिल्या बोटाचाच उपयोग विशेष होतो. दुसऱ्या बोटाचा अगदी थोडा उपयोग होतो. तिसरे बोट, करंगळी व अंगठा यांचा काहीच उपयोग होत नाही. फक्त पहिल्या दोन बोटांनीच चेंडू तुम्हांला फिरविता येईल का? पाहा, प्रयोग करून. आणखी कशाची मदत द्यावी लागते? मनगटाची.

चेंडू टाकण्यापूर्वी उजव्या हाताचा पंजा साधारणपणे कव्हर्‌कडे रोखला जातो. चेंडू हातातून सुटताना मनगट डावीकडून उजवीकडे फिरले जाते आणि मनगट फिरतानाच पहिली दोन बोटे चेंडूवर डावी-कडून उजवीकडे फिरतात. चेंडू फिरत फिरत हातातून सुटल्यानंतर पंजा उघडला जातो व तो चेंडू गेला त्या दिशेने थोडा सरकून पुन्हा मागे व खाली डाव्या मांडीकडे फिरतो. या वेळी उजवा पंजा आकाशा-कडे रोखला जातो व अंगठा साधारणपणे फलंदाजाच्या बाजूस रोखला जातो.

ऑफ्‌ब्रेक

ऑफ्‌ब्रेक चेंडू टाकताना डावा पाय किंचित ऑन्‌च्या बाजूस टाकला आहे. त्याची बोटे स्क्वेअरलेग्‌च्या बाजूस रोखली आहेत. चेंडू टाकण्यापूर्वी उजव्या हाताचा पंजा कव्हर्‌कडे रोखला आहे. चेंडू टाकल्यावर उजव्या हाताचा अंगठा फलंदाजाकडे रोखून नंतर तो हात डाव्या हातामागोमाग फिरत आहे.

आता मी तुम्हांला एक ऑफ्‌ब्रेक चेंडू टाकून दाखवितो. हा पाहा. वळला का ऑफस्टंप्‌वरून लेग्‌स्टंप्‌वर ? लेगस्टंप्‌च उडाली. आता पुन्हा एकदा हळुहळू चेंडू टाकून दाखवितो आणि चेंडू टाकताना शरीराच्या हालचालींचे वर्णन करतो. ही पाहा धाव व डाव्या पायावरची उडी. उजवा पाय क्रीझ्‌ला समांतर पडला. डावा हात वर गेला. उजवा हात

उजव्या मांडीकडे जात आहे. आता डावा पाय टेकताना उजवा हात उजव्या मांडीच्या मागे आला, मनगट वर वळविले आहे आणि अंगठा लाँग् ऑफ्च्या बाजूस रोखला आहे. डावा पाय थोडा ऑन्च्या बाजूस खेळपट्टीवर टेकला. डाव्या पायाची बोटे स्क्वेअर् लेग्कडे रोखली आहेत. डावा खांदा लेग्स्लिप्कडे रोखला आहे. डाव्या खांद्यावरून चेंडू टाकावयाच्या टप्प्याकडे मी पाहत आहे, छाती संपूर्णपणे मिड्ऑन्च्या बाजूस रोखली आहे. आता उजव्या पायावरून शरीराचे वजन डाव्या पायावर झुकण्यास सुरुवात झाली. डावा हात खाली येत आहे. उजवा हात कोपरात न वाकविता वर आणला आहे. उजवा हात कानाजवळून फिरला. मनगट व बोटे डावीकडून उजवीकडे फिरली. चेंडू फिरला व हातातून सुटला. उजवा पंजा पुढे जाऊन मागे व खाली येत आहे. आता उजवा पंजा आकाशाकडे रोखला आहे व उजव्या हाताचा अंगठा फलंदाजाच्या बाजूस रोखला आहे. या वेळी उजवा पाय वाकून पुढे आला. डावा हात मागे व वर गेला. डाव्या हातामागोमाग उजवा हात डाव्या मांडीपर्यंत फिरला. आता फॉलो थ्रू घ्यावयाचा आहे.

ऑफ्ब्रेक टाकण्याच्या कृतीतील काही महत्त्वाच्या गोष्टी तुम्ही लक्षात ठेवल्या पाहिजेत.

(१) चेंडू पकडताना पहिल्या व दुसऱ्या बोटांत अंतर ठेवावे. म्हणजे पहिल्या बोटाने चेंडू फिरविण्यास सोपे जाते. शिवाय दुसऱ्या बोटाचाही चेंडू फिरविण्यास थोडाफार उपयोग होतो.

(२) अजून तुमची बोटे लहान आहेत. म्हणून चेंडू पकडताना पहिल्या दोन बोटांत फार अंतर ठेवू नका किंवा इतके अंतर ठेवू नका की ज्यामुळे बोटे ताणली जाऊन मनगटाला ओढ लागेल. मनगटाला ओढ लागल्यास मनगट व बोटे मोकळेपणाने डावीकडून उजवीकडे फिरणार नाहीत. त्यामुळे चेंडूही फिरणार नाही.

(३) डावा पाय उजव्या पायासमोर न टाकता थोडासा उजव्या किंवा ऑन्च्या बाजूस टाकून त्याची बोटे स्क्वेअर्लेग्ला रोखल्यामुळे चेंडू टाकताना उजवा खांदा व उजवे शरीर फिरण्यास अधिक वेळ लागेल. त्यामुळे मनगट व बोटे फिरण्यास जास्त चालना मिळेल.

(४) डावा पाय टेकताना उजवा हात उजव्या मांडीच्या मागे आला पाहिजे. त्या वेळी मनगट वर वळवून अंगठा लाँग् ऑफ्च्या बाजूस रोखावा. येथे मनगट वळविल्यामुळे ते चेंडू टाकताना डावीकडून उजवीकडे फिरविण्यास सोपे जाते.

(५) हात वर आणताना तो कोपरात वाकवू नये. तो कोपरात वाकविल्यास 'थ्रो बॉल' दिला जाईल.

(६) हात कानाजवळून फिरविल्यास चेंडू शक्य तो उंचून टाकला जाईल.

(७) चेंडू टाकण्यापूर्वी उजव्या हाताचा पंजा कव्हर्कडे रोखलेला असला आणि चेंडू फिरवून टाकल्यानंतर पंजा आकाशाकडे व अंगठा फलंदाजाकडे रोखलेला असला म्हणजे मनगट व बोटे ऑफ्ब्रेक टाकण्यास पुरेपूर फिरली आहेत असे समजण्यास हरकत नाही.

आता चारपाच चेंडू टाकून पाहा.

ऑफ्ब्रेक वळविलेत का चांगले ? काय ? नाही ? मग इकडे या. मी सांगतो तुम्ही काय केले ते आणि पुन्हा असे करू नका.

(१) हाताला रग लागेल इतकी बोटांची घट्ट पकड तुम्ही चेंडूवर ठेवली होती.

(२) मनगटाला ओढ लागेल इतके अंतर तुम्ही पहिल्या दोन बोटांत ठेवले होते.

(३) डाव्या पायावरची उडी घेतल्यानंतर तुम्ही थबकला होता.

(४) उजवा पाय क्रीझ्ला समांतर न टाकता त्याची बोटे मिड्-विकेटच्या बाजूस रोखली होती.

(५) डावा पाय ऑफ्च्या बाजूस टाकला होता आणि त्याची बोटे फलंदाजाकडे रोखली होती.

(६) चेंडू टाकण्यापूर्वीच छाती फलंदाजाकडे रोखली होती.

(७) उजवा हात उजव्या मांडीच्या मागे नेला नाहीत.

(८) उजवा हात उजव्या मांडीकडे फिरल्यावर त्याचे मनगट संपूर्णपणे वर वाकविले नाहीत.

(९) तुमचे मनगट व बोटे फिरलीच नाहीत. म्हणून चेंडू फिरला नाही.

(१०) चेंडू टाकण्यापूर्वी पंजा कव्हर्‌कडे रोखला नाहीत.

(११) चेंडू टाकल्यावर उजवा पंजा आकाशाकडे व अंगठा फलंदाजाकडे रोखला नाहीत.

(१२) डाव्या हातामागोमाग उजवा हात फिरला नाही.

मी सांगितल्यापैकी काही गोष्टी तुम्ही अंमलात आणलेल्या दिसत नाहीत पुन्हा योग्य पद्धतीने प्रयत्न करून पाहा. तुम्हांस नक्की यश येईल. तुमचा सराव संपल्यानंतर आपण ऑफ्‌ब्रेक गोलंदाजीबद्दल आणखी बोलू या. × × ×

ऑफ्‌ब्रेकबद्दल आणखी माहिती

झाला का सराव? ऑफ्‌ब्रेक चेंडू टाकता आले का? थोडेसेच वळले, होय? उत्तम. एवढे यश एका दिवसात पुरे झाले. एका महिन्याच्या सरावाने तुम्हांस चेंडू चांगला वळविता येईल.

आता मी तुम्हांस ऑफ्‌ब्रेक गोलंदाजीबद्दल आणखी थोडी माहिती सांगतो. या माहितीचा तुम्हांस या मोसमात तसेच पुढेही उपयोग करता येईल.

उजव्या हाताच्या गोलंदाजास स्वाभाविकपणे व सहजतेने ऑफ्‌ब्रेक चेंडू टाकता येतो. परंतु चेंडू जोरात फिरविणे व अधिक वळविणे ही साधी गोष्ट नाही. यासाठी लांब व मजबूत बोटे पाहिजेत, शिवाय गोलंदाजीची पद्धतही अचूक हवी.

कमीत कमी धावा देऊन जास्तीत जास्त गडी बाद करणे हा ऑफ्‌ब्रेक गोलंदाजीचा मुख्य उद्देश आहे.

ऑफ्‌ब्रेक चेंडू आखूड टप्प्यावर टाकला तर फलंदाजाची चैनच होईल. परंतु तो फार पुढेही टाकून चालणार नाही. कारण फलंदाजाची बॅट चेंडूच्या टप्प्याजवळ पोहोचली तर फलंदाज चेंडूवरील फिरक दाबून टाकील. म्हणून पुढे पाय टाकून फलंदाजाची बॅट जेथपर्यंत पोहोचते त्याच्या अलीकडे फूट-दीड फूट चेंडू टाकला पाहिजे.

ऑफ्‌ब्रेक चेंडूच्या हवेतील गतीपेक्षा त्याचा टप्पा पडल्यानंतरची गती अधिक असावयास पाहिजे. कारण फिरता चेंडू टप्पा पडल्यावर अधिक वेगाने जातो. परंतु त्यासाठी चेंडू जोराने फिरला पाहिजे.

ऑफ्‌ब्रेक चेंडू चांगले टाकता आले म्हणजे तुम्हांला सामन्यात गोलंदाजी मिळेल. त्या वेळी ऑफ्‌स्टंप्‌च्या किंचित बाहेर चेंडू टाका. म्हणजे

चेंडू थोडेसे वळून स्टंप्स्मध्ये जातील. अशा तुमच्या गोलंदाजीसाठी एक स्लिप्, एक गली, एक शॉर्ट् थर्ड् मॅन्, एक कव्हर पॉइंट, एक शॉर्ट् एक्स्ट्रॉ कव्हर्, एक मिड्ऑफ्, एक मिड्ऑन्, एक मिड्विकेट आणि एक स्क्वेअर् लेग् असे नऊ क्षेत्ररक्षक रचावेत. उरलेले दोन कोण ? एक यष्टिरक्षक आणि दुसरे तुम्ही गोलंदाज.



ऑफब्रेक गोलंदाजासाठी क्षेत्ररचना

सामन्यामध्ये डावखुरा फलंदाज खेळावयास आला म्हणजे संघनायक ऑफ्ब्रेक गोलंदाजास गोलंदाजी देतात. कारण, डावखुऱ्या फलंदाजाच्या बॅटीपासून ऑफ्ब्रेक चेंडू दूर, बाहेर किंवा ऑफ्च्या बाजूस जात असतो. त्यामुळे ऑफ्ब्रेक चेंडू खेळणे त्यास कठीण जाते.

सर्व प्रकारच्या तसेच ऑफ्ब्रेक गोलंदाजांनी खेळपट्टी ओळखण्यास शिकले पाहिजे. खेळपट्टीमध्ये कधी अर्धाएक तासाने तर कधी दीडदोन तासांनी बदल होत असतो. तो बदल लक्षात घेऊन उपयुक्त गोलंदाजी करता आली पाहिजे.

खेळपट्टी किंवा हिरवळ ठणठणीत असेल तर साहजिकच त्यावर चेंडू वळणार नाही. अशा खेळपट्टीवर अचूक चेंडूच्या टप्प्याच्या जागी व ऑफ्स्टंप्च्या किंचित बाहेर चेंडू टाकावे लागतील. परंतु चेंडू वळणार नसल्यामुळे तो फलंदाजास खेळणे कठीण जाणार नाही. म्हणून गोलंदाजाने चेंडूचा हवेतील मार्ग, उंची व गती यांमध्ये वारंवार बदल करून फलंदाजाचा चेंडूबद्दलचा अंदाज चुकविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तुम्ही मोठा ऑफ्ब्रेक वळविण्यास आणि अचूकतेने चेंडू टाकू लागलात म्हणजे मी तुम्हांस चेंडूच्या हवेतील मार्गामध्ये, उंचीमध्ये व गतीमध्ये बदल कसा करावयाचा ते समजावून सांगेन.

खेळपट्टीवर चेंडू टप्पा पडून मंदगतीने येत असेल तर चेंडू पुढे टाकावा. अशा खेळपट्टीवर चेंडू किंचित आखूड पडला तर तो फलंदाजास सहज टोलविता येईल.

ओलसर खेळपट्टीवर तर ऑफ्ब्रेक गोलंदाजी खेळण्यास फलंदाजास भीती वाटते. कारण ओलसर खेळपट्टीवर चेंडू अतिशय वळतो व चेंडूचा टप्पा पडल्यावर तो वर येतो. परंतु टप्पा पडल्यावर चेंडू मंद गतीने येत असल्यामुळे अशा खेळपट्टीवर गोलंदाजाने चेंडू पुढे व नेहमीपेक्षा अधिक गतीने टाकावा.

मॅटिंगवर किंवा फुटलेल्या हिरवळीवर चेंडू अतिशय वळू शकतो. अशा खेळपट्टीवर काही वेळा स्टंप्स्च्या डाव्या बाजूने ऑफ् स्टंप्स्च्या रेषेत चेंडू टाकल्यास तो वळून लेग् स्टंप्च्या बाहेर जातो. अशा चेंडूस फलंदाज पायचीत किंवा त्रिफळाबाद होणार नाही. अधिक वळणारा चेंडू स्टंप्स्च्या उजव्या बाजूने ऑफ्स्टंप्च्या रेषेत टाकल्यास तो लेग्स्टंप्वर जाईल व अशा चेंडूस फलंदाज पायचीत त्रिफळाबाद किंवा झेलबाद होऊ शकेल. म्हणून चेंडू कमी वळत असेल तर स्टंप्स्च्या डाव्या बाजूने आणि चेंडू अधिक वळत असेल तर स्टंप्स्च्या उजव्या बाजूने गोलंदाजी करावी.

चेंडू वळणाऱ्या खेळपट्टीवर मधूनच एक सरळ चेंडू टाकून फलंदाजास चकित करता येईल. ऑफ्ब्रेक टाकताना जशी चेंडूवर बोटांची पकड ठेवता तशीच पकड ठेवून बोटे न फिरविता केवळ मनगट सरळ फलंदाजाकडे फिरवून तुम्हांस सरळ चेंडू टाकता येईल.

ऑफ्ब्रेक चेंडू अधिक वळत असतील तर एक स्लिप्, एक कव्हर्, एक मिड्ऑफ्, एक मिडऑन्, एक फार्वर्ड शॉर्ट्लेग्, एक शॉर्टलेग्, एक लेग्स्लिप्



ऑफब्रेक चेंडू स्टंप्सच्या डाव्या व उजव्या बाजूने टाकल्यास

ऑफ्ब्रेक चेंडू अधिक वळत असेल तर तो स्टंप्स्च्या उजव्या बाजूने टाकावा. म्हणजे तो वळून स्टंप्स्मध्ये जाईल.

आणि एक डीप मिड्विकेट व एक डीप स्क्वेअर्लेग् अशी क्षेत्ररचना करावी.

परंतु सध्या मात्र तुमच्या गोलंदाजीसाठी अशी क्षेत्ररचना ठेवू नका. असे क्षेत्ररक्षक ठेवण्यास गोलंदाजी अगदी अचूकतेने करता आली पाहिजे.

तसेच त्या फलंदाजाच्या जवळ उभे राहणाऱ्या क्षेत्ररक्षकांना अवघड झेल पकडता आले पाहिजेत.



मोठा ऑफब्रेक वळविणाऱ्या गोलंदाजासाठी क्षेत्ररचना

सकाळी दोनतीन तास अभ्यास केल्यानंतर पाचदहा मिनिटे चेंडू डावीकडून उजवीकडे फिरविण्याचा टेनिस चेंडूने सराव करावा. भिंतीला टेकून एक लाकडाची फळी ठेवावी व आठदहा फूट दूर उभे राहून त्या फळीवर चेंडू फिरवून टाकावा. म्हणजे तुम्हांस चेंडूवर बोटांची पकड ठेवण्याची व तो फिरविण्याची सवय होईल.

उजव्या हाताच्या गोलंदाजाची ऑफ्ब्रेक चेंडू टाकण्याची आणि डावखुऱ्या गोलंदाजाची लेग्ब्रेक टाकण्याची पद्धत एकच असते. या डावखुऱ्या गोलंदाजास समजले का कसा लेग्ब्रेक चेंडू टाकावयाचा ते ? होय? शाबास !

चला घरी जाऊ या आता. उद्या लेग्स्पिन् चेंडू कसा टाकावयाचा ते सांगेन.



९

लेग्स[redacted]
लेग्ब्रेक[redacted]

छोटया मित्रांनो, आज लेग्स्पिन् किंवा लेग्ब्रेक[redacted]ा ते मी सांगणार आहे. लेग्स्पिन् चेंडू टाकण्याचे [redacted]र घेतले आहे ? तुम्ही ? ठीक आहे. परंतु लक्षात ठेवा लेग्स्पिन् चेंडू टाकणे ही सहजासहजी जमण्यासारखी गोष्ट नाही. त्यासाठी अतोनात कष्ट घ्यावे लागतील. परंतु एकदा का लेग्स्पिन् चेंडू टाकण्यात यश मिळविलेत की या गोलंदाजीत फारच मजा वाटते.

उजव्या हाताच्या गोलंदाजाची लेग्स्पिन् करण्याची आणि डावखुऱ्या गोलंदाजाची ऑफ्ब्रेक टाकण्याची पद्धत साधारणपणे एकच असते. तेव्हा उजव्या हाताच्या गोलंदाजास लेग्स्पिन् चेंडू कसा टाकावयाचा ते सांगितले की आपोआपच डावखुऱ्या गोलंदाजास ऑफ्ब्रेक कसा टाकावयाचा ते समजून येईल.

उजव्या हाताच्या गोलंदाजाने लेग्स्पिन् चेंडू लेग्स्टंप्च्या रेषेत टाकल्यास तो कोणत्या दिशेस जाईल ? ऑफ्स्टंप्च्या दिशेस. असा चेंडू टाकण्यासाठी चेंडू कोणत्या दिशेकडे फिरविला पाहिजे ? लेग्कडून ऑफ्कडे. बरोबर आहे. किंवा ? उजवीकडून डावीकडे ?

आता चेंडूवर बोटांची पकड कशी ठेवावयाची ते सांगतो. पहिल्या दोन बोटांची पुढची पेरे चेंडूच्या शिवणीवर आडवी घट्ट ठेवा व तिसरे बोट वाकडे करून त्याच्या मधल्या पेऱ्याच्या आतील कडेचा भाग शिवणीवर सरळ ठेवा. या पहिल्या तीन बोटांत तुम्हांस सोयीस्कर वाटेल इतके

अंतर ठेवा. तिसऱ्या बोटाजवळ करंगळी वाकलेली राहते व अंगठा पहिल्या बोटाच्या डाव्या बाजूस शिवणीवर राहतो. पहिल्या दोन बोटांचा चेंडूवर दाव असतो. अंगठ्याने चेंडूचा तोल सांभाळला जातो. परंतु चेंडू मुख्यत्वेकरून तिसऱ्या बोटाने फिरविला जातो.



लेग्ब्रेक :
लेग्ब्रेक टाकताना चेंडूवर बोटांची पकड अशी ठेवावी.

आता सांगितल्याप्रमाणे चेंडू बोटांत पकडून हातातल्या हातात उजवीकडून डावीकडे फिरवा. फिरतो का चेंडू चांगला ?. नाही ? बोटाच्या बरोबर मनगटही उजवीकडून डावीकडे फिरवा. आता येतो ना चांगला फिरविता चेंडू ? मग हे पक्के लक्षात ठेवा की लेग्स्पिन् करण्यासाठी मनगटाचा उपयोग करणे आवश्यक असते.

लेग्स्पिन् चेंडू टाकण्यापूर्वी मनगट उजवीकडे वाकलेले असते. चेंडू हातातून सुटताना वाकलेले मनगट उजवीकडून डावीकडे फिरून ते सरळ होते आणि मनगट फिरतानाच चेंडूवरील वाकलेले तिसरे बोट सरळ होऊन ते फलंदाजाकडे रोखले जाते. याच वेळी अंगठा डावीकडे वळून खेळपट्टीकडे 'रोखला जातो. चेंडू फिरत फिरत हातातून सुटल्यानंतर चारही बोटे सरळ होऊन शेवटी ती खेळपट्टीकडे रोखली जातात.

आता मी तुम्हांस एक लेग्स्पिन् चेंडू टाकून दाखवितो. हा पाहा, वळला का लेग्स्टंप्वरून ऑफ्स्टंप्वर ? थोडक्यात ऑफ्स्टंप् चुकली ! आता पुन्हा एकदा हळुहळू चेंडू टाकून दाखवितो आणि चेंडू टाकताना शरीराच्या हालचालींचे वर्णन करतो. ही पाहा छोटी धाव आणि डाव्या पायावरची उडी. उजवा पाय क्रीझ्ला समांतर पडला. डावा हात वर गेला. उजवा हात उजव्या मांडीकडे जात आहे. उजव्या हाताचे मनगट आतमध्ये शरीराच्या बाजूस वाकले आहे. डावा पाय उजव्या पायाच्या समोर टाकला आहे. त्याची बोटे लॉंग्लेग्ला रोखली आहेत. डावा खांदा फलंदाजाकडे रोखून त्यावरून चेंडू टाकावयाच्या टप्प्याकडे मी पाहत आहे. छाती मिड्ऑन्च्या बाजूस रोखली आहे. आता उजव्या

पायावरून डाव्या पायावर शरीराचे वजन झुकविताना डावा हात खाली फेकला गेला व उजवा हात वर येत आहे. या वेळी उजव्या हाताचे मनगट बाहेरच्या बाजूस किंवा मिड्ऑन्च्या बाजूस वाकलेले आहे किंवा उजव्या बाजूस फिरलेले आहे. हात वर आला. मनगट उजवीकडून डावीकडे फिरले. त्याच वेळी वाकलेले तिसरे बोट सरळ झाले. अंगठा डाव्या बाजूस फिरला. चेंडू फिरला व हातातून सुटला. उजव्या हाताची चारही बोटे सरळ होऊन ती खेळपट्टीकडे रोखली गेली. याच वेळी उजवा पाय वर आला. डावा हात मागे व वर फिरला. उजवा हात डाव्या मांडी-

लेग्ब्रेक :

उजवा हात मांडीजवळून फिरत असताना त्या हाताचे मनगट आतमध्ये शरीराच्या बाजूस वाकले आहे. डावा पाय उजव्या पायासमोर टाकला असून त्याची बोटे लाँग् लेग्कडे रोखली आहेत. उजवा हात वर आल्यावर त्या हाताचे मनगट बाहेरच्या बाजूस किंवा मिड्ऑन्च्या बाजूस वाकले आहे. चेंडू टाकल्यावर उजव्या हाताची बोटे खेळपट्टीकडे रोखली गेली आहेत, उजवा हात डाव्या हातामागून फिरत आहे व उजवा खांदा फलंदाजाकडे रोखला आहे.

कडे फिरत आहे. उजवा खांदा फलंदाजाकडे रोखला आहे. आता फॉलो थ्रू घ्यावयाचा आहे.

लेग्स्पिन् चेंडू टाकण्याच्या कृतीतील काही महत्त्वाच्या गोष्टी तुम्ही लक्षात ठेवल्या पाहिजेत.

(१) चेंडू मुख्यतः तिसऱ्या बोटाने फिरविला जातो. अंगठा व पहिली दोन बोटे यांचा चेंडू फिरविण्यास फारच थोडा उपयोग होतो.

(२) मनगटाच्या मदतीशिवाय चेंडू चांगला फिरणार नाही. केवळ बोटानेच चेंडू फिरविल्यास तो अगदी थोडा फिरेल व हवेतूनही वेगाने जाणार नाही.

(३) उजवा हात उजव्या मांडीकडून वर फिरविताना मनगट वाकविलेले असेल तरच ते चेंडू टाकताना उजवीकडून डावीकडे फिरेल.

(४) चेंडू हातातून सुटताना उजव्या हाताचा पंजा फलंदाजाकडे आणि चेंडू टाकल्यावर बोटे खेळपट्टीकडे रोखली गेली पाहिजेत. म्हणजेच चेंडू योग्य दिशेने फिरला असे म्हणता येईल.

आता स्टंप्स्पासून दहाबारा फूट अंतरावर उभे राहून लेग्स्पिन् करा. दररोज हे अंतर पाचसहा फुटांनी वाढवीत जा. शिवाय घरी सकाळी दोन तास अभ्यास केल्यानंतर रबरी चेंडूने असेच हळुहळू अंतर वाढवून गोलंदाजीचा सराव करावा. वेळ मिळेल तेव्हा हातात चेंडू फिरवावा. पण चेंडू फिरविताना मनगट फिरविण्यास विसरू नका. एका महिन्यात तुम्ही लेग्स्पिन् चेंडू टाकण्यात किती प्रगती करता ते पाहू या.

× × ×

एका महिन्यानंतर

किती प्रगती केलीत लेग्स्पिन् गोलंदाजीत ? चांगल्या चेंडूच्या टप्प्याच्या जागी फारच थोड्या वेळा चेंडू पडतो ? पण फिरक तरी जमते का ? कधीकधी ? हरकत नाही तुम्ही धीर सोडला नाहीत आणि प्रयत्न करावयास तयार आहात हीच पहिल्या प्रथम समाधानकारक गोष्ट आहे. परंतु त्याचबरोबर तुमच्या लेग्स्पिन् टाकण्याच्या पद्धतीत कोठे तरी चुकत असले पाहिजे हेही तितकेच खरे. आता मी तुम्हांस काही प्रश्न विचारतो त्यांची उत्तरे द्या.

(१) तुमचा उजवा पाय क्रीझ्‌ला समांतर टाकला होता का ?

(२) उजवा हात वर फिरविताना उजव्या हाताचे मनगट वळविले होते का ?

(३) डाव्या पायाची बोटे लाँग्‌लेग्‌ला रोखली होती का ?

(४) चेंडू टाकावयाचा टप्पा डाव्या खांद्यावरून पाहिला होता का ?

(५) चेंडू फिरविताना बोटांचा, तसेच मनगटाचा उपयोग केला होता का ?

(६) चेंडू हातातून सोडताना उजव्या हाताचा पंजा फलंदाजाकडे रोखला होता का ?

(७) चेंडू हातातून सुटल्यावर बोटे खेळपट्टीकडे रोखली होती का ?

(८) चेंडू टाकल्यावर उजवा हात डाव्या मांडीकडे फिरवून उजवा खांदा फलंदाजाकडे रोखला होता का ?

(९) फॉलो थ्रू बरोबर घेतला होता का ?

मी विचारलेल्या या सर्व प्रश्नांची उत्तरे तुम्ही होकारार्थी दिली नाहीत तर साहजिकच तुमचा लेग्‌स्पिन् चेंडू चांगला पडणार नाही. बरे, चांगले लेग्‌स्पिन् चेंडू टाकण्याचा प्रयत्न करा. सराव झाल्यानंतर मी पुन्हा तुमच्याशी लेग्‌स्पिन्‌बद्दल आणखी बोलेन.

× × ×

लेगस्पिन्‌बद्दल आणखी माहिती

आजच्या सरावात तुमचे काही लेग्‌स्पिन् चेंडू चांगले पडले. थोडचा वेळा का होईना फलंदाज खेळताना चकत होते. लेग्‌स्पिन् चेंडू अचूकतेने टाकणे ही एक अवघड गोष्ट आहे आणि ही अवघड गोष्ट तुम्हांस सहजतेने करता आली तर किती मजा वाटेल !

आणखी दोनतीन महिन्यांच्या सरावानंतर तुम्हांस सामन्यात गोलंदाजी दिल्यावर तुम्ही आखूड टप्प्याचा किंवा लेग्‌स्टंप्‌च्या बाहेर लेग्‌स्पिन् चेंडू टाकू नका. अशा चेंडूस फलंदाज लेग्‌ला फटके मारून धावा मिळवील. परंतु अशा चेंडूस फलंदाज काही वेळा चुकीचे फटके मारण्याचाही संभव असतो. कारण हे फटके चेंडू वळतो त्या दिशेच्या विरुद्ध दिशेस मारले जातात. लेग्‌स्पिन् केलेल्या फुलटॉस चेंडूलासुद्धा काही वेळा फलंदाज चुकीचे फटके मारून झेल उडवितो. तेव्हा आखूड टप्प्याचा लेग्‌स्टंपच्या बाहेर व फुलटॉस चेंडू लेग्‌ला क्षेत्ररक्षक ठेवून

योजनापूर्वक टाकण्यास हरकत नाही. परंतु योजनापूर्वक गोलंदाजी करण्यास तुम्हांला अजून अवकाश आहे.

लेग्स्पिन् चेंडू शक्य तो मधल्या किंवा ऑफ्स्टंप्च्या रेषेत अचूक चेंडूच्या टप्प्याच्या जागी किंवा गुडलेंग्थ् स्पॉटवर चेंडू किंचित पुढे टाकलेला परवडेल. अर्थात अशा पुढे टाकलेल्या चेंडूस फलंदाज ड्राइव्हचे फटके मारतात. फलंदाज ड्राइव्हचे फटके मारतील असा अंदाज करूनच लेग्स्पिन् गोलंदाजासाठी क्षेत्ररचना करावयास पाहिजे.

सध्या तुम्ही एक स्लिप्, एक शॉर्ट थर्ड्मॅन, एक डीप एक्स्ट्रॉकव्हर्, एक सिली मिड् ऑफ्, एक लाँग् ऑन्, एक लाँग् ऑफ्, एक डीप मिड्विकेट, एक सिली मिड् ऑन् व एक डीप स्क्वेअरलेग् अशी क्षेत्र-



लेगब्रेक गोलंदाजासाठी क्षेत्ररचना

रचना ठेवा. ज्या वेळी तुमच्या गोलंदाजीवर तुमचा ताबा येईल त्या वेळी सहा क्षेत्ररक्षक ऑफ्‌ला व तीन क्षेत्ररक्षक लेग्‌ला रचा.

काही वेळा लेग्‌स्पिन् गोलंदाजास षटकार व चौकार मारून फलंदाज भराभर धावा वाढवितात. अशा वेळी गोलंदाजाने धीर सोडून किंवा त्रस्त होऊन चालणार नाही. अशा परिस्थितीतूनही त्यानें फलंदाजास बाद करण्याचा मार्ग काढला पाहिजे.

लेग्‌स्पिन् गोलंदाजाने फलंदाजास चुकीचा फटका मारण्यासाठी आमिष दाखविले पाहिजे. दोन क्षेत्ररक्षकांत मुद्दाम मोकळी जागा ठेवून तेथे फलंदाजास चुकीच्या चेंडूला फटका मारण्यास उद्युक्त करावयास हवे. लोंबता चेंडू टाकून फलंदाजास क्रीझच्या बाहेर खेचून त्यास यष्टि-बाद करण्याचा प्रयत्न करता येईल. फलंदाज बचावात्मक खेळू लागला तर चेंडू बॅटीला चाटून जाऊन त्याचा स्लिप्स्‌मध्ये झेल उडविण्याची योजना गोलंदाजास आखता येऊ शकेल.

लेग्‌स्पिन् गोलंदाजाने खेळपट्टी ओळखून गोलंदाजी करावयास हवी. ठणठणीत खेळपट्टीवर लेग्‌स्पिन् वळणार नाही. तेव्हा गोलंदाजाने चेंडूचा हवेतील मार्ग, उंची व गती यांमध्ये बदल करून फलंदाजाचा चेंडूबद्दलचा अंदाज चुकवून त्यास बाद करण्याचा प्रयत्न करावयास हवा. चेंडूचा हवेतील मार्ग, उंची व गती यांमध्ये बदल कसा करावयाचा ते मी तुम्हांस पुढे सांगेन.

मंदगती व ओलसर खेळपट्टीवर लेग्‌स्पिन् चेंडू किंचित पुढे व नेहमी-पेक्षा वेगाने टाकला पाहिजे.

ज्या खेळपट्टीवर चेंडू अधिक वळून तो निरुपयोगी होत असेल तेथे चेंडूवरील फिरक कमी करावयास हवी. चेंडू नेहमीपेक्षा वेगाने टाकून किंवा मनगट कमी वळवून चेंडूवरील फिरक कमी करता येते.

या मोसमात लेग्‌स्पिन् चेंडू टाकणाऱ्या गोलंदाजांनी निदान प्रति-पक्षाच्या खालच्या क्रमांकाचे खेळाडू तरी लवकर बाद करावयास हवेत.

× × ×

टप्पा व दिशा यावर ताबा

या वर्षाच्या क्रिकेट मोसमाच्या सुरुवातीसच मी तुम्हांस चेंडूची

दिशा कशी बदलावयाची ते सांगितले. नवीन चेंडू टाकणारे, मध्यमगती व मंदगती गोलंदाज यांपैकी प्रत्येकाला चेंडू ऑफ्कडून लेग्कडे किंवा लेग्कडून ऑफ्कडे किंवा दोन्ही दिशांस वळविता येतो. या मोसमात एकाग्र मनाने व चिकाटीने सराव करून निश्चय आणि इच्छाशक्ती यांच्या जोरावर अचूक टप्प्याचे चेंडू तुम्हांस पाहिजे तितका वळवून टाकण्याचा प्रयत्न करा. चेंडूचा टप्पा आणि चेंडूची दिशा यांवर तुम्ही ताबा मिळविलात म्हणजे आपोआपच तुम्हांस फलंदाज सहज बाद करता येतील. या वर्षाच्या सामन्यांत तुम्ही काय करता ते पाहू या.



१०

टॉपस्पिन् व गुगली

छोटया मित्रांनो, जाळयातील सरावाचे हे तुमचे तिसरे वर्ष सुरू होत आहे. गेली दोन वर्षे तुम्ही कमविलेले गोलंदाजीतील कौशल्य आणि अनुभव जमेस धरता या वर्षी तुम्ही गोलंदाजीतील प्रगतीचा बराच मोठा पल्ला गाठाल अशी अपेक्षा करणे चुकीचे होणार नाही.

गेल्या वर्षाच्या क्रिकेट मोसमातील सामन्यांत तुमच्यापैकी प्रत्येकाने प्रतिपक्षाचे थोडेफार गडी बाद केले होते. कसून सराव, गोलांदाजीची तालबद्ध आणि आकर्षक पद्धत, फलंदाजाच्या अचूक चेंडूच्या टप्याची जागा हेरण्याचे सामर्थ्य व तेथे चेंडू टाकण्याचा बराचसा यशस्वी प्रयत्न आणि चेंडूची दिशा बदलण्याची हातोटी यांमुळेच गेल्या वर्षी तुम्हांस थोडेफार यश मिळाले.

या वर्षाच्या क्रिकेट मोसमाच्या सुरुवातीसच तुमच्या गोलंदाजीत विविधता कशी आणावयाची किंवा चेंडू कसे बदलून टाकावयाचे यांविषयी मी तुमच्याशी बोलणार आहे.

आज मी उजव्या हाताच्या लेग्ब्रेक गोलंदाजांना व डावखुऱ्या मंद-गती गोलंदाजांस दोन निराळे चेंडू कसे टाकावयाचे ते सांगणार आहे. एक टॉपस्पिन् चेंडू व दुसरा गुगली चेंडू. अर्थात उजव्या हाताच्या गोलंदाजास हे चेंडू कसे टाकावयाचे ते मी सांगितले की साह-जिकच डावखुऱ्या गोलंदाजास ते चेंडू टाकण्याची कृती लक्षात येईल.

तुमच्या उजव्या हाताच्या लेग्ब्रेक गोलंदाजास चांगले लेग्ब्रेक चेंडू

टाकता येतात का? तुमचे चेंडू चांगले वळतात का? चेंडू गुडलेंग्थ् स्पॉटवर पडतात का? तुमची लेग्ब्रेक चेंडू टाकण्याची कृती तुम्हांस नीट ठाऊक आहे का? म्हणजे कानाच्या किती दुरून किंवा जवळून तुम्ही उजवा हात फिरविता, चेंडू टाकताना डावा पाय कोठे व कसा टाकता, चेंडू हातातून सुटताना मनगटाची व बोटांची हालचाल कशी होते व पंजा कोठे रोखला जातो, चेंडू हातातून सुटल्यानंतर हात व खांदा कसा फिरतो, इत्यादि हालचालींचे तुम्हांस पूर्ण ज्ञान आहे ना? कारण टॉप-स्पिन् व गुगली हे दोन चेंडू कसे टाकवयाचे ते मी तुम्हांस सांगितल्या-नंतर आणि हे दोन चेंडू टाकण्याचा तुम्ही प्रयत्न केल्यावर लेग्ब्रेक चेंडू टाकण्याचे विसरणार नाही, याची खात्री आहे ना तुम्हांला? होय? मग ठीक आहे. आता मी तुम्हांला प्रथम टॉपस्पिन् चेंडू कसा टाकावयाचा ते स्पष्ट करून सांगतो.

टॉपस्पिन्

ऑफ्ब्रेक चेंडू मधल्या स्टंप्च्या रेषेत टाकला तर तो कोठे वळेल? लेग्स्टंप्वर किंवा लेग्स्टंप्च्या बाहेर. लेग्ब्रेक चेंडू मधल्या स्टंप्च्या रेषेत टाकला तर तो कोठे वळेल? ऑफ्स्टंप्वर किंवा ऑफ्स्टंप्च्या बाहेर. परंतु टॉप्स्पिन् चेंडू मधल्या स्टंप्च्या रेषेत टाकला तर तो सरळ मधल्या स्टंप्वर जाऊन आदळेल. टॉप्स्पिन् चेंडू टप्पा पडल्यावर सरळ जातो खरा, परंतु तो फिरवून टाकावयाचा असतो बरं का. तो चेंडू कोणत्या बाजूस फिरला पाहिजे ते सांगा पाहू. स्टंप्स्कडे किंवा गोलंदाजाच्या बाजूकडून फलंदाजाकडे. बरोबर आहे.

लेग्ब्रेक टाकताना जसा तुम्ही चेंडू बोटांत पकडता तसाच टॉपस्पिन् टाकताना चेंडू पकडावयाचा असतो. लेग्ब्रेक टाकताना तुम्ही चेंडू बोटांत कसा पकडता? चेंडूच्या शिवणीवर पहिल्या दोन बोटांची पेरे आडवी घट्ट ठेवून तिसरे बोट वाकडे करून त्याच्या मधल्या पेऱ्याच्या कडेचा भाग शिवणीवर सरळ ठेवता. अंगठा पहिल्या बोटाच्या डाव्या बाजूस शिवणीवर राहतो आणि वाकलेल्या तिसऱ्या बोटाजवळ करंगळी वाक-लेली राहते. होय की नाही? अशीच बोटे टॉपस्पिन् टाकतानासुद्धा चेंडू-वर रचावयाची असतात.

टॉपस्पिन् चेंडू लेग्ब्रेकसारखाच फिरवावयाचा असतो. म्हणजे चेंडू हातातून सुटण्यापूर्वी मनगट उजवीकडून डावीकडे फिरते आणि मनगट फिरतानाच वाकलेले तिसरे बोट सरळ होऊन चेंडू फिरत फिरत हातातून सुटतो.

लेग्ब्रेक आणि टॉपस्पिन् चेंडू टाकण्यात जो मुख्य फरक तो आता सांगतो. लेग्ब्रेक चेंडू स्लिप्स्च्या रोखाने फिरतो तर टॉपस्पिन् चेंडू फलंदाजाच्या रोखाने फिरतो. लेग्ब्रेक चेंडू टाकताना उजव्या हाताचा पंजा फलंदाजाकडे रोखलेला असतो तर टॉपस्पिन् टाकताना पंजा जमिनीकडे व बोटांच्या सांध्यांची हाडे मिड्ऑन्कडे रोखलेली असतात. टॉपस्पिन् चेंडू टाकल्यानंतर पंजा मिड्ऑन्कडे रोखलेला पाहिजे. लेग्ब्रेक टाकताना चेंडूवरील वाकलेले तिसरे बोट सरळ होऊन ते फलंदाजाकडे रोखले जाते तर टॉपस्पिन् टाकेताना चेंडूवरील वाकलेले तिसरे बोट सरळ झाल्यावर मिड्ऑन्कडे रोखले गेले पाहिजे. लेग्ब्रेक टाकताना जेव्हा चेंडू हातातून फिरत फिरत सुटतो, त्यापूर्वी किंचित थोडा वेळ चेंडू फिरवून हातातून सोडल्यास, चेंडू फलंदाजाच्या रोखाने फिरत जाईल. म्हणजे उजवा हात वर आल्यावर त्याचा पंजा जमिनीकडे रोखलेला असताना, बोटांच्या सांध्याची हाडे मिड्ऑन्कडे रोखलेली असताना व चेंडूची शिवण फलंदाजाकडे रोखलेली असताना चेंडू फिरत फिरत हातातून सोडल्यास तो टॉपस्पिन् होईल.

आता मी तुम्हांला एक टॉपस्पिन् चेंडू टाकून दाखवितो. हा पाहा. पडला मधल्या स्टंप्च्या रेषेत आणि टप्पा पडून गेला स्टंप्वर! आता शरीराची हळूहळू हालचाल करून टॉपस्पिन् चेंडू कसा टाकावयाचा ते वर्णन करून सांगतो. ही पाहा डाव्या पायावरची उडी. उजवा पाय क्रीझ्ला समांतर पडला. डावा हात वर गेला. डाव्या खांद्यावरून चेंडू टाकावयाचा टप्पा मी पाहत आहे. उजवा हात उजव्या मांडीजवळ आला व त्याचे मनगट आतमध्ये वळले. डावा पाय उजव्या पायासमोर टेकला. त्याची बोटे फाईनलेग्ला रोखली आहेत. डावा हात खाली फेकला आहे. उजवा हात वर फिरत आहे. त्या हाताचे मनगट वाहेरच्या बाजूस, म्हणजे मिड्ऑन्च्या बाजूस वाकलेले आहे. उजव्या पायावरून डाव्या पायावर शरीराचे वजन झुकत आहे. उजवा हात अगदी उंच

जाण्यापूर्वीच त्या हाताचे मनगट उजवीकडून डावीकडे फिरून पंजा जमिनीकडे आणि बोटांच्या सांध्यांची हाडे मिड्ऑन्‌कडे रोखलेली असताना तिसरे बोट सरळ होऊन ते मिड्ऑन्‌कडे रोखले गेले. चेंडू फिरत फिरत हातातून सुटला आहे. पंजा उघडा होऊन तो मिड्ऑन्‌कडे रोखला गेला आहे. नंतर उजवा हात किंचित पुढे जाऊन त्याची बोटे फलंदाजाकडे रोखली गेली. उजवा पाय उचलून वर आला. डावा हात डाव्या मांडीच्या मागे गेला. उजवा हात खाली डाव्या मांडीकडे जात आहे. उजव्या हाताची बोटे खेळपट्टीकडे रोखली गेली. उजवा खांदा फलंदाजाकडे रोखला गेला. आता फॉलो थ्रू घ्यावयाचा आहे.

आता तुम्ही टाकून पाहा दोन तीन टॉपस्पिन् चेंडू. काय, जमतात का? लेगब्रेक होतात? होणारच ! आता स्टंप्स्पासून दहाबारा फूट अंतरावर उभे राहा. प्रथम एक लेग्ब्रेक चेंडू टाका. मग एक टॉपस्पिन् चेंडू टाका. आता जमतो का? होय ! आठआठ दिवसांनी हे अंतर पाच पाच फुटांनी वाढवा आणि असा दोनतीन महिने सराव केल्यावर हा चेंडू फलंदाजास खेळावयास टाका. परंतु कोणत्याही परिस्थितीत लेग्ब्रेक चेंडू विसरावयाचा नाही हे लक्षात ठेवा. × × ×

गुगली

टॉपस्पिन् चेंडू आवडला का ? सामन्यांत चार पाच लेग्ब्रेक चेंडू टाकून एखादा टॉपस्पिन् टाकला तर फलंदाज चकेल, होय ना ? नक्की पायाचीतच होईल ! ठीक आहे. आता गुगली चेंडूबद्दल तुम्हांस माहिती सांगतो. गुगली चेंडू ऑफ्ब्रेकसारखा वळतो, परंतु तो टाकण्याची पद्धत मात्र लेग्ब्रेकसारखीच असते हं ! आता प्रत्यक्ष एक गुगली चेंडू टाकून दाखवितो. हा पाहा. वळला ना ऑफ्ब्रेकसारखा ? पुन्हा टाकतो, पाहा. आहे ना लेग्ब्रेक पद्धतीचा ऑफ्ब्रेक ?

लेग्ब्रेक किंवा टॉपस्पिन् चेंडू टाकताना तुम्ही जशी बोटांची पकड चेंडूवर ठेवता तशीच बोटांची पकड गुगली टाकताना चेंडूवर ठेवावयाची असते.

उजवा हात फिरून वर आल्यावर त्या हाताचे मनगट उजवीकडून डावीकडे किंवा हाताच्या मागील बाजूकडे किंवा मिड्ऑन्‌कडून मागील

बाजूस उभ्या असलेल्या पंचाकडे फिरवावे. म्हणजे उजव्या हाताच्या पंजाची मागील बाजू फलंदाजाकडे व पंजा गोलंदाजाच्या मागील बाजूस रोखला जाईल. या वेळी तिसऱ्या बोटाच्या बाहेरच्या बाजूने चेंडू फिरविला की ते बोट सरळ होते व चेंडू फिरत फिरत करंगळीच्या टोकावरून फलंदाजाकडे जातो. हा चेंडू ऑफ्कडून लेग्कडे फिरतो. म्हणून ऑफ्ब्रेकसारखा ऑफ्कडून लेग्कडे वळतो.

आता शरीराची हालचाल हळुहळू करून गुगली चेंडू टाकतो व तो टाकताना शरीराच्या हालचालींचे वर्णन करतो. उजवा पाय क्रीझ्ला समांतर टेकला. डावा हात वर गेला. चेंडू टाकावयाचा टप्पा मला डाव्या खांद्यावरून दिसत आहे. उजवा हात मनगटात वळून उजव्या



गुगली

गुगली चेंडू टाकताना डाव्या पायाची बोटे फलंदाजाकडे रोखली आहेत. डावा खांदा खाली झुकला आहे. हाताच्या पंजाची मागील बाजू फलंदाजाकडे रोखली आहे. चेंडू करंगळीच्या टोकावरून फिरत फिरत हातातून सुटला आहे. चेंडू टाकल्यावर उजवा हात उजव्या मांडीच्या बाजूस फिरला. उजव्या हाताची बोटे खेळपट्टीकडे व पंजा मिड्ऑन्कडे रोखला आहे.

मांडीकडे फिरला. डावा हात खाली फेकला गेला. डावा पाय उजव्या पायासमोर टाकला. पण डाव्या पायाची बोटे फलंदाजाकडे रोखली आहेत. उजवा हात फिरून वर आला आहे. उजव्या हाताचे मनगट मिड्ऑन्च्या बाजूस वाकले आहे. उजव्या पायावरील शरीराचे वजन डाव्या पायावर बदलताना डावा खांदा खाली झुकविला व त्याच वेळी मनगट उजवीकडून डावीकडे फिरविले. हाताच्या पंजाची मागील बाजू फलंदाजाकडे रोखली गेली व तिसऱ्या बोटाच्या बाजूने चेंडू फिरविला व ते बोट सरळ झाले. चेंडू फिरत फिरत करंगळीच्या टोकावरून फलंदाजाकडे गेला. उजव्या हाताचा उघडलेला पंजा प्रथम मागे पंचा-कडे रोखला गेला. उजवा हात फिरून पुढे आल्यावर त्याची बोटे स्क्वेअरलेग्ला रोखली गेली. उजवा पाय गुडघ्यात वाकून वर आला. डावा हात डाव्या मांडीच्या बाजूने फिरला. उजवा हात उजव्या मांडीकडे फिरला व त्याचा पंजा मिड्ऑन्कडे व बोटे खेळपट्टीकडे रोखली गेली. आता फॉलो थ्रू घ्यावयाचा आहे.

स्टंप्स्पासून दहा बारा फूट दूर उभे राहून लेग्ब्रेक, टॉपस्पिन् व गुगली चेंडू टाकण्याचा समजून उमजून सराव करावा. हे अंतर हळुहळू वाढवावे. हे चेंडू उत्कृष्टपणे टाकता आले म्हणजेच सरावाच्या वेळी फलंदाजास टॉपस्पिन् व गुगली चेंडू मधून मधून टाकावे. या चेंडूवर संपूर्ण ताबा मिळविल्यावरच त्यांचा सामन्यात वापर करावा. त्यासाठी बराच काळ लागला तरी हरकत नाही. परंतु कोणत्याही कारणास्तव तुम्ही लेग्ब्रेक चेंडू विसरणार नाहीत याची दक्षता घ्या. आता सराव करा. सराव झाल्यावर मी तुम्हांस टॉपस्पिन् व गुगली चेंडूबद्दल आणखी माहिती सांगेन. × × ×

अधिक माहिती

झाला का सराव ? टॉपस्पिन् आणि गुगली चेंडू फलंदाजास टाक-ण्याचा मोह झाला नाही ना ? बरे, आता मी तुम्हांस टॉपस्पिन् व गुगली गोलंदाजीबद्दल आणखी थोडी माहिती सांगतो.

लेग्ब्रेक, टॉपस्पिन् व गुगली चेंडू टाकण्याची पद्धत साधारणपणे सारखीच दिसत असली तरी हे तीन चेंडू टाकण्याच्या तीन निरनिराळ्या पद्धती आहेत, त्यातील सूक्ष्म फरक पुन्हा एकदा सांगतो.

	लेग्ब्रेक	टॉपस्पिन्	गुगली
१. फिरक	लेग्कडून ऑफ्ला	सरळ	ऑफ्कडून लेग्ला
२. डाव्या पायाची बोटे	लाँग्लेग्ला	फाईन्लेग्ला	फलंदाजाकडे
३. मनगट फिरविण्यापूर्वी बोटांच्या सांध्याची हाडे रोखलेली	मिड्विकेटकडे	लाँगऑन्कडे	मिड्ऑन्कडे
४. चेंडू फिरविण्यासाठी तिसरे बोट सरळ करताना पंजा रोखलेला	फाईन्लेग्कडे	खेळपट्टीकडे	गोलंदाजाच्या मागे
५. चेंडू हातातून सुटल्यावर उघडलेला पंजा रोखलेला	फलंदाजाकडे	मिड्ऑन्कडे	लाँग्ऑफ्कडे
६. चेंडू सुटून हात किंचित पुढे फिरल्यावर त्याची बोटे रोखलेली	स्लिप्स्कडे	फलंदाजाकडे	स्क्वेअरलेग्कडे
७. उजवा हात खाली मांडीकडे फिरताना व त्याची बोटे खेळपट्टीकडे रोखलेली असताना पंजा रोखलेला	डाव्या मांडीकडे	उजव्या मांडीकडे	मिड्ऑन्कडे

आता तुमच्या लक्षात आलेच असेल की लेग्ब्रेक आणि गुगली यांमधील टॉपस्पिन् टाकण्याची कृती आहे.

गुगली टाकताना डाव्या पायाची बोटे फलंदाजाकडे रोखल्यामुळे डावा खांदा खाली झुकविण्यास सुलभ जाते व डावा खांदा खाली झुकविल्यामुळे उजव्या हाताचे मनगट फिरवून त्या हाताचा पंजा गोलंदाजाच्या मागील बाजूस फिरविण्यास सोपे जाते.

लेग्ब्रेकच्या विरुद्ध दिशेने गुगली फिरतो. कारण गुगली टाकताना चेंडू उलटा होतो किंवा त्याचा आंस बदलतो.

जे फलंदाज गोलंदाजाच्या बोटांकडे व पंजाकडे पाहून चेंडू कसा वळणार आहे हे जाणून घेत नाहीत, त्यांना लेग्ब्रेक, टॉपस्पिन् व गुगली



लेगब्रेक गुगलीसाठी क्षेत्ररचना

यांतील फरक समजणे कठीण जाईल. परंतु ज्या फलंदाजांना गोलंदाजाच्या बोटांच्या हालचालींकडे पाहून चेंडूची फिरक जाणण्याची सवय

असते, त्यांना या तीन चेंडूंमधील फरक जाणता येईल. त्यांना हा फरक सहजासहजी जाणता येऊ नये म्हणून गोलंदाजाने या तीन चेंडू टाकण्याच्या पद्धतीत फलंदाजास फारसा फरक न दिसू देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

लेग्ब्रेक चेंडूस स्लिप्स्मध्ये व गुगली चेंडूस लेग्स्लिप्मध्ये झेल उडण्याचा संभव असतो, म्हणून लेग्ब्रेक व गुगली टाकणाऱ्या गोलंदाजांसाठी क्षेत्ररचना करणे कठीण जाते. अशा गोलंदाजांसाठी एक स्लिप्, एक शॉर्ट् थर्ड्मॅन, एक कव्हर, एक शॉर्ट एक्स्ट्रॉ कव्हर, एक मिड्ऑफ्, एक मिड्ऑन्, एक डीप स्क्वेअरलेग्, एक शॉर्टलेग् व एक लेग्स्लिप् अशी क्षेत्ररचना ठेवावयास हवी.

लेग्ब्रेक आणि टॉपस्पिन् या चेंडूपेक्षा गुगली चेंडू टप्पा पडल्यावर अधिक मंद गतीने येतो. एकंदरीत या तीनही चेंडूंना फलंदाज गोलंदाजाकडे झेल उडविण्याचा संभव असतो. तेव्हा गोलंदाजाने चेंडू टाकल्यावर झेल पडण्यास तसेच चेंडू अडविण्यास तयार राहिले पाहिजे.

नुकत्याच खेळावयास आलेल्या फलंदाजास सुरुवातीलाच गुगली चेंडू टाकणे काही वेळा फायदेशीर ठरते. कारण चेंडूच्या वळण्याबावत अंदाज करण्याइतकी त्या फलंदाजाची दृष्टी चेंडूवर बसलेली नसते. शिवाय सुरुवातीलाच असा निराळा चेंडू पडेल अशी त्याची अपेक्षा नसते.

गोलंदाजाने टॉपस्पिन् व गुगली हे चेंडू वारंवार टाकण्यात फायदा नाही. हे चेंडू वारंवार टाकल्यामुळे फलंदाजास ते सहज ओळखता येतील. म्हणून टॉपस्पिन् किंवा गुगली हे चेंडू क्वचितच किंवा दोन ओव्हर्सूमधून एखादा टाकण्यात फायदा आहे. कारण, फलंदाज एकदा गुगली चेंडू खेळल्यानंतर त्या चेंडूची वाट पाहत राहील व त्यामुळे त्याची एकाग्रता ढळेल. या क्वचित टाकल्या जाणाऱ्या गुगली किंवा टॉपस्पिन् चेंडूची त्याने वाट पाहिली नाही तर बऱ्याच वेळाने टाकलेल्या या चेंडूने त्यास चकविता येणे शक्य आहे.

लेग्ब्रेक व गुगली यांमधील टॉपस्पिन् चेंडू टाकण्याची कृती आहे. त्यामुळे लेग्ब्रेक व गुगली चेंडूपेक्षा टॉपस्पिन् चेंडू ओळखणे फलंदाजास कठीण जाते. शिवाय या दोन्ही चेंडूपेक्षा टॉपस्पिन् चेंडू टप्पा पडल्यावर

फिरकीमुळे अधिक वेगाने पुढे जातो. टॉपस्पिन् चेंडू लेग्ब्रेक किंवा गुगली आहे अशी फलंदाजाची समजूत होण्याची शक्यता बरीच असते. त्यामुळे चेंडू वळेल असा अंदाज करून फलंदाज खेळल्यास टॉपस्पिन् चेंडू त्याच्या पायावर आदळतो व तो पायचीत होतो.

मंदगती लेग्ब्रेक गोलंदाज बचावात्मक किंवा धावा रोखण्यासाठी गोलंदाजी टाकू शकत नाही. गडी बाद करण्यासाठी त्यास फलंदाजास भुलवावे लागते. कधीकधी फलंदाजाचा धीर सुटावा म्हणून किंवा चुकीचा किंवा फिरकीच्या विरुद्ध फटका मारण्यास फलंदाजास उद्युक्त करण्यासाठी त्यास लोंबते चेंडू टाकावे लागतात. त्यामुळे कधीकधी फलंदाज या गोलंदाजाविरुद्ध पुष्कळ धावा मिळवितात. परंतु पुष्कळ धावा देऊन गडी बाद करणारी गोलंदाजी काही संघनायकांना परवडत नाही व ते अशा गोलंदाजीचा वापर करण्यास नाखूष असतात. तेंव्हा फलंदाजास चकित करणाऱ्या टॉपस्पिन् व गुगली चेंडूचा खुबीने वापर करून संघनायकाच्या योजनेप्रमाणे तुम्हांस गोलंदाजी कशी करता येईल याचा विचार तुम्ही केला पाहिजे.

चला, दिवस मावळला, जाऊ या घरी. उद्या सराव झाल्यावर मी तुम्हांस आणखी काही निराळ्या प्रकारच्या चेंडूबद्दल माहिती सांगेन.



११

विविध चेंडू

छोट्या मित्रांनो, लेग्ब्रेक गोलंदाजांना टॉपस्पिन् आणि गुगली हे चेंडू टाकता आले म्हणजे त्यांच्या गोलंदाजीत थोडीफार विविधता येते.

एकाच टप्प्यावर व एकाच दिशेस वळवून चेंडू वारंवार टाकल्यास किंवा एकाच प्रकारचा चेंडू सारखा टाकल्यास फलंदाजास तो चेंडू खेळावयाची सवय होईल व त्या चेंडूस फलंदाज बाद होणार नाही. म्हणून चेंडूचा टप्पा आणि दिशा बदलून निरनिराळ्या प्रकारचे चेंडू टाकण्याचा प्रयत्न गोलंदाजाने करावयास हवा. स्विंग् होणारा नवीन चेंडू सरळ कसा टाकावयाचा आणि ऑफ्ब्रेक गोलंदाजाने मधूनच सरळ चेंडू कसा टाकावयाचा हे मी तुम्हांस पूर्वीच सांगितले आहे. आता मी तुम्हांस आणखी कोणते निराळे चेंडू टाकता येतील ते सांगतो.

फुलटॉस् चेंडू टाकून किंवा पहिला टप्पा बॅटीवर देऊन फलंदाजास झेल उडविण्यास भाग पाडता येईल. हा फुलटॉस् चेंडू वाटतो तितका खेळावयास सोपा नसतो. हा चेंडू ऑफ्स्टंप्च्या रेषेत फलंदाजाच्या पोटावर आला तर त्या चेंडूस झेल उडविणे किंवा तटविणे फलंदाजास भाग पडते. अर्थात फुलटॉस् चेंडू लेग्स्टंप्वर टाकल्यास मात्र फलंदाज तो कोठेही लेग्ला टोलवू शकतो. मंदगती गोलंदाजाने सामन्यात एखादा फुलटॉस् चेंडू मुद्दाम फलंदाजास टाकून पाहावे. प्रयोग करून निष्कर्ष काढण्यास व बोध घेण्यास प्रत्येक गोलंदाजाने तयार असले पाहिजे.

काही वेळा द्रुतगती किंवा मध्यमगती गोलंदाज फलंदाजाच्या अंगा-

वर किंवा डोक्यावर पहिला टप्पा टाकतात. हाही एक प्रकारचा फुलटॉस् चेंडू आहे. यास ‘बीमर’ म्हणतात. अशा चेंडूस फलंदाज घाबरून खेळला तर त्याचा जवळच झेल उडण्याचा संभव असतो. परंतु असा चेंडू चिडून किंवा फलंदाजास इजा करण्याच्या हेतूने टाकावयाचा नसतो. तसे केल्यास ती खिलाडू वृत्ती होणार नाही.

काही वेळा चेंडूचा टप्पा फलंदाजाच्या बॅटीखाली पडतो व तो सरळ स्टंप्स्वर जातो. या चेंडूस यॉर्कर चेंडू म्हणतात. या चेंडूचा टप्पा साधारणपणे पॉपिंग् क्रीझ्जवळ पडतो. अर्थात अशा चेंडूस फटकासुद्धा मारता येतो. फटका मारला तर तो यॉर्कर चेंडू होऊ शकत नाही. काही वेळा चेंडू अगदी स्टंप्च्या बुंध्यात पडतो. पण हाच चेंडू पहिला टप्पा घेऊन मारता येतो. तेव्हा सीम् गोलंदाज द्रुतगती, मध्यमगती, मंदगती किंवा कोणत्याही प्रकारच्या गोलंदाजाचा यार्कर चेंडू पडून फलंदाज त्रिफळा-बाद होऊ शकतो. स्वर्व्ह झालेला नवीन चेंडू किंवा फिरक असलेला लोंवता चेंडूसुद्धा पॉपिंग् क्रीझ्जवळ पडला तर तो फलंदाजाच्या बॅटीतून निसटून स्टंप्स्वर जाऊ शकतो. असा चेंडू पॉपिंग् क्रीझ्जवळ व लेग्-स्टंप्च्या रेषेत टाकल्यास फलंदाजास खेळण्यास अधिक कठीण जातो. कारण तो बॅटीखालून, तसेच बॅट आणि पाय यांमधून स्टंप्स्वर जाऊ शकतो. असा चेंडू मधुनमधून टाकण्यात फायदाच आहे.

फुलटॉस् आणि यॉर्कर चेंडूंचा क्वचित किंवा मधुनमधून वापर करून तुम्हांला आपल्या गोलंदाजीत थोडीफार विविधता आणता येईल. आता मी तुम्हांस आणखी तीनचार अगदी निराळे चेंडू सांगणार आहे. हे चेंडू तुम्हांस आज तर टाकता येणार नाहीतच आणि हे चेंडू टाकण्याचा आज प्रयत्नही करू नका.

डीडॅपर नावाचा एक चेंडू आहे. तो टॉपस्पिन् चेंडूसारखा टाकतात. परंतु त्याचा पहिला टप्पा खेळपट्टीच्या मध्यभागी पडतो व दुसरा टप्पा अचूक चेंडूच्या टप्प्याच्या जागी पडतो. हा चेंडू फलंदाजाच्या बाजूस फिरत असल्यामुळे दोन्ही टप्पे पडल्यावरसुद्धा चेंडू वेगाने जातो. चेंडू आखूड टप्प्यावर पडला म्हणून फलंदाज चेंडू लेग्ला मारावयास पवित्रा घेतो, तोच दुसरा टप्पा अचूक चेंडूच्या टप्प्याच्या जागी पडतो व फलंदाज चकतो.

ऑफ्ब्रेक गोलंदाजास ऑफ्ब्रेक पद्धतीने चेंडू फिरवून लेग्ब्रेक टाकता येतो. उजव्या हाताचा पंजा पूर्णपणे आकाशाकडे रोखून चेंडू ऑफ्ब्रेक-सारखा फिरविला तर लेग्ब्रेक वळतो. कारण हा चेंडू टाकताना चेंडू उलटा होऊन फिरतो किंवा चेंडूचा आस बदलतो. हा चेंडू ऑफ्ब्रेक पद्धतीने टाकल्यासारखा दिसतो, पण लेग्ब्रेक वळतो.

हवेतून इन्स्वर्व्ह झाल्यावर नवीन चेंडूचा टप्पा खेळपट्टीवर पडताना त्याची शिवण स्लिप्स्कडे रोखलेली असेल तर तो चेंडू स्लिप्स्कडे आउटस्विंग्सारखा वळतो. म्हणजे हवेत चेंडू इन्स्वर्व्ह होतो व टप्पा पडल्यावर तो आउटस्विंग् होतो. तसेच हवेत चेंडू आउटस्वर्व्ह होतो आणि त्याचा टप्पा पडताना त्याची शिवण लेग्स्लिप्स्कडे रोखलेली असल्यास तो चेंडू इन्स्विंग् होतो.

एक 'फिलपर' नावाचा चेंडू असतो: टॉपस्पिन्प्रमाणे तो टाकावयाचा असतो. परंतु चेंडू हातातून सोडताना तो अंगठा व मधल्या बोटाने चुटकीसारखा फिरवावयाचा असतो. चेंडू अंगठा व मधल्या बोटाने चुटकीसारखा फिरविल्यामुळे तो ऑफ्ब्रेकसारखा ऑफ्कडून लेग्ला वळतो.

हे अगदी निराळ्या प्रकारचे चेंडू आहेत. गोलंदाजास अशा प्रकारचा एखादाच चेंडू आयुष्यात चांगल्या प्रकारे टाकता येतो. यांपैकी एखादा चेंडू टाकण्यासाठी गोलंदाजास वर्षानुवर्षे सराव करावा लागतो. सध्या तुम्ही तुमच्या शक्तीप्रमाणे आणि कल्पनेने चेंडूचा टप्पा आणि दिशा बदलून निरनिराळे चेंडू टाकण्याचा प्रयत्न करा. या प्रयत्नांतूनच तुम्ही आपला स्वतःचा एक विशिष्ट किंवा निराळा चेंडू काही वर्षांनी आपोआप शोधून काढाल.

वेळ झाली. जाऊ या घरी.



१२

चेंडूचा हवेतील मार्ग, उंची व गती

छोट्या मित्रांनो, काल मी तुम्हांस चेंडूचा टप्पा व फिरक बदलून गोलंदाजीत विविधता कशी आणता येते व निरनिराळ्या प्रकारचे चेंडू कसे टाकता येतात ते सांगितले. चेंडू हवेत असताना त्याचा मार्ग, उंची व गती कशी बदलावयाची याविषयी मी आज तुमच्याशी बोलणार आहे.

स्पिन्स्वर्व्ह

ज्याप्रमाणे नवीन चेंडू हवेत असताना एका बाजूस झुकू शकतो त्याप्रमाणे फिरवून टाकलेला चेंडूसुद्धा हवेमध्ये असताना एका बाजूस झुकू शकतो. या फिरकी चेंडूच्या झुकण्यास स्पिन्स्वर्व्ह म्हणतात.

ऑफ्ब्रेक गोलंदाज, तसेच लेग्ब्रेक गोलंदाज स्पिन्स्वर्व्ह करू शकतो. उजव्या हाताच्या गोलंदाजाचा ऑफ्ब्रेक चेंडू हवेत असताना डावीकडे किंवा लेग्कडून ऑफ्कडे झुकतो आणि अर्थात हाच चेंडू टप्पा पडल्यावर ऑफ्ब्रेक होतो. म्हणजे स्पिन्स्वर्व्ह झालेला ऑफ्ब्रेक चेंडू हवेत असताना लेग्कडून ऑफ्कडे व टप्पा पडल्यावर तो ऑफ्कडून लेग्कडे वळतो.

उजव्या हाताच्या गोलंदाजाचा लेग्ब्रेक चेंडू हवेत असताना उजवीकडे किंवा ऑफ्कडून लेग्कडे झुकतो आणि हाच चेंडू टप्पा पडल्यावर लेग्ब्रेक होतो. म्हणजे स्पिन्स्वर्व्ह झालेला लेग्ब्रेक चेंडू हवेत असताना ऑफ्कडून लेग्कडे झुकतो व टप्पा पडल्यावर तो लेग्कडून ऑफ्कडे वळतो.

थोडक्यात स्पिनस्वर्व्ह झालेला चेंडू हवेत एका बाजूस झुकतो व टप्पा पडल्यावर तो दुसऱ्या बाजूस वळतो. स्पिनस्वर्व्ह करण्यासाठी चेंडू फारच जोराने फिरवून तो थोडी उंची देऊन टाकावयास हवा. तसेच बाजूने वाहणारा वारा चेंडू झुकण्यास मदत करतो.

ऑफ्च्या बाजूने वारा वाहत असेल तर लेग्ब्रेक चेंडू हवेत असताना उजवीकडे किंवा लेग्ला अधिक झुकेल आणि वारा लेग्च्या बाजूने वाहत असल्यास ऑफ्ब्रेक चेंडू डावीकडे किंवा ऑफ्ला अधिक झुकेल. तसेच वारा समोरून वाहत असल्यास टॉपस्पिन् चेंडू खेळपट्टीकडे लवकर झुकेल.

कधीकधी चेंडू फूट-दीड फुटापेक्षा अधिक झुकतो. चेंडू झुकण्यास वाव देऊन चेंडू थोडासा बाजूला टाकल्यास तो आपण ठरविलेल्या टप्प्यावर पडतो. म्हणजे ऑफ्ब्रेक गोलंदाजाने ठरविलेल्या टप्प्याच्या थोडा उजव्या बाजूस चेंडू टाकल्यास तो हवेत झुकून ठरविलेल्या टप्प्यावर पडेल. तसेच लेग्ब्रेक गोलंदाजाने ठरविलेल्या टप्प्याच्या थोडा डाव्या बाजूस चेंडू टाकल्यास तो झुकून ठरविलेल्या टप्प्यावर पडेल.

फलंदाजाच्या दृष्टीने स्पिनस्वर्व्ह खेळण्यास अतिशय कठीण असतो. कारण फलंदाज चेंडूच्या हवेतील झुकण्याबरोबर त्या दिशेस जातो आणि टप्पा पडल्यानंतर चेंडू उलट दिशेस वळणार असतो. तसेच एखाद्या वेळी झुकलेला चेंडू दुसऱ्या बाजूस वळलाच नाही तर फलंदाजाची फजितीच होण्याचा संभव असतो.

× × ×

स्टंप्स्जवळून व दुरून

गोलंदाजाकडील स्टंप्स्च्या डाव्या किंवा उजव्या बाजूला जी गोलंदाजी करण्यासाठी जागा असते तिचा उपयोग करून चेंडूचा मार्ग कसा बदलतो ते आता सांगतो.

बोलिंग क्रीझची लांबी किंवा दोन्ही रिटर्न क्रीझमधील अंतर आठ फूट आठ इंच असते. या अंतराच्या मध्यभागी नऊ इंच जागेत तीन स्टंप्स् रोवतात. म्हणजे स्टंप्स्च्या डाव्या बाजूस रिटर्न क्रीझपर्यंत ३ फूट ११½ इंच अंतर राहते. तसेच स्टंप्स्च्या उजव्या बाजस रिटर्न क्रीझपर्यंत तितकेच अंतर राहते. तेव्हा आपणांस कधी स्टंप्स्जवळून तर कध

स्टंप्स्पासून एक फूट, तर कधी दोन फूट, तर कधी ३ फूट ११½ इंच अंतरावरून चेंडू टाकता येईल.

दोन्ही बाजूंच्या मधल्या स्टंप्स्ना जोडणारी एक रेषा काढा. स्टंप्स्-जवळून मधल्या स्टंप्च्या रेषेमध्ये एक चेंडू टाका. या चेंडूचा मार्ग मधल्या स्टंप्स्ना जोडणाऱ्या रेषेशी एक कोन करतो. आता स्टंप्स्च्या दुरून मधल्या स्टंप्स्च्या रेषेत त्याच टप्प्यावर एक चेंडू टाका. या चेंडूचा मार्गही मधल्या स्टंप्स्ना जोडणाऱ्या रेषेशी कोन करतो. आता मला हे सांगा की कोणत्या चेंडूचा मार्ग मधल्या स्टंप्स्ना जोडणाऱ्या रेषेशी



ऑफब्रेक स्टंप्सजवळून व स्टंप्सच्या दुरून

अधिक मोठा कोन करतो ? स्टंप्स्च्या दुरून टाकलेल्या चेंडूचा मार्ग बरोबर आहे. म्हणजे आपल्याला एकाच स्टंपच्या रेषेत व एकाच

टप्प्यावर दोन निरनिराळ्या ठिकाणांहून किंवा दोन निरनिराळे कोन करून किंवा दोन निरनिराळ्या मार्गांनी चेंडू टाकता येतात. तेव्हा स्टंप्स् आणि रिटर्न क्रीझ् यांमधील जागेचा फायदा घेऊन आपणांस निरनिराळे चेंडू टाकता येतात.



लेगब्रेक स्टंप्सच्या जवळून व स्टंप्सच्या दुरून

स्टंप्स्च्या डाव्या बाजूने स्टंप्स्च्या जवळून टाकलेला चेंडू फलंदाजापासून दूर राहतो आणि स्टंप्स्च्या डाव्या बाजूने स्टंप्स्च्या अगदी दुरून टाकलेला तसाच चेंडू फलंदाजाकडे जातो. म्हणजे स्टंप्स्जवळून ऑफ्स्टंप्च्या रेषेत ऑफ्ब्रेक चेंडू टाकल्यास तो जितका आतमध्ये फलंदाजाकडे वळेल त्यापेक्षा तितकाच फिरवून त्याच टप्प्यावर स्टंप्स्च्या

अगदी दुरून टाकलेला ऑफ्ब्रेक चेंडू फलंदाजाच्या बाजूस अधिक जाईल. तसेच स्टंप्स्च्या दुरून टाकलेल्या लेग्ब्रेक चेंडूपेक्षा स्टंप्स्च्या जवळून टाकलेला लेग्ब्रेक चेंडू फलंदाजापासून अधिक दूर जाईल.

काही चेंडू स्टंप्स्जवळून किंवा एका ठिकाणाहून टाकावे व नंतर एखादा चेंडू स्टंप्स्च्या किंवा त्या ठिकाणाच्या दुरून टाकावा. म्हणजे चेंडूच्या मार्गात एकदम बदल होऊन फलंदाज चकण्याची शक्यता राहील. चेंडू टाकण्याचे ठिकाण वारंवार बदलल्यास फलंदाजास त्याची जाणीव होऊन तसे चेंडू खेळण्याच्या तयारीत तो राहील.



स्टंपसच्या डाव्या बाजूने व उजव्या बाजूने सरळ चेंडू

तेव्हा अशा रीतीने सरावात व सामन्यात गोलंदाजी टाकताना

स्टंप्स् व रिटर्न क्रीझ् यांमधील जागेचा उपयोग करून चेंडूच्या मार्गात बदल करता येईल. × × ×

स्टंप्स्च्या डाव्या किंवा उजव्या बाजूने

बहुतेक गोलंदाजांना स्टंप्स्च्या डाव्या बाजूने गोलंदाजी करणे आवडते. ते फायदेशीरही आहे. कारण स्टंप्स्च्या डाव्या बाजूने गोलंदाजी केल्यास साहजिकच चेंडू स्टंप्स्मध्ये जाण्याची व त्यामुळे फलंदाज त्रिफळावाद किंवा पायचीत होण्याची शक्यता अधिक असते.



ऑफ ब्रेक चेंडू स्टंपसच्या डाव्या व उजव्या बाजूने टाकल्यास

परंतु काही वेळा स्टंप्स्च्या उजव्या बाजूने गोलंदाजी करण्यातही फायदा असतो. ओलसर किंवा फुटलेल्या खेळपट्टीवर कधीकधी चेंडू फारच वळतो. अशा खेळपट्टीवर स्टंप्स्च्या डाव्या बाजूने ऑफ्‌ब्रेक चेंडू टाकल्यास तो वळून लेग्‌स्टंप्स्च्या बाहेर जातो. या चेंडूस फलंदाज त्रिफळाबाद किंवा पायचीत होणार नाही. अशा वेळी ऑफ्‌ब्रेक चेंडू स्टंप्स्च्या उजव्या बाजूने टाकल्यास तो वळून स्टंप्स्मध्ये जाऊ शकतो.

उजव्या हाताच्या ऑफ्‌ब्रेक गोलंदाजास स्टंप्स्च्या उजव्या बाजूने गोलंदाजी करण्यात आणखी दुसरेही काही फायदे असतात. (१) चेंडू टाकताना त्याला आपला उजवा खांदा व उजवे शरीर फिरविण्यास अधिक वाव मिळून चेंडू वेगाने टाकता येतो. (२) गोलंदाजीच्या पद्धतीत तालबद्धता आणणे सोपे जाते. (३) चेंडूवर अधिक ताबा राहून अचूक चेंडूच्या टप्प्यांच्या जागीं चेंडू टाकणे सोपे जाते. (४) मधल्या स्टंप्‌वर टाकलेला सरळ चेंडू ऑफ्‌स्टंप्‌वर जातो. (५) डावखुऱ्या फलंदाजास ऑफ्‌कडे चेंडू टाकणे सोपे जाते. अशा कारणांमुळे खेळपट्टी ठणठणीत असतानासुद्धा ऑफ्‌ब्रेक गोलंदाज स्टंप्स्च्या उजव्या बाजूने गोलंदाजी करतो.

ऑफ्‌ब्रेक व मध्यमगती गोलंदाजांनी कधी स्टंप्स्च्या डाव्या बाजूने तर कधी स्टंप्स्च्या उजव्या बाजूने गोलंदाजी करावी. म्हणजे गोलंदाजीत विविधता आणता येईल. परंतु त्यासाठी प्रथम सरावात स्टंप्स्च्या दोन्ही बाजूंनी गोलंदाजी करून पाहावे.

लेग्‌ब्रेक गोलंदाजाने स्टंप्स्च्या उजव्या बाजूने गोलंदाजी करण्यात फायदा नाही. कारण चेंडू अधिक वळून स्टंप्स्च्या बाहेर जातील. याउलट स्टंप्स्च्या डाव्या बाजूने अधिक वळणारे लेग्‌ब्रेक चेंडू स्टंप्स्मध्ये जातील. तेव्हा लेग्‌ब्रेक अधिक वळत असतील तर ते स्टंप्स्च्या डाव्या बाजूने टाकावेत आणि अगदी कमी वळत असतील तर ते स्टंप्स्च्या उजव्या बाजूने टाकण्यास हरकत नाही.

डावखुऱ्या गोलंदाजाचा आउटस्विंग् व आउटकटर् स्टंप्सूच्या उजव्या बाजूने टाकल्यास साहजिकच फलंदाजास खेळण्यास कठीण जातात. मंदगती डावखुऱ्या गोलंदाजाने आपले लेग्‌ब्रेक स्टंप्स्च्या डाव्या बाजूनेच

टाकावेत. त्याने फक्त डावखुऱ्या फलंदाजास स्टंप्स्च्या उजव्या बाजूने गोलंदाजी करावी. म्हणजे त्यास फलंदाजास ऑफ्च्या बाजूस चेंडू टाकणे सोपे जाईल.



स्टंपच्या डाव्या व उजव्या बाजूने टाकलेले लेगब्रेक चेंडू

आता सराव करा. सरावात स्टंप्स्जवळून, स्टंप्स्च्या दुरून, स्टंप्स्च्या डाव्या किंवा उजव्या बाजूने चेंडू टाकून पाहा. त्यामुळे तुमच्या गोलंदाजीत विविधता आणता येते प्रत्यक्ष पाहा. × × ×

चेंडूच्या उंचीत बदल

झाला सराव ? निरनिराळे चेंडू टाकता येतील असे वाटू लागले

आहे ना ? होय ? मग ठीक आहे. आता मी तुम्हांला तुमच्या गोलंदाजीत आणखी विविधता कशी आणता येईल ते सांगतो.

मंदगती ऑफ्‌ब्रेक आणि लेग्‌ब्रेक गोलंदाज चेंडू किंचित उंचून टाकतात. चेंडूची उंची कमीअधिक करता येते. चेंडूची उंची बदलून गोलंदाजीत विविधता आणता येते, तसेच फलंदाजावर मातही करता येते.

चेंडू हवेत असताना त्याचा टप्पा कोठे पडेल याचा अंदाज फलंदाज बांधत असतो आणि तो टप्पा पडल्यावर कोणता फटका मारावयाचा याबद्दलचा निर्णय फलंदाज घेत असतो. फलंदाजाने अमुक एका जागी चेंडूचा टप्पा पडेल असा अंदाज केल्यावर त्या जागेच्या अलीकडे किंवा पलीकडे फूट-दीड फूट चेंडू पडल्यास त्याचा चेंडूच्या टप्प्याबद्दलचा अंदाज चुकेल. म्हणजे चेंडूला दिलेल्या उंचीमुळे फलंदाजाचा चेंडूच्या टप्प्याबद्दलचा अंदाज चुकू शकतो. असा फलंदाजाचा चेंडूच्या टप्प्याबद्दलचा अंदाज चुकविणाऱ्या चेंडूला चांगल्या उंचीचा चेंडू म्हणतात.



चांगल्या उंचीच्या चेंडूचा टप्पा

चेंडू 'ब' या ठिकाणी पडेल असा फलंदाजाने तर्क केला आणि प्रत्यक्षात चेंडू 'अ' किंवा 'क' या ठिकाणी पडल्यास, फलंदाजाचा चेंडूच्या टप्प्याबद्दलचा अंदाज चुकतो. अशा चेंडूस चांगल्या उंचीचा चेंडू म्हणतात.

एखाद्या वेळी फलंदाजास चेंडूपुढे झेप घेऊन खेळण्याचा मोह होतो. परंतु त्याचा चेंडूच्या टप्प्याबद्दलचा अंदाज चुकल्यामुळे तो चेंडू त्याच्या बॅटीमधून निसटतो व तो यष्टिबाद होतो. अशा चेंडूची उंची चांगली असल्यामुळे फलंदाज चकतो.

तुम्हांला माहीतच आहे की वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने टॉप्‌स्पिन चेंडू टाकल्यास तो फिरकीमुळे व वाऱ्याच्या दाबाने खेळपट्टीकडे अपेक्षेपेक्षा लवकर झुकतो आणि त्यामुळे फलंदाजाने अंदाज केलेल्या जागेच्या

अलीकडे तो फूट दीड फूट पडतो. याही चेंडूची उंची चांगली आहे असे म्हणावे लागेल.

एखाद्या वेळी गोलंदाज चेंडूला किंचित अधिक उंची देतो. परंतु तो चेंडू किंचित आखूड टप्प्यावर पडतो. या उंचून आलेल्या चेंडूला फलंदाज भुलतो व पुढे सरकून चेंडू मारतो. परंतु चेंडू किंचित आखूड टप्प्यावर पडल्यामुळे फलंदाज चेंडूच्या टप्प्यापर्यंत पोहोचू शकत नाही व त्याचा झेल उडतो. हासुद्धा चांगल्या उंचीचा चेंडू होय.

दुसऱ्या मजल्यावर किंवा रस्त्याच्या कडेला उभे राहून एखादे वाहन रस्त्यावरून वेगाने जात असलेले तुम्ही पाहिले तर त्या वाहनाच्या वेगाचा अंदाज तुम्हांला करता येतो. परंतु एखादे वाहन तुमच्या अगदी समोरून येत असेल तर त्या वाहनाच्या गतीचा अंदाज तुम्हांला करता येणार नाही. त्याप्रमाणे चेंडूची उंची फलंदाजाच्या उंचीपेक्षा तीनचार फूट अधिक असेल किंवा चेंडू फलंदाजाच्या डोळ्यांच्या पातळीपेक्षा दोनतीन फूट खालून येत असेल तर त्या चेंडूचा वेग, उंची व टप्पा यांबद्दलचा अंदाज बांधणे फलंदाजास विशेष कठीण जाणार नाही. परंतु चेंडू डोळ्यांसमोरून येत असेल किंवा डोळ्यांच्या पातळीइतकी साधारणपणे चेंडूची उंची असेल तर त्या चेंडूचा वेग, उंची व टप्पा यांबद्दलचा अंदाज बांधणे फलंदाजास कठीण जाईल. म्हणून चेंडूची उंची सुमारे सहा फूट असावी व ती एखादा फूट वर खाली करावी.

चेंडूची उंची मुख्यतः मनगटाने बदलावी. चेंडू फिरविताना मनगटाची हालचाल होते. त्याच वेळी मनगटाने चेंडू कमी-अधिक उंचीने सोडावा.

चेंडू नेहमीपेक्षा लवकर सोडल्यास किंवा हात शिरोबिंदूकडे पोहोचण्यापूर्वी चेंडू हातातून सोडल्यास तो अधिक उंचून जातो. तसेच चेंडू हातातून उशिरा सोडल्यास त्याची उंची कमी होते.

चेंडू टाकताना उजवा पाय वाकविल्यास चेंडूच्या उंचीत व मार्गात बदल होतो. चेंडू दोनतीन फूट अलीकडून टाकल्यास त्याच्या उंचीत बदल होईल. चेंडू टाकताना हात कानाच्या थोडा दुरून फिरविल्यास चेंडूची उंची बदलते.

चेंडूला अधिक उंची दिली की त्याचा टप्पा पुढे किंवा आपल्या जवळ पडेल असे फलंदाजास वाटते. म्हणून अधिक उंची दिलेला चेंडू

किंचित आखूड टप्प्यावर टाकावा. चेंडूला कमी उंची दिली की त्याचा टप्पा किंचित आखूड पडेल असे फलंदाजास वाटते. तेव्हा कमी उंची दिलेला चेंडू पुढे टाकावा.

अशा रीतीने चेंडूची उंची कमीअधिक करून मंदगती गोलंदाजास आपल्या गोलंदाजीत विविधता आणता येते. परंतु द्रुतगती आणि मध्यमगती गोलंदाज चेंडूला उंची देऊ शकत नाहीत. म्हणून त्यांना या प्रकारांने गोलंदाजीत विविधता आणता येणार नाही.

चेंडूच्या गतीमध्ये बदल

चेंडूच्या गतीमध्ये बदल करून गोलंदाजीत विविधता आणता येईल.

नेहमीपेक्षा चेंडू कमीअधिक वेगाने टाकता येणे शक्य आहे. परंतु चेंडूचा वेग बदलताना गोलंदाजाची धाव, चेंडू टाकण्याची पद्धत वगैरेंमध्ये फलंदाजास समजून येण्याइतका बदल असू नये.

फलंदाजाच्या नकळत किंवा शेवटपर्यंत फलंदाजाच्या लक्षात येणार नाही अशा पद्धतीने चेंडूच्या गतीमध्ये बदल केल्यास फलंदाजाचा फटका चुकणे किंवा फलंदाज त्या चेंडूस फटका लवकर किंवा उशिरा मारणे अगदी शक्य आहे. हेच नेमके चेंडूच्या गतीत बदल करून आपणांस साधावयाचे आहे.

कोणत्याही प्रकारच्या गोलंदाजास चेंडूच्या गतीमध्ये थोडाफार बदल करता येईल. आता चेंडूच्या गतीत कसा बदल करावयाचा ते सांगतो.

(१) चेंडू टाकण्यासाठी हात जितक्या वेगाने फिरतो त्यापेक्षा अधिक वेगाने मनगटाच्या साहाय्याने पंजा फिरू शकतो. आता हात उंच करून त्या हाताचा पंजा मागे वाकवा. चेंडू टाकताच हा पंजा मनगटाच्या साहाय्याने पुढे कमीअधिक वेगाने फेकून चेंडूचा वेग कमीअधिक करता येईल.

(२) मनगट न वाकविता पंजा सरळ ठेवून चेंडू टाकल्यास साहजिकच तो नेहमीपेक्षा कमी वेगाने जाईल.

(३) चेंडूचे बरोबर दोन भाग करा आणि उजव्या भागावर बोटे ठेवून चेंडू जोराने टाकला तरी तो कमी वेगाने जाईल.

(४) आपण नेहमी चेंडू बोटांत धरतो. तसा न धरता चेंडू तळहातात

धरला आणि कितीही वेगाने टाकला तरी तो हळू जाईल.

(५) आपण नेहमी चेंडू टाकावयाचा टप्पा डाव्या खांद्यावरून पाहतो. परंतु तो टप्पा डाव्या हाताच्या उजव्या बाजूने किंवा काखेच्या बाजूने पाहिल्यास उजव्या खांद्यास फिरण्यास भरपूर वाव मिळणार नाही व चेंडू नेहमीपेक्षा कमी वेगाने टाकला जाईल.

(६) आपण नेहमी उजवा पाय क्रिझला समांतर टाकतो. त्या पायाची बोटे फलंदाजाकडे रोखल्यास छाती चेंडू टाकण्यापूर्वीच फलंदाजाकडे रोखली जाईल व त्यामुळे चेंडू कमी वेगाने जाईल.

(७) उजवा खांदा व उजवे शरीर जोराने फिरवून चेंडू टाकला व फॉलो थ्रू न अडखळता घेतला तर चेंडू वेगाने जाईल.

चेंडूचा वेग बदलण्याचे प्रयोग प्रथम सरावात करावयास हवेत आणि त्यात पूर्णपणे यश मिळाल्यावर सामन्यात चेंडूची गती बदलण्यास हरकत नाही.



१३

डावखुरे गोलंदाज

छोट्या मित्रांनो, चेंडूचा टप्पा, फिरक, हवेतील मार्ग, उंची व गती यांमध्ये बदल घडवून गोलंदाजीत विविधता कशी आणावयाची हे मी तुम्हांस गेले दोनतीन दिवस सांगत आहे. ते या आपल्या डावखुऱ्या गोलंदाजांस समजले का ? मी आज त्यांच्याशीच बोलतो. या पाहू इकडे डावखुरे गोलंदाज. तुमच्यापैकी मध्यगमती गोलंदाज कोण आहेत ? तुम्ही ? हा घ्या नवीन चेंडू आणि प्रत्येकाने मला इन्स्वर्व्ह व इन्‌स्विंग् चेंडू टाकून दाखवा पाहू. शाबास ! चांगलेच वळविता की तुम्ही इन्‌स्विंग् चेंडू ! स्वाभाविकच आहे, डावखुऱ्या गोलंदाजास इन्स्वर्व्ह व इन्‌स्विंग् टाकायला सोपा जातो. तुमची इन्स्वर्व्ह व इन्‌स्विंग् टाकण्याची आणि उजव्या हाताच्या गोलंदाजाची आउटस्वर्व्ह, आउटस्विंग् टाकण्याची पद्धत सारखीच आहे. खरे ना ?

तुम्ही डावखुरे गोलंदाज इन्स्वर्व्ह व इन्‌स्विंग् टाकण्यासाठी पहिल्या दोन बोटांच्या मध्ये शिवण ठेवून चेंडू पकडता, अंगठा खालच्या बाजूस शिवणीवर ठेवता. होय ना ? चेंडू टाकताना तुमचा उजवा पाय डाव्या पायाच्या रेषेत पडून त्याची बोटे थर्ड् मॅन्‌कडे रोखलेली असतात आणि चेंडूची शिवण व पजा लेग्स्लिप्‌कडे रोखलेला राहतो. चेंडू टाकल्यानंतर उजवा हात उजव्या मांडीजवळून मागे व वर जातो आणि उजव्या हातामागोमाग डावा हात उजव्या मांडीपर्यंत फिरतो.

आता प्रत्येकाने आउटस्वर्व्ह व आउटस्विंग् चेंडू टाकून दाखवा पाहू.

थोडेफार वळतात. ठीक आहे. सरावाने अजून सुधारणा होईल. तुमची आउटस्वर्व्ह व आउटस्विंग् टाकण्याची आणि उजव्या हाताच्या गोलंदाजाची इन्स्वर्व्ह व इन्स्विंग् टाकण्याची पद्धत सारखीच आहे.

आउटस्वर्व्ह व आउटस्विंग् टाकण्यासाठी तुम्ही चेंडूवर बोटांची पकड कशी ठेवता ते पाहू द्या मला. मधले बोट शिवणीच्या मध्य भागी व पहिले बोट मधल्या बोटाजवळ आहे. खालून अंगठ्याने चेंडू धरला आहे. बरोबर आहे. आउटस्वर्व्ह व आउटस्विंग् चेंडू टाकताना तुमचा उजवा पाय लेग्च्या किंचित बाजूस पडून त्याची बोटे फलंदाजाकडे रोखलेली राहतात आणि चेंडूची शिवण व पंजा पहिल्या स्लिप्कडे रोखलेला राहतो. चेंडू टाकल्यावर उजवा हात उजव्या मांडीच्या बाजूने थोडा मागे जातो तर डावा हात डाव्या मांडीकडे फिरतो.

इन्स्विंग् चेंडू स्टंप्स्च्या डाव्या बाजूने टाकण्यास जसे सोयीस्कर जाते तसे आउटस्विंग् चेंडू स्टंप्स्च्या उजव्या बाजूने टाकणे अधिक फायदेशीर ठरते. चारपाच चेंडू एका बाजूस स्विंग् करून नंतर एखादा चेंडू दुसऱ्या बाजूस स्विंग् केला तर फलंदाज चकण्याची शक्यता अधिक असते. म्हणून चारपाच इन्स्विंग् चेंडू टाकून एखादा आउटस्विंग् चेंडू टाकणार असाल तर स्टंप्स्च्या डाव्या बाजूने गोलंदाजी करा आणि चारपाच आउटस्विंग् करून एखादा इन्स्विंग् करण्याचा तुमचा विचार असेल तर स्टंप्स्च्या उजव्या बाजूने गोलंदाजी केलेली बरी. इन्स्विंग् चेंडू ऑफ्स्टंप्च्या रेषेच्या बाहेर व आउटस्विंग् चेंडू स्टंप्स्मध्ये टाकण्याचा प्रयत्न करा. तसेच स्टंप्स् आणि रिटर्न क्रीझ् यांमधील जागेचा उपयोग करून चेंडूचा मार्ग मधुनमधून बदलण्यास विसरू नका.

आता मला जुना चेंडू 'कट' करून दाखवा पाहू. तुमची लेग्कटर टाकण्याची आणि उजव्या हाताच्या गोलंदाजाची ऑफ्कटर टाकण्याची पद्धत एकच आहे. तसेच तुमची ऑफ्कटर आणि उजव्या हाताच्या गोलंदाजाची लेग्कटर टाकण्याची पद्धत एकच आहे.

आता डावखुऱ्या मंदगती गोलंदाजांनी फिरकी चेंडू टाकवेत. ठीक आहे. तुमचे चेंडू चांगले वळतात. परंतु अजून मनगटाचा अधिक उपयोग केल्यास चेंडू जास्त वळेल. आणखी सर्वच्या सर्व चेंडू अचूक चेंडूच्या टप्प्याच्या जागी टाकता आले पाहिजेत, बरे का !

तुम्हांस माहीतच आहे की, तुमची लेग्ब्रेक टाकण्याची व उजव्या हाताच्या गोलंदाजाची ऑफ्ब्रेक टाकण्याची पद्धत एकच आहे. तसेच तुमच्या ऑफ्ब्रेक, टॉपस्पिन् व गुगली टाकण्याच्या व उजव्या हाताच्या गोलंदाजाच्या लेग्ब्रेक, टॉपस्पिन् व गुगली चेंडू टकण्याच्या पद्धती एकच आहेत. परंतु तुमचा गुगली चेंडू लेग्ब्रेकसारखा वळतो व उजव्या हाताच्या गोलंदाजाचा गुगली ऑफ्ब्रेकसारखा वळतो. होय ना ?



लेग्ब्रेक

डावखुऱ्या मंदगती फिरकी गोलंदाजाने लेग्ब्रेक टाकताना चेंडूवर बोटांची पकड अशी ठेवावी.

तुम्ही कोणत्या पायाने गोलंदाजी सुरू करता? लक्षात आहे का ? बहुतेक डावखुरे गोलंदाज उजव्या पायाने धाव सुरू करतात. अर्थात कोणत्याही पायाने धाव सुरू करा. पण कोणत्या पायाने तुम्ही धाव सुरू करता हे तुम्हांस माहीत पाहिजे.

आता मी सांगतो त्या दोन गोष्टी तुम्ही कटाक्षाने टाळा.

(१) काही डावखुरे गोलंदाज चेंडू टाकताना उजव्या हाताचा संपूर्ण उपयोग करीत नाहीत. म्हणजे ते उजवा हात वर उंच नेऊन तो फलंदाजाकडे खाली जोराने फेकत नाहीत. त्यामुळे डावा हात कार्यक्षमतेने वर फिरण्यास उजव्या हाताची मदत होत नाही किंवा चेंडू केवळ डाव्या हाताने फेकला जातो.

(२) काही डावखुरे गोलंदाज सुरुवातीपासूनच शरीर तिरपे ठेवून धाव घेतात. त्यामुळे चेंडू टाकण्यास शेवटी शरीरास जास्तीत जास्त गतिवेग मिळत नाही.

तुम्हांस मी आणखी एक नवीन चेंडू सांगतो.त्या चेंडूस 'आर्मर्' म्हणतात हा चेंडू 'विथ द आर्म्' टाकावयाचा असतो.म्हणजे डाव्या हाताची विशेष मदत घेऊन हा चेंडू टाकावयाचा असतो. चेंडूची शिवण पहिल्या दोन बोटांमध्ये ठेवून चेंडू पकडावा. चेंडू टाकताना शिवण व पंजा लेग्स्लिप्कडे रोखून सबंध हाताने विशेष जोर देऊन चेंडू टाकावा. चेंडू खेळपट्टी-

वर पडताना त्याची शिवण लेग्स्लिपकडे रोखली गेली असल्यास तो चेंडू आपोआप आतमध्ये वळेल. सुमारे महिनाभराच्या सरावाने हा चेंडू तुम्हांस टाकता येईल.

डावखुऱ्या गोलंदाजाचा लेग्ब्रेक

चेंडू टाकण्यापूर्वी डाव्या पायाची बोटे मिड्ऑन्ला रोखली आहेत. चेंडू टाकावयाच्या टप्प्याकडे गोलंदाज उजव्या खांद्यावरून पाहत आहे. उजवा हात सरळ वर नेला आहे. चेंडू टाकल्यावर उजव्या पायावर शरीराचा भार आणून डावा खांदा फलंदाजाकडे व छाती मिड्ऑन्कडे रोखली आहे. उजव्या हातामागोमाग डावा हात जात आहे.

निरनिराळ्या दिशांस वळणारे आर्मर् आणि लेग्ब्रेक चेंडू तुम्हांला टाकता आले म्हणजे तुमचे पुष्कळच काम झाले. हे दोन्ही चेंडू सहजतेने तुम्हांस टाकता येतात. त्यामुळे या दोन चेंडूंवर ताबा मिळविणे तुम्हांस फारसे कठीण जाणार नाही. अर्थात अचूक चेंडू टाकण्याचे आणि मोठा कोन करून चेंडू वळविण्याचे सामर्थ्य, चेंडूला स्वाभाविकपणे दिलेली योग्य उंची आणि चेंडूचा मार्ग, उंची व गती बदलण्याची हातोटी यांवरच तुमची किंमत ठरणार आहे.

मुख्यत: आर्मर् आणि लेग्ब्रेक या दोनच चेंडूंचा वापर करणाऱ्या गोलंदाजाने स्टंप्स्च्या डाव्या बाजूने गोलंदाजी करावी. अशा गोलंदाजास ठणठणित खेळपट्टीवर फलंदाजास एका बाजूस जखडून ठेवणे सहज जमते. ठणठणित खेळपट्टीवर चेंडू वळणार नसल्यामुळे ऑफ्ला अधिक क्षेत्ररक्षक ठेवून गोलंदाजाने चेंडू ऑफ्स्टंप्च्या रेषेत किंवा ऑफ्स्टंप्च्या किंचित बाहेर टाकावेत म्हणजे धावा रोखल्या जातील. नंतर चेंडूची उंची, मार्ग व गती यांमध्ये बदल करून फलंदाजास चकविण्याचा प्रयत्न करावा. ओलसर किंवा फुटलेल्या खेळपट्टीवर तर ुमचा चेंडू चांगलाच वळेल. फिरक, अचूकता व चेंडूची योग्य उंची यांमुळे फुटलेल्या खेळपट्टीवर तुम्ही



डावखुऱ्या मंदगती गोलंदाजासाठी क्षेत्ररचना

फलंदाजास फारच अडचणीत टाकू शकाल. तेव्हा ठणठणित, तसेच फुटलेल्या खेळपट्टीवर तुमची गोलंदाजी उपयुक्त ठरते. म्हणून तुमच्यासारखा गोलंदाज संघात असावा असे कोणासही वाटेल.

तुमच्यापैकी काही गोलंदाज लेग्ब्रेक, ऑफ्ब्रेक, टॉपस्पिन् व गुगली चेंडू टाकण्याचा प्रयत्न करतात. कठीण गोष्ट आहे ही, परंतु कठीण गोष्ट सहजतेने करता आली म्हणजे त्याचे फळही चांगले मिळते.

तुम्ही जो ऑफ्ब्रेक टाकता त्यास 'चायनामन्' असेही नाव आहे. हा चायनामन् जर फार मोठा वळत असेल तर तुम्हांस स्टंप्स्च्या उजव्या बाजूने गोलंदाजी करणे सोयीस्कर जाईल.

संघाच्या गोलंदाजीत विविधता आणण्यासाठी तुमच्यासारख्या डावखुऱ्या गोलंदाजाचा संघात समावेश करणे आवश्यक असते. तसेच डावखुरे गोलंदाज उजव्या हाताच्या गोलंदाजाच्या मानाने फारच थोडे असतात. म्हणून तुमच्यासारख्या डावखुऱ्या गोलंदाजास पुढे मोठमोठ्या संघात प्रवेश मिळविणे कठीण जाणार नाही.

आता सराव झाल्यावर आपण बोलू या. × × ×

आगामी योजना

छोट्या मित्रांनो, या सर्व इकडे. गेली दोन वर्षे आणि या वर्षाच्या सुरुवातीस मी तुम्हांला कौशल्यपूर्ण गोलंदाजी कशी करावी हे विशद करून सांगितले. या कौशल्याच्या व नैपुण्याच्या जोरावर तुम्ही फलंदाजावर मात करू शकाल आणि हाच फलंदाजास बाद करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे.

परंतु याबरोबरच फलंदाजास बाद करण्यासाठी खेळपट्टी, आणि फलंदाजी यांविषयी तुम्ही अधिक अभ्यास करावयास हवा. खेळपट्टीस साजेशी गोलंदाजी केल्यास तुमची गोलंदाजी अधिक प्रभावी होईल. तसेच फलंदाजाच्या खेळातील दोष शोधून काढून व त्या दोषाचा फायदा घेऊन गोलंदाजी केल्यास तुम्हांस फलंदाजास लवकर बाद करता येईल.

आता महिनाभर तुम्ही मन लावून सराव करा. महिन्यानंतर तुमचे सामने सुरू होतील. मग आपण खेळपट्टी आणि फलंदाजाचे दोष यांविषयी चर्चा करू. चला, जाऊ या घरी.



१४

खेळपट्टीची मदत

छोटया मित्रांनो, गेला महिनाभर सराव अगदी झटून केलेला दिसतो. तुम्ही अधिक आत्मविश्वासाने गोलंदाजी टाकीत आहात. शिवाय चेंडूचा मार्ग, उंची व गती यांमध्ये बदल करण्याची सवयही तुम्ही लावून घेतली आहे. बरे, तुमचे रविवारचे सामने सुरू झाले का ?' हं, मग उद्या रविवारी कोणत्या मैदानावर सामना खेळणार आहात ? त्या मैदानावरील खेळपट्टी कशी आहे ? गोलंदाजी करताना खेळपट्टी-कडून मदत घेतली पाहिजे. परंतु खेळपट्टी अजमावता आली तरच खेळपट्टीकडून मदत घेता येईल. शिवाय खेळपट्टीने आपल्याला मदत केली नाही तर काय करावयाचे ? अशा वेळी फलंदाजास खेळपट्टीचा फायदा मिळू नये यासाठी काहीतरी उपाययोजना केली पाहिजे. आता खेळपट्टीबद्दल तुम्हांस सविस्तर माहिती सांगतो, म्हणजे उद्याच्या व पुढील प्रत्येक सामन्यात तुम्हांस त्याचा उपयोग होईल.

तुम्ही टाकलेला चेंडू खेळपट्टीवर पडल्यानंतर काय होते ? एक : तो कमी किंवा अधिक वळतो. दुसरे : तो कमी किंवा अधिक वेगाने पुढे जातो. तिसरे : तो कमी किंवा अधिक वर येतो किंवा उसळतो. तेव्हा चेंडूचा टप्पा पडल्यानंतर त्याची दिशा, गती व उचल यांवरून खेळपट्टी कशी आहे ते ओळखावयाचे असते किंवा खेळपट्टी अजमावून चेंडू किती वळेल, किती वेगाने जाईल व किती उचल घेईल याचा अंदाज करावयाचा असतो.

काही खेळपट्टयांवर चेंडू अधिक वळतो. खेळपट्टी जितकी मऊ असेल, कोरडी होऊन फुटली असेल, ओलसर असेल तितका फिरवून टाकलेला किंवा 'कट्' केलेला चेंडू अधिक वळतो. काही वेळा चेंडू पडून पडून खेळपट्टीवरील मातीचे कण सुटे होतात व धूळ दिसू लागते. अशा खेळपट्टीवरसुद्धा चेंडू अधिक वळतो. चेंडू अधिक वळत असल्यास चेंडू थोडा पुढे टाकावा किंवा फलंदाजास पाय पुढे टाकून खेळावयास लावावे. परंतु त्यास चेंडूच्या अगदी टप्प्याजवळ येऊ दिल्यास तो चेंडू-वरील फिरक दाबून टाकू शकेल.

काही खेळपट्टयांवर चेंडू फारच थोडा वळतो. अशा खेळपट्टीवर चेंडू वळविण्यासाठी मनगटाचा उपयोग करावा. काही वेळा वेग कमी करून चेंडू फिरवून टाकल्यास तो अशा खेळपट्टीवर वळू शकेल. टणक व गुळगुळित खेळपट्टीवर तर चेंडू अजिबातच वळत नाही. अशा वेळी अधिक क्षेत्ररक्षक ऑफ्‌ला ठेवून तुम्ही चेंडू अगदी अचूकतेने आणि ऑफ्स्टंप्च्या रेषेत किंवा बाहेर टाकावयास हवेत. शिवाय चेंडूचा मार्ग, गती व उंची यांमध्ये बदल करून फलंदाजाचा अंदाज चुकविण्याचा प्रयत्न करावयास हवा.

हवेत बाष्प असेल, खेळपट्टीवर हिरवळ दाट व हिरवीगार असेल, खेळपट्टीवर दव पडलेले असेल किंवा ती किंचित दमट असेल तर नवीन चेंडू अधिक स्विंग् होतात. चेंडू अधिक स्विंग् होत असेल तर तो फलंदा-जास पुढे खेळावयास लावावा. परंतु प्रतिकूल परिस्थितीमुळे चेंडू कमी स्विंग् होत असतील तर स्टंप्स्‌मध्ये अचूक टप्प्याचे चेंडू टाकावेत.

चेंडू केवळ अधिक वळून उपयोग होणार नाही. तो वळून गतीने पुढे गेला तरच फलंदाजास खेळणे अवघड जाईल. चेंडू वळून गतीने जाण्यास मदत करणाऱ्या खेळपट्टीवर चेंडूच्या दिशेत अनपेक्षित बदल करून किंवा चेंडू कमीअधिक वळवून फलंदाजास चकविता येईल.

चेंडू वळून तो मंद गतीने पुढे जात असेल तर मात्र चेंडू पुढे टाकावा. किंचित आखूड टप्प्याचा चेंडू टाकू नका. मंदगती खेळपट्टीवर आखूड टप्प्याचा चेंडू फलंदाजास सहज मारता येतो. म्हणून अशा खेळपट्टीवर फलंदाजास पुढे पाय टाकून खेळावयास लावा. पुढे पाय टाकून चेंडू



१४

खेळपट्टीची मदत

छोट्या मित्रांनो, गेला महिनाभर सराव अगदी झटून केलेला दिसतो. तुम्ही अधिक आत्मविश्वासाने गोलंदाजी टाकीत आहात. शिवाय चेंडूचा मार्ग, उंची व गती यांमध्ये बदल करण्याची सवयही तुम्ही लावून घेतली आहे. बरे, तुमचे रविवारचे सामने सुरू झाले का ?' हं, मग उद्या रविवारी कोणत्या मैदानावर सामना खेळणार आहात ? त्या मैदानावरील खेळपट्टी कशी आहे ? गोलंदाजी करताना खेळपट्टी-कडून मदत घेतली पाहिजे. परंतु खेळपट्टी अजमावता आली तरच खेळपट्टीकडून मदत घेता येईल. शिवाय खेळपट्टीने आपल्याला मदत केली नाही तर काय करावयाचे ? अशा वेळी फलंदाजास खेळपट्टीचा फायदा मिळू नये यासाठी काहीतरी उपाययोजना केली पाहिजे. आता खेळपट्टीबद्दल तुम्हांस सविस्तर माहिती सांगतो, म्हणजे उद्याच्या व पुढील प्रत्येक सामन्यात तुम्हांस त्याचा उपयोग होईल.

तुम्ही टाकलेला चेंडू खेळपट्टीवर पडल्यानंतर काय होते ? एक : तो कमी किंवा अधिक वळतो. दुसरे : तो कमी किंवा अधिक वेगाने पुढे जातो. तिसरे : तो कमी किंवा अधिक वर येतो किंवा उसळतो. तेव्हा चेंडूचा टप्पा पडल्यानंतर त्याची दिशा, गती व उचल यांवरून खेळपट्टी कशी आहे ते ओळखावयाचे असते किंवा खेळपट्टी अजमावून चेंडू किती वळेल, किती वेगाने जाईल व किती उचल घेईल याचा अंदाज करावयाचा असतो.

काही खेळपट्टयांवर चेंडू अधिक वळतो. खेळपट्टी जितकी मऊ असेल, कोरडी होऊन फुटली असेल, ओलसर असेल तितका फिरवून टाकलेला किंवा 'कट्' केलेला चेंडू अधिक वळतो. काही वेळा चेंडू पडून पडून खेळपट्टीवरील मातीचे कण सुटे होतात व धूळ दिसू लागते. अशा खेळपट्टीवरसुद्धा चेंडू अधिक वळतो. चेंडू अधिक वळत असल्यास चेंडू थोडा पुढे टाकावा किंवा फलंदाजास पाय पुढे टाकून खेळावयास लावावे. परंतु त्यास चेंडूच्या अगदी टप्प्याजवळ येऊ दिल्यास तो चेंडू-वरील फिरक दाबून टाकू शकेल.

काही खेळपट्टयांवर चेंडू फारच थोडा वळतो. अशा खेळपट्टीवर चेंडू वळविण्यासाठी मनगटाचा उपयोग करावा. काही वेळा वेग कमी करून चेंडू फिरवून टाकल्यास तो अशा खेळपट्टीवर वळू शकेल. टणक व गुळगुळित खेळपट्टीवर तर चेंडू अजिबातच वळत नाही. अशा वेळी अधिक क्षेत्ररक्षक ऑफ्ला ठेवून तुम्ही चेंडू अगदी अचूकतेने आणि ऑफ्स्टंप्च्या रेषेत किंवा बाहेर टाकावयास हवेत. शिवाय चेंडूचा मार्ग, गती व उंची यांमध्ये वदल करून फलंदाजाचा अंदाज चुकविण्याचा प्रयत्न करावयास हवा.

हवेत बाष्प असेल, खेळपट्टीवर हिरवळ दाट व हिरवीगार असेल, खेळपट्टीवर दव पडलेले असेल किंवा ती किंचित दमट असेल तर नवीन चेंडू अधिक स्विंग् होतात. चेंडू अधिक स्विंग् होत असेल तर तो फलंदा-जास पुढे खेळावयास लावावा. परंतु प्रतिकूल परिस्थितीमुळे चेंडू कमी स्विंग् होत असतील तर स्टंप्स्मध्ये अचूक टप्प्याचे चेंडू टाकावेत.

चेंडू केवळ अधिक वळून उपयोग होणार नाही. तो वळून गतीने पुढे गेला तरच फलंदाजास खेळणे अवघड जाईल. चेंडू वळून गतीने जाण्यास मदत करणाऱ्या खेळपट्टीवर चेंडूच्या दिशेत अनपेक्षित बदल करून किंवा चेंडू कमीअधिक वळवून फलंदाजास चकविता येईल.

चेंडू वळून तो मंद गतीने पुढे जात असेल तर मात्र चेंडू पुढे टाकावा. किंचित आखूड टप्प्याचा चेंडू टाकू नका. मंदगती खेळपट्टीवर आखूड टप्प्याचा चेंडू फलंदाजास सहज मारता येतो. म्हणून अशा खेळपट्टीवर फलंदाजास पुढे पाय टाकून खेळावयास लावा. पुढे पाय टाकून चेंडू

मारल्यास, चेंडू मंद गतीने येणार असल्यामुळे त्याची बॅट अगोदर फिरून त्याचा झेल उडण्याची शक्यता राहील.

मंदगती खेळपट्टीवर टप्पा पडल्यानंतरची चेंडूची गती वाढविण्यासाठी मनगटाचा उपयोग करा आणि शरीराला शक्य तितक्या जोराने झोका देऊन मोकळेपणाने फॉलो थ्रू घ्या.

चेंडू न वळता तो अधिक वेगाने जाणाऱ्या खेळपट्टीवर फिरकी गोलंदाजापेक्षा वेगवान गोलंदाजच अधिक उपयोगी होतील.

फिरक व गती यांस अजिबात मदत न करणाऱ्या खेळपट्टीवर मात्र तुमचा खरा कस लागेल. या वेळी तुमची गोलंदाजी करण्याची तालबद्ध पद्धत व मोकळा फॉलो थ्रू तुमच्या उपयोगी पडतील. तसेच अचूकता, मनगटाचा उपयोग व चेंडूंत बदल करण्याची हातोटी तुमच्या कामी येईल.

चेंडूचा टप्पा पडून तो फार वर येत नसेल किंवा उसळत नसेल तर फलंदाजास पाय पुढे टाकून फटके मारणे सोपे जाते. तेव्हा अशा वेळी चेंडू पुढे टाकण्याचे संपूर्ण टाळावे व ते शक्य तो स्टंप्सच्या रेषेत टाकावेत. परंतु चेंडू टप्पा पडून वर येत असेल तर फलंदाजास पाय पुढे टाकून चेंडू खेळणे कठीण जाईल. म्हणून अशा खेळपट्टीवर चेंडू किंचित पुढे टाकावा किंवा फलंदाजास पाय पुढे टाकून चेंडू खेळावयास लावावेत.

चेंडू जितका उंचून टाकावा किंवा जितका खेळपट्टीला अधिक कोन करून टाकावा तितका त्यास खेळपट्टीकडून अधिक अडथळा किंवा प्रतिकार केला जाऊन तो अधिक वर येतो किंवा उसळतो. तेव्हा चेंडूस अधिक उंची दिल्यास तो टप्पा पडून अधिक वर येतो आणि चेंडूस



चेंडूची टप्पा पडल्यावर उचल

कमी उंची दिल्यास तो कमी वर उसळतो. तसेच हात शिरोबिंदूकडे नेऊन चेंडू टाकल्यास तो टप्पा पडल्यावर अधिक वर उसळतो आणि

हात कानापासून दूर ठेवून किंवा हात खालच्या पातळीवरून नेऊन आडव्या हाताने चेंडू टाकल्यास तो टप्पा पडल्यावर कमी उसळतो.

ओल्या खेळपट्टीवर चेंडू अधिक वळतो व केव्हा केव्हा अनियमित वर उसळतो. म्हणून अशा खेळपट्टीवर चेंडू शक्य तो पुढे टाकावा.

खेळपट्टी वाळत असताना तीवर फलंदाजी करणे फार कठीण असते. कारण अशा खेळपट्टीच्या गुडलेंग्थ् स्पॉट्वर ओलसर, फक्त पृष्ठभाग वाळलेली व कडक अशा निरनिराळ्या प्रकारच्या जागा एकमेकींजवळ असू शकतील आणि त्यामुळे चेंडू किती वळेल व किती फिरेल याचा फलंदाजास अंदाज करणे कठीण जाते. या परिस्थितीचा गोलंदाजाने शक्य तो लवकर खेळपट्टी पूर्ण वाळण्यापूर्वी, फायदा करून घेतला पाहिजे. निरनिराळ्या स्टंप्स्च्या रेषेत अचूक टप्प्याच्या चेंडूचा मारा करून फलंदाजास वाद करणे कठीण जाणार नाही.

थोड्या थोड्या वेळाच्या अंतराने खेळपट्टीत बदल होत असतो. तो काय बदल झाला आहे हे ओळखण्याचा तुम्ही प्रयत्न केला पाहिजे. खेळ-पट्टी अजमावून व खेळपट्टीची मदत घेऊन गोलंदाजी करावी. ज्या बाबतीत खेळपट्टी मदत करणार नसेल त्या बाबतीत उपाययोजना करून खेळपट्टीस मदत देण्यास भाग पाडावे. निदान खेळपट्टीचा फलंदाजास फायदा मिळू देऊ नये.

चेंडू टाकून खेळपट्टी कशी आहे हे तुमच्या लक्षात येईल. परंतु खेळपट्टी कशी असेल याबद्दलचा अंदाज करावा व तो अंदाज बरोबर आहे की नाही ते पडताळून पाहण्याचा प्रयत्न करावा. सराव करतानासुद्धा खेळपट्टी अजमावण्याचा प्रयत्न करावा. खेळपट्टीबदल अंदाज करण्याची व खेळपट्टी ओळखण्याची तुम्ही सवय केली पाहिजे.

उद्या तसेच पुढील प्रत्येक सामन्यात खेळपट्टी कशी वागते ते पाहा आणि खेळपट्टीला साजेशी व फलंदाजास अडचणीत टाकणारी गोलंदाजी करा. उद्या सामना संपल्यावर आपण सामन्याविषयी बोलू.



१५

फलंदाजीतील दोष हेरणे

छोट्या मित्रांनो, जिंकलात का सामना आज ? होय ? शाबास ! परंतु खेळपट्टी कशी वागली ? मॅटिंगची होती खेळपट्टी ? मग ? " सुरुवातीला खेळपट्टीवर चेंडू गतीनें गेला. नंतर हळुहळू मंद गतीने चेंड जाऊ लागला. पण चेंडू चांगले वळत होते आणि वरही येत होते." ठीक आहे. परंतु तुम्ही गडी बाद कसे केलेत इतक्या लवकर ?

" माझ्या आउटस्विंग्ला आघाडीचा फलंदाज स्लिप्स्मध्ये झेलबाद झाला."

" मी इन्स्विंग् टाकला तर त्याची दांडीच उडाली ! "

" माझ्या आउटकट्ला फलंदाजाचा झेल यष्टिरक्षकाने चांगलाच पकडला हं. "

" मी ओव्हरमधील शेवटचा चेंडू आर्मर टाकला तर तो पायचीत झाला. "

" मी तीन गडी बाद केले. उंची देऊन टाकलेल्या लेग्ब्रेकला एक यष्टिबाद झाला. किंचित हळू टाकलेल्या लेग्ब्रेकला दुसऱ्याने सिलीमिड् ऑफ्ला झेल उडविला. तिसरा टॉपस्पिन्ला पायचीत झाला."

" माझ्या मोठ्या ऑफ्ब्रेक्ला एकाने लेग्स्लिप्मध्ये झेल दिला. दुसऱ्यास ऑफ्ला सरळ चेंडू टाकला तर त्याने यष्टिरक्षकाकडे झेल दिला."

" शेवटचा गडी मी धावबाद केला. "

तुमच्या गोलंदाजीतील नैपुण्यामुळे तुम्ही भराभर फलंदाज बाद केलेत. आता फलंदाज बाद करण्याचा दुसरा मार्ग सांगतो. फलंदाजाच्या खेळातील दोष ओळखून व त्या दोषाचा फायदा घेऊन फलंदाजास बाद करता येते. दर शनिवारी मी तुम्हांस फलंदाजाच्या एकेका फटक्यातील दोष समजावून सांगेन. मग त्यास बाद कसे करावयाचे याबद्दल मी उपाय सुचवीन किंवा तुम्ही योजना आखा. × × ×

स्टान्स्

फलंदाजाच्या खेळावयास उभे राहण्याच्या पद्धतीवरून तुम्हांस त्याच्या फलंदाजीबद्दल काही अंदाज बांधता येतील.

(१) फलंदाज खेळावयास उभा राहिल्यावर त्याच्या शरीराचे वजन दोन्ही पायांवर अगदी सारखे विभागले न जाता एका पायावर अधिक वजन असण्याची शक्यता असते. त्याच्या शरीराचे वजन मागच्या पायावर अधिक असल्यास त्यास पुढे पाय नेऊन खेळणे सोपे जाते आणि पुढच्या पायावर अधिक वजन असल्यास त्यास मागे पाय नेऊन खेळणे सोपे जाते. काही फलंदाज गोलंदाजाने चेंडू टाकण्यापूर्वी क्षणभर आधी एका पायावरून दुसऱ्या पायावर शरीराचे वजन बदलतात.

(२) फलंदाज खेळताना न वाकता किंवा ताठ उभा राहत असेल तर त्यास पुढे पाय टाकून ड्राइव्ह मारणे किंवा वर येणाऱ्या आखूड चेंडूस स्क्वेअर कट् मारणे सोपे जाईल. परंतु तो फार वाकून उभा राहत असेल तर त्यास हे फटके नीटपणे मारता येणार नाहीत.

(३) फलंदाजाच्या बॅटीच्या दांड्यावरील दोन्ही हातांत अंतर असल्यास किंवा त्याने दोन्ही हातांनी बॅटीचा दांडा खालच्या बाजूस पकडल्यास त्यास फटके मारण्यासाठी बॅट मोकळेपणाने फिरविता येणार नाही. विशेषतः पुढे पाय टाकून ड्राइव्ह मारणे त्यास कठीण जाईल.

(४) फलंदाजाच्या हाताचे कोपर मिड्विकेटच्या बाजूस असल्यास लेग्च्या बाजूस फटके मारण्याकडे त्याचा अधिक कल असण्याची शक्यता असते.

थोडक्यात फलंदाजाच्या उभे राहण्याच्या पद्धतीवरून त्याला पुढे पाय टाकून की मागे पाय घेऊन खेळणे सोपे जाईल, त्याला ऑफ्कडे

की लेग्कडे फटके मारणे आवडेल, त्यास टप्पा पडून वर उसळलेले की विशेष वर न आलेले चेंडू खेळणे परवडेल, त्यास बाहेर वळणारे की आत येणारे चेंडू खेळणे अधिक चांगले जमेल, फटके मारण्याची त्यास हिंमत आहे की त्याने बचावात्मक पवित्रा घेतला आहे अशा एक ना अनेक बाबतींत तुम्हांस अंदाज करता येईल. × × ×

बॅट मागे उचलणे

काही फलंदाज ऑफ् स्टंप्च्या बाहेरून बॅट मागे व वर उचलतात तर काही ऑफ्स्टंप्च्या रेषेत किंवा मधल्या स्टंप्च्या रेषेत बॅट मागे उचलतात. फलंदाज ज्या दिशेने बॅट मागे उचलतो त्याच दिशेने तो बॅट खाली चेंडूकडे आणतो असे नव्हे. बॅट ऑफ्स्टंप्च्या बाहेरून मागे वर नेली तरी ती अगदी मागे वर नेल्यावर किंवा ती खाली आणण्यास सुरुवात करताना ती बॅट कदाचित ऑफ्स्टंप्च्या रेषेत असू शकेल. अशा तऱ्हेने बॅट ऑफ्स्टंप्च्या रेषेत असल्यास लेग्स्टंप्च्या किंचित बाहेर जाणारा चेंडू फलंदाजास पुढे पाय टाकून किंवा पाय मागे नेऊन नीट तटविता आणि ड्राइव्ह् किंवा ग्लान्स् करता येणार नाही. कारण त्यास ऑफ्स्टंप्वरून लेग्स्टंप्च्या बाहेर बॅट खाली तिरपी आणावी लागेल व त्यामुळे चेंडू बॅटीच्या मध्यावर न बसता तिच्या कडेला चाटून जाण्याची किंवा चेंडू बॅटीतून निसटण्याची शक्यता राहील. तेव्हा ऑफ्स्टंप्च्या रेषेतून बॅट खाली आणणाऱ्या फलंदाजास मधल्या स्टंप्च्या रेषेत टाकलेला इन्स्विंग् किंवा ऑफ्ब्रेक चेंडू खेळणे अवघड जाईल.

बॅट मागे वर नेऊन ज्या स्टंप्च्या रेषेकडून फलंदाज बॅट खाली चेंडूवर आणणार असेल त्या स्टंप्च्या रेषेपासून फूटभर ऑफ्ला किंवा फूटभर लेग्ला वळून जाणारा चेंडू गुडलेंग्थ् स्पॉटवर किंवा किंचित पुढे किंवा मागे टाकावा म्हणजे फलंदाजास तो चेंडू खेळणे कठीण जाईल. ही योजना सरळ बॅटीने मारणाऱ्या ड्राइव्ह् व ग्लान्स् या फटक्यांच्या किंवा डिफेन्सिव्ह् स्ट्रोक्स्च्या बाबतीतच वापरली पाहिजे.

ऑफ्स्टंप्च्या बाहेरून बॅट खाली आणणाऱ्या फलंदाजास लेग्स्टंप्च्या रेषेत यार्कर टाकून पाहा काय होते ते ! × × ×

चेंडूवरील नजर

फलंदाजाने गोलंदाजाच्या हातातून चेंडू सुटताना निरखून पाहिला तर त्यास गोलंदाजाने चेंडू कोणत्या दिशेस फिरविला आहे हे समजेल. परंतु जो फलंदाज गोलंदाजाच्या हाताकडे पाहत नाही किंवा चेंडूची फिरक पाहू शकत नाही त्यास कोणता चेंडू टाकाल ? "गुगली !" बरोबर आहे. अशा फलंदाजास टॉप्स्पिन्, स्विंग्, गोलंदाजाचा सरळ चेंडू किंवा ऑफ्ब्रेक गोलंदाजाचा लेग्कटर् हे चेंडूसुद्धा गोत्यात आणतील.

काही फलंदाज मंदगती गोलंदाजाचा चेंडू हवेत असताना त्याचा टप्पा कोठे पडेल याचा अंदाज करून चेंडू खाली खेळपट्टीवर येताना त्यावरील नजर सोडून देतात आणि अंदाज केलेल्या टप्प्यावर चेंडू पडेल असे गृहीत धरून चेंडू खेळतात, हे फलंदाज चेंडू निश्चित कोठे पडतो, कसा व किती वळतो हे पाहत नाहीत. अशा फलंदाजास तुम्ही कसे बाद कराल ? "चेंडूवरील फिरक कमी अधिक करून." हो, जमेलही. चेंडूची उंची बदलून अशा फलंदाजांचा चेंडूच्या टप्प्याबद्दलचा अंदाज साफ चुकविता येईल.

काही फलंदाज चेंडूला जोराने फटका मारण्याच्या भरात चेंडूचा टप्पा पाहत नाहीत. अशांना लोंबता चेंडूसुद्धा चुकीचा फटका मारण्यास पुरेसा होतो.

× × ×

पुढे पाय टाकून खेळताना

पुढे पाय टाकून चेंडू तटविताना किंवा ड्राइव्ह मारताना फलंदाज मुख्यत्वेकरून तीन चुका करण्याचा संभव असतो. (१) बॅट व पुढे टाकलेला पाय यांमध्ये पोकळी ठेवून चेंडूस स्टंप्स्वर जाण्यास वाट देणे. (२) चेंडूच्या रेषेत येऊन किंवा चेंडूच्या फिरकीबरोबर बॅट फिरवून न खेळण्यामुळे स्लिपमध्ये झेल देणे. (३) चेंडूच्या टप्प्याच्या अलीकडे पाय ठेवून तिरप्या बॅटीने चेंडू कोलणे.

(१) पुढे पाय टाकून फलंदाज चेंडू तटविताना किंवा ड्राइव्ह मारताना त्याची बॅट आणि पुढे टाकलेला पाय यांमध्ये अंतर राहण्याचा संभव असतो. हे अंतर किंवा पोकळी अनेक कारणांमुळे राहू शकते. फलंदाज आडव्या बॅटीने खेळत असेल, त्याला चेंडूच्या रेषेपासून किंवा बॅटी-

पासून दूर पाय टाकून खेळण्याची सवय असेल, चेंडूचा टप्पा कोठे पडेल किंवा चेंडू किती फिरेल हे न समजून त्याचा चेंडूच्या रेषेबद्दल अंदाज चुकला असल्यास त्याची बॅट व पाय यांमध्ये पोकळी राहू शकते.

काही फलंदाज चेंडू ऑफ्स्टंप्च्या बाहेर पडला असेल तर व काही फलंदाज चेंडू लेग्स्टंप्च्या रेषेत पडला असेल तर बॅट व पाय यांमध्ये पोकळी ठेवतात. तेव्हा फलंदाज पोकळी का व कोठे ठेवतो हे शोधून काढल्यावर त्या पोकळीतून चेंडू स्टंप्वर कसा घालवायचा याचा विचार करता येईल.

ऑफ्स्टंप्च्या बाहेरचा चेंडू खेळताना फलंदाजाचा पाय व बॅट यांमध्ये पोकळी राहत असेल तर ऑफ्स्टंप्च्या बाहेर टप्पा पडून स्टंप्स्कडे जाणारा इन्स्विंग्, ऑफ्ब्रेक, गुगली किंवा डावखुऱ्या गोलंदाजाचा आर्मर चेंडू पोकळीतून जाऊ शकेल. तसेच फलंदाज लेग्स्टंप्वरील चेंडूस पोकळी ठेवीत असेल तर लेग्ब्रेक गोलंदाजाचा टॉप्स्पिन् चेंडू पोकळीमधून सरळ स्टंप्वर जाऊ शकेल.

बॅट व पाय यांमध्ये पोकळी ठेवणाऱ्या फलंदाजाचा चेंडूच्या अधिक गतीचा किंवा योग्य उंचीचा अंदाज चुकला तर त्याची बॅट खाली चेंडूवर उशिरा येईल. म्हणजे बॅट व पाय यांमध्ये अंतर राहून बॅट खाली चेंडूवर उशिरा आली तर पोकळी मोठी राहते व त्यातून चेंडू सहज स्टंप्वर जाऊ शकतो. त्यासाठी लेट् इन्स्विंग्, ' डीप ' घेणारा टॉप्स्पिन्, वेगाने टाकलेला आर्मर, किंचित उंची देऊन व गती वाढवून टाकलेला ऑफ्ब्रेक वगैरेंपैकी एखादा चेंडू पोकळीमधून स्टंप्वर जाऊ शकेल.

बॅट आणि पाय यांमध्ये अंतर राहिल्यामुळे चेंडू खेळताना बॅट सरळ राहतेच असे नव्हे. बॅटचा दांडा फलंदाजाच्या बाजूस कललेला राहतो व तळ दुसऱ्या बाजूस. त्यामुळे या तिरप्या बॅटीच्या मधोमध चेंडू न बसता तो बॅटीच्या कडेला चाटून जाऊन स्लिप्मध्ये झेल उडण्याची शक्यता असते.

(२) चेंडूच्या टप्प्यापर्यंत बॅट नेऊन फलंदाजाने चेंडूवरील फिरक दाबली किंवा फलंदाज फिरकीच्या दिशेने चेंडू खेळला तर काहीच हरकत नाही. परंतु काही फलंदाज चेंडूचा केवळ हवेतील मार्ग लक्षात

घेऊन त्या मार्गाच्या रेषेत बॅट नेऊन चेंडू खेळतात. अशा रीतीने चेंडू पुढे खेळताना जर चेंडूचा टप्पा व बॅटमध्ये दहा बारा सेंटिमीटरचे अंतर राहिले तर वळणारा चेंडू बॅटीच्या कडेला चाटून जाऊन स्लिप्मध्ये झेल उडेल. तेव्हा केवळ चेंडूचा हवेतील मार्ग लक्षात घेऊन खेळणाऱ्या फलंदाजास मधल्या किंवा ऑफ्स्टंप्वर आउटस्विंग्, लेग्ब्रेक किंवा लेग्कटर् टाकावा. तसेच अशा फलंदाजास मधल्या किंवा लेग्स्टंपवरील इन्स्विंग्, इन्कटर् किंवा ऑफ्ब्रेक चेंडू खेळण्यास कठीण जाईल.

(३) पुढे पाय टाकून ड्राइव्ह मारताना फलंदाजाची बॅट अगदी चेंडूच्या टप्प्याजवळ जावयास हवी. फलंदाजाने पुढे टाकलेल्या पाया-जवळ चेंडूचा टप्पा पडल्यास त्याची बॅट चेंडूच्या टप्प्याजवळ सहज पोहोचू शकेल. परंतु फलंदाजाच्या पुढे टाकलेल्या पायाच्या पुढे कमीत कमी आठ दहा सेंटिमीटर्स चेंडूचा टप्पा पडून फलंदाजाने तो चेंडू पायाच्या पुढे बॅट नेऊन तडकविल्यास त्याचा झेल उडण्याचा संभव राहील. कारण बॅट पायाच्या पुढे नेल्यास ती तिरपी होऊन चेंडू कोलला जाईल. चेंडूच्या फसव्या उंचीमुळेच असा चुकीचा फटका मारण्यास फलंदाज उद्युक्त होईल. म्हणजे चेंडूच्या टप्प्यापर्यंत आपला पुढे टाक-लेला पाय पोहोचेल असे फलंदाजास वाटले पाहिजे, पण प्रत्यक्षात चेंडू थोडा आखूड टप्प्याचा पडावयास हवा.

× × ×

पाय मागे नेऊन खेळताना

पाय मागे नेऊन चेंडू तटविताना किंवा ड्राइव्ह मारताना फलं-दाजाच्या मुख्यत्वेकरून दोन चुका होऊ शकतात. (१) पॉपिंग् क्रीझ्-वरच उभे राहून खेळणे. (२) चेंडूच्या रेषेच्या दूर उभे राहून खेळणे.

(१) गुड्लेंग्थ् स्पॉटवरील किंवा किंचित आखूड टप्प्यावर पडलेला चेंडू पाय मागे नेऊन खेळावा लागतो. हा चेंडू पॉपिंग् क्रीझ्च्या दोन-अडीच फूट मागे जाऊन सुरक्षिततेने खेळता येतो. परंतु तसे न करता फलंदाज हा चेंडू पॉपिंग् क्रीझ्वर उभे राहून खेळला तर त्यास चेंडूचा टप्पा पडल्यापासून तो पाहण्यास व खेळण्यास पुरेसा वेळ मिळणार नाही व त्याची बॅट खाली चेंडूवर वेळेवर पोहोचणार नाही. त्यामुळे चेंडू बॅटीतून निसटून तो पायावर आदळेल किंवा स्टंप्वर जाईल. दोन-

तीन चेंडू नेहमीच्या गतीने टाकून त्याच टप्प्यावर एखादा चेंडू अधिक गतीने टाकल्यास फलंदाजाची बॅट आणखीनच उशिरा खाली येईल व चेंडू बॅटीतून निसटेल. त्यातच हा चेंडू आत वळणारा असेल तर तो फलंदाजास खेळणे अधिकच अवघड जाईल.

(२) काही फलंदाज चेंडूच्या रेषेजवळ मागील पाय नेऊन खेळत नाहीत. कदाचित चेंडू अनपेक्षितपणे बराच वळल्यामुळे, चेंडू वेगाने आल्यामुळे, चेंडू अचानक वर उसळल्यामुळे, चेंडूचा टप्पा, गती किंवा रेषा यांचा अंदाज न लागल्यामुळे किंवा चेंडूची दिशा लक्षात न घेता केवळ चेंडूच्या हवेतील मार्गाच्या रेषेत येऊन खेळल्यामुळे फलंदाजास आपला मागील पाय चेंडूच्या रेषेजवळ किंवा चेंडूजवळ नेता येत नाही. चेंडूच्या जवळ न गेल्यामुळे फलंदाजाची बॅट चेंडूजवळ सरळ पोहोचू शकत नाही किंवा चेंडू खेळताना फलंदाजाची बॅट तिरपी किंवा लटकत असलेली राहते. त्यामुळे चेंडू बॅटीच्या कडेला चाटून जाऊन स्लिप्मध्ये झेल उडण्याचा संभव असतो. फलंदाज चेंडूच्या रेषेजवळ का जाऊ शकत नाही हे शोधून काढल्यास त्यास बाद करणारा चेंडू शोधून काढणे जड जाणार नाही. अर्थात अशा फलंदाजास अधिक वेगाने बाहेर जाणारा चेंडू खेळण्यास कठीण जाईल. × × ×

स्क्वेअर कट्

ऑफ्स्टंप्च्या बाहेर पडलेला, आखूड टप्प्याचा चेंडू स्क्वेअरकट् करताना फलंदाजाच्या मुख्यत्वेकरून दोन चुका होण्याचा संभव असतो. (१) बॅटीचा दांडा खाली व तळ वर ठेवून चेंडूच्या खालच्या बाजूस फटकावणे. (२) उजव्या हाताच्या फलंदाजाने आपला डावा पाय जखडून ठेवून फटका मारणे.

(१) स्क्वेअरकट् मारताना बॅट वरून खाली आणून चेंडूच्या वरील भागावर आपटली पाहिजे, म्हणजे चेंडू जवळच जमिनीवर खाली पडेल. परंतु बॅटीचा दांडा खाली व तळ वर ठेवून किंवा बॅट खालून वर फिरवून ती चेंडूच्या खालच्या भागावर आपटल्यावर चेंडू वर उचलला जाईल व स्लिप्स्मध्ये, स्लिप्स्च्या मागे किंवा बॅकवर्ड पॉइंटला झेल उडेल. पायात किंवा खांद्यात वाकल्यामुळे किंवा चेंडू अपेक्षेपेक्षा अधिक

वर उसळल्यामुळे अशा तऱ्हेने चेंडूच्या खालच्या बाजूस बॅट मारली जाऊन झेल उडतो. ऑफ्स्टंप्च्या रेषेत चेंडूचा टप्पा पडून अधिक वर येणाऱ्या लेग्ब्रेक चेंडूस उजव्या हाताचा फलंदाज स्क्वेअर कट् करताना गोत्यात येतो.

(२) काही उजव्या हाताचे फलंदाज डावा पाय मागे जखडून ठेवून स्क्वेअरकट् मारतात. पाय मागे जखडल्यामुळे त्यांची बॅट चेंडूपर्यंत संपूर्ण पोहोचू शकत नाही व त्यांना फॉलो थ्रू नीट घेता येत नाही. त्यामुळे कधी त्यांच्या बॅटीच्या तळास चेंडू चाटून जाऊन यष्टिरक्षका-कडे झेल उडतो तर कधी फटका कच्चा बसून स्लिप्स्मध्ये झेल उडतो.

कधीकधी चेंडूचा टप्पा पडून तो किती वर उसळला आहे किंवा किती वेगाने येत आहे याचा बरोबर अंदाज न करता फलंदाज चेंडूच्या रोखाने बॅट फेकतो. त्यामुळे काही वेळा बॅटीच्या कडेला चेंडू चाटून जाऊन फलंदाजाचा झेल यष्टिरक्षकाकडे जातो.

आत येणाऱ्या चेंडूस स्क्वेअरकट् केल्यास काही वेळा चेंडू बॅटीला लागून स्टंप्स्वर आदळतो.

× × ×

पुलस्ट्रोक

स्टंप्स्मध्ये पडलेल्या आखूड टप्प्याच्या चेंडूला आडव्या बॅटीने लेग्ला पुलस्ट्रोक मारतात, हा फटका मारताना फलंदाजाच्या मुख्यत: दोन चुका होण्याचा संभव असतो. (१) बॅट खालून वर नेऊन चेंडूच्या खालच्या बाजूस मारणे. (२) स्टंप्स् मोकळ्या ठेवून फटका मारणे.

(१) काही फलंदाज बॅट विशेष मागे न उचलता हा फटका मारतात. त्यामुळे बॅट खालून वर फिरून ती चेंडूच्या खालच्या भागा-वर आपटते व चेंडू वर उचलला जातो. चेंडू फलंदाजाच्या उजव्या पायाच्या रेषेत असताना असा फटका मारला तर झेल मिड्विकेटला उडेल, चेंडू पोटासमोर ठेवून फटका मारला तर झेल स्क्वेअरलेग्ला उडेल आणि चेंडू डाव्या पायाच्या रेषेत असताना फटका मारला तर झेल फॉईन्लेग्ला उडेल. टप्पा पडून चेंडू वर जात असताना किंवा फिर-कीच्या विरुद्ध हा फटका मारण्यास फलंदाजास उद्युक्त करावे.

(२) काही फलंदाज आपला मागचा पाय आहे तेथेच ठेवून व

पुढचा पाय लेग्स्टंप्च्या बाहेर ठेवून हा फटका मारतात, त्यामुळे हा फटका मारताना स्टंप्स् मोकळ्या राहतात. अशा फलंदाजाचा चेंडूचा टप्पा, गती, उंची, दिशा किंवा टप्पा पडून चेंडूचे वर येणे यावद्दलचा अंदाज चुकला तर चेंडू त्याच्या बॅटीतून निसटून स्टंप्स्वर आदळेल.

× × ×

इतर फटके

(१) मंदगती गोलंदाजाने चेंडूस अधिक उंची दिली म्हणजे काही वेळा फलंदाज क्रीझ् सोडून चेंडूच्या टप्प्याजवळ येतो व ड्राइव्ह मारतो.

फलंदाजास लालूच दाखवून क्रीझ्च्या बाहेर खेचण्यातच गोलंदाजाचे खरे कौशल्य आहे. फलंदाज पुढे आल्यानंतर त्याच्या बॅटीतून चेंडू निसटला तर तो यष्टिवाद होऊ शकतो. त्याच्या बॅटीतून चेंडू सुटण्यासाठी चेंडूला योग्य उंची तर दिलीच पाहिजे, पण चेंडू अधिक वळला तरीही तो त्याच्या बॅटीतून सुटण्याचा संभव असतो.

काही फलंदाज गोलंदाजास बिचकविण्यासाठी चेंडू हातातून सुटण्यापूर्वीच क्रीझ् सोडून पुढे येतात. अशा वेळी प्रसंगावधान राखून चेंडू लेग् स्टंप्च्या अगदी बाहेर टाकून पाहा काय होते ते !

(२) कधीकधी लेट्कट् मारताना किंचित आतमध्ये व वेगाने येणारा चेंडू बॅटीच्या कडेला चाटून जाऊन स्टंप्स्वर आदळतो किंवा यष्टिरक्षकाच्या हातात जातो.

(३) पाय पुढे टाकून किंवा पाय मागे घेऊन चेंडू लेग् ग्लान्स् करताना फलंदाजास बॅट खाली चेंडूकडे फार तिरकी आणावी लागल्यास त्याचा झेल लेग्स्लिप्स्मध्ये उडतो. तसेच चेंडूची रेषा फलंदाजाच्या पायापासून दूर लेग्च्या बाजूस असल्यास फलंदाजास बॅट फारच तिरकी आणावी लागते. त्यामुळे चेंडू बॅटीच्या मध्यभागी न बसता कडेला चाटून जातो व झेल उडतो. मधल्या किंवा लेग्स्टंप्वर टाकलेला लेट् इन्स्विंग् किंवा मोठा ऑफ्ब्रेक चेंडू लेग्स्टंप्च्या बाहेर व पायापासून दूर जात असल्यामुळे असा चेंडू ग्लान्स् करताना फलंदाजाचा झेल लेग्-स्लिप्स्मध्ये उडण्याचा संभव असतो.

काही फलंदाजांस चेंडू लेग्ला ग्लान्स् करताना तो खाली दाबून जमिन

सरपटत टाकण्याचे जमत नाही. अशा फलंदाजास चेंडू टप्पा पडून वर जात असताना त्यास लेग्ग्लान्स् करावयास भाग पाडावे. म्हणजे त्यास तो चेंडू बॅटीने दाबून खाली टाकण्यास अधिकच कठीण जाईल.

(४) लेग्स्टंप्च्या रेषेतील मंदगती चेंडू फलंदाज पाय पुढे टाकून आडव्या बॅटीने लेग्ला स्वीप् करतो. चेंडूचा टप्पा जेथे पडतो तेथेच फलंदाज चेंडूस फटकावितो. त्यामुळे चेंडू जमिनीसरपटत जातो. तेव्हा किंचित आखूड टप्पा पडून वर येणाऱ्या चेंडूस स्वीप् मारण्यास फलंदाजास भाग पाडावे. म्हणजे त्याचा झेल लेग्ला उडण्याचा संभव राहील. तसेच फलंदाजास फिरकीच्या विरुद्ध हा फटका मारण्यास उद्युक्त करावे. म्हणजे उजव्या हाताच्या फलंदाजास योग्य उंची दिलेला, अधिक वळणारा व किंचित आखूड टप्प्याचा लेग्ब्रेक चेंडू स्वीप् .मारण्यास द्यावा. × × ×

गेले दोन-अडीच महिने दर शनिवारी मी तुम्हांस फलंदाजाच्या एकेका फटक्याचे दोष समजावून सांगितले आणि त्या दोषांमुळे फलंदाजास कोणता चेंडू खेळण्यास कठीण जाईल किंवा तो कोणत्या चेंडूस बाद होऊ शकेल हे सांगितले. फलंदाजाइतकेच गोलंदाजास फलंदाजीच्या शास्त्राचे व तंत्राचे ज्ञान असावे लागते. कारण त्यास अगदी थोड्या वेळात आणि सहजासहजी फलंदाजाचे दोष शोधून त्यास बाद करण्यासाठी कोणता चेंडू टाकावयाचा हे ठरवावे लागते.

उद्या रविवार. सामना आहे ना ? मग आता आपण उद्या संध्याकाळी गप्पा मारू या. × × ×

रविवारच्या सामन्यातील गोलंदाजी

छोट्या मित्रांनो, जिंकलात का सामना ? शाबास ! आज तुम्ही गडी कसे बाद केले ते सांगा पाहू.

" पाय मागे नेऊन फलंदाजास चेंडू नीट अडविता येत नव्हता. बॅट लटकत ठेवून तो चेंडू तटवायचा. म्हणून मी किंचित आखूड टप्प्यावर आउटस्विंग् चेंडू टाकून तो थोडा वर उडविला. तेव्हा फलंदाज गडबडला व त्याने कसातरीच चेंडू अडविला आणि गलीमध्ये सोपा झेल दिला. "

" मी चेंडू टाकण्यापूर्वीच फलंदाज मधल्या स्टंप्समोर येऊन उभा राहत असे. परंतु त्यामुळे त्याची लेग्स्टंप् उघडी राहिलेली मला दिसायची. मी लेग्स्टंप्वर जाणारे आउटस्विंग् व इन्स्विंग् चेंडू टाकून पाहिले. पण उपयोग झाला नाही. शेवटी लेग्स्टंप्च्या रेषेत वेगाने जाणारा सरळ चेंडू ओव्हरपिच्ड् टाकला. त्याला काहीच करता आले नाही ! "

" माझे बहुतेक चेंडू फलंदाज मागे पाय नेऊन खेळत होता आणि खेळताना प्रथम पाय मागे नेऊन नंतर बॅट ऑफ्स्टंप्च्या बाहेरून चेंडूवर खाली तिरपी आणीत होता. पायचीत होता होता फलंदाज दोनदा वाचला. मग मी त्याला दोन आउटस्विंग् चेंडू नेहमीच्या गतीने टाकले. नंतर एक अधिक वेगाने स्टंप्वर जाणारा इन्स्विंग् चेंडू थोडासा पुढे टाकला. तो चेंडू मात्र त्याच्या बॅटीतून सुटला व पायावर आदळला. "

" फलंदाज माझे बहुतेक चेंडू पुढे पाय टाकून खेळत होता. मी त्याला तीनचार इन्कटर्स् टाकले. ते तो पुढे पाय टाकून खेळला. मी पुढचा चेंडू त्याच टप्प्यावर आउटकटर् टाकावयाचे ठरविले. परंतु तो चेंडू अपेक्षेपेक्षा आखूड टप्प्यावर पडला. तेव्हा फलंदाजाने घाईने पाय मागे नेऊन ड्राइव्ह मारला. पण चेंडू त्याच्या उजव्या पायापुढे असताना टोलविल्यामुळे तो उचलला गेला व त्याचा झेल कव्हर्मध्ये उडाला. "

" माझा ऑफ्ब्रेक चेंडू चुकून फुलटॉस् पडला तो फलंदाजाच्या पायावरच आदळला व तो पायचीत झाला. "

" फलंदाज बॅट मागे न उचलताच धीमेपणाने चेंडू तटवीत होता. त्याला एक लोंबता लेग्ब्रेक चेंडू ड्राइव्ह मारण्यास दिला. तेव्हा त्याने बॅट मागे न उचलताच लगावला ड्राइव्ह आणि माझ्या हातात झेल दिला. "

" पुढे पाय टाकून खेळताना फलंदाज मागचा पाय गुडघ्यात फारच वाकवीत होता. त्यामुळे खेळताना त्याची बॅट पुढच्या पायापुढे येत असे. मी त्याला दोनतीन अधिक वेगाने, कमी उंची देऊन लेग्ब्रेक चेंडू टाकले. न. तर एक गुगली चेंडू मधल्या स्टंप्वर टाकला. हा चेंडू पूर्वीच्या

चेंडूपेक्षा हळू गेल्यामुळे त्याचा फॉर्वर्ड् शॉर्ट् लेग्‌ला झेल उडाला."

"मी अधिक उंची देऊन एक ओव्हरपिच्ड् लेग्‌ब्रेक चेंडू टाकला. पण त्या चेंडूचा टप्पा पॉपिंग् क्रीझ्‌जवळ पडला. फलंदाजाने जोराने बॅट फिरविली. परंतु चेंडू बॅटीतून निसटला, यार्कर झाला व त्रिफळा उडाला!"

"मी पहिल्या ओव्हरमध्ये सगळे लेग्‌ब्रेक चेंडू टाकले. दुसऱ्या ओव्हरमध्ये मी एक आर्मर सोडला. फलंदाजाने चेंडूच्या रेषेतच पुढे पाय टाकला. बॅट बाजूलाच राहिली व फलंदाज पायचीत झाला."

"शेवटचा फलंदाज चेंडू टाकण्यापूर्वी क्रीझ् सोडून पुढे आला. तेव्हा मी चेंडू आखडून ऑफ्‌स्टंप्‌च्या अगदी बाहेर टाकला. बॅटीतून चेंडू निसटला व फलंदाज यष्टिवाद झाला."

तुम्हांला खरोखर आज शाबासकी दिली पाहिजे. एकतर, तुम्ही गोलंदाजीच्या कौशल्याचा पुरेपूर उपयोग करीत आहात. दुसरे' फलंदाजाच्या खेळातील दोष शोधण्याचा प्रयत्न करीत आहात आणि तिसरे, फलंदाजास बाद करण्यासाठी योजनापूर्वक गोलंदाजी करण्याचा प्रयत्न करीत आहात.

आता या वर्षाचा तुमचा क्रिकेटचा मोसम जवळजवळ संपत आला आहे. पुढल्या वर्षी आणखी काही नवीन शिकता येते का पाहू.

१६

द्रुतगती गोलंदाजी

छोटया मित्रांनो, यंदाचा सराव सुरू होऊन किती दिवस झाले ? महिना झाला, होय ? जाळयातील सरावाचे हे तुमचे चौथे वर्ष, नाही का ? तुम्ही आता सोळासतरा वर्षांचे झाला आहात. या वर्षी अकरावीत ना ? मग यंदा अभ्यास आणि खेळ या दोन्ही गोष्टींत अधिक तडफ दिसली पाहिजे.

आज मी तुमच्यामधील मध्यमगती गोलंदाजांशी किंवा भावी द्रुतगती गोलंदाजांशी थोडेसे बोलणार आहे.

गेले तीन वर्षे तुम्ही गोलंदाजी करीत आहात. या तीन वर्षांत तुमच्या गोलंदाजीचा वेग हळुहळू वाढला आहे, खरे ना ? असाच तो वेग हळुहळू वाढत जाईल आणि तीनचार वर्षांतच तुमच्या चेंडूस द्रुत गती येईल. परंतु त्यासाठी तुम्हांस अतोनात कष्ट व खडतर प्रयत्न करावा लागेल.

आतापर्यंत तुम्ही मध्यमगती गोलंदाजीबाबत जे जे आत्मसात केले आहे ते ते तुमच्याजवळ जपून ठेवा. तुमची सहज व तालबद्ध धाव, शास्त्रशुद्ध चेंडू टाकण्याची पद्धत आणि मोकळा फॉलो थ्रू या गोष्टी बरोबर आहेत की नाही ते वारंवार तपासून पाहा. जसजशी तुमची उंची व ताकत वाढेल तसतसा तुमच्या चेंडूला अधिक वेग येईल.

पुढील तीनचार वर्षांत तुमची धाव आहे यापेक्षा शेवटी अधिक वेगवान झाली पाहिजे. धावेला शेवटी अधिक वेग व जोर आल्यावर तुमची डाव्या पायावरची उडी उंच व लांब पडेल, मागचा किंवा उजवा

पाय जमिनीवर पडल्यावर पुढचा किंवा डावा पाय अधिक उंच जाईल आणि शेवटचे पाऊल लांब किंवा मोठे पडेल. यामुळे फॉलो थ्रू आहे यापेक्षा अधिक पावले घ्यावा लागेल. चेंडू टाकण्याची पद्धत अधिक चपळ, जलद व रेखीव, तसेच फॉलो थ्रूही अधिक उठावदार होईल.

हे सर्व करण्यासाठी तुम्हांस सराव तर करावयास हवाच, शिवाय तुम्ही आपला दम वाढविला पाहिजे. रोज मैल दोन मैल पळले पाहिजे. पुढेपुढे तर रोज चारपाच मैल पळण्याची सवय करावयास हवी. तसेच शरीर तन्दुरुस्त ठेवण्यासाठी इतर व्यायाम करणेही आवश्यक आहे. स्नायू कडक व पीळदार होतील असा मात्र व्यायाम नको. प्रत्येक स्नायूत जोम येईल, परंतु तो लवचीक राहील असा काहीतरी सोयीस्कर व्यायाम करावयास हवा. हाडे व सांधे बळकट असतील तरच गोलंदाज टिकाव धरून राहील. तुमची उंची वाढविण्यासाठी तुम्हांस विशिष्ट प्रकारचा व्यायाम घ्यावा लागेल. द्रुत गतीने चेंडू टाकण्यास सहा फुटां-पेक्षा तुम्ही उंच झालेच पाहिजे असे नाही. सहा फुटांपेक्षा थोडी कमी उंची असली तरी चालेल. द्रुतगती गोलंदाज होण्यास अगदी उंचेपुरे व जाडजूड शरीर असावे लागतेच असे नव्हे, पण तो गोलंदाज निदान मध्यम उंचीचा, कणखर, धट्टाकट्टा व दमदार पाहिजे.

चेंडू द्रुत गतीने टाकण्यासाठी गोलंदाजाच्या रक्ताचा प्रत्येक थेंब आणि प्रत्येक मज्जातंतूची शीर उपयोगी पडली पाहिजे. आक्रमक पद्धतीने आणि आक्रमक वृत्तीने गोलंदाजी करणे हे खऱ्या द्रुतगती गोलंदाजाचे कर्तव्य आहे. त्यासाठी जिवाचा जितका आटापिटा करता येईल तितका त्याने केला पाहिजे.

चेंडू द्रुत गतीने टाकला तरी तो अचूकनेने किंवा गोलंदाजास पाहिजे त्या टप्प्यावर सहजतेने टाकता आला पाहिजे. द्रुत गतीने पण वेडावाकडा चेंडू टाकणाऱ्या गोलंदाजाचे हाल कोणताही चांगला फलंदाज करू शकतो. म्हणून चेंडूची गती वाढविताना अचूकतेचा विसर पडू नये.

चेंडू द्रुत गतीने टाकण्यासाठी तो बोटांत तर पकडलाच पाहिजे, शिवाय मनगटाचा जास्तीत जास्त उपयोग करावयास हवा. मनगटाचा उपयोग करून किंवा मनगटाला हिसका देऊन चेंडू स्विंग् होत नाही.

खरोखरीचा द्रुतगती चेंडू स्विंग् होतच नाही. परंतु चेंडूने जरी अगदी थोडी दिशा बदलली तरी तो चेंडू फलंदाजास खेळण्यास अत्यंत अवघड जाईल.

द्रुतगती गोलंदाजास चेंडूचे टप्पे बदलण्यास भरपूर वाव असतो. तो यॉर्कर किंवा स्टंप्स्च्या बुंध्यात चेंडू टाकू शकतो. तसेच स्टंप्स्पासून वीस-पंचवीस फुटांवर चेंडू आपटून तो फलंदाजाच्या डोक्यापर्यंत उडवू शकतो. ओव्हरपिच्ड् चेंडूस तसेच किंचित आखूड टप्प्याच्या चेंडूसही गडी बाद होऊ शकतात. चेंडूच्या गतीमध्ये वदल करण्यासही त्यास पुष्कळ वाव असतो. एखादा चेंडू मध्यम गतीने व फिरवूनसुद्धा तो टाकू शकतो.

द्रुतगती गोलंदाजास खेळपट्टी जर मदत करीत असेल तर त्याचा पुरेपूर फायदा गोलंदाजाने उठविला पाहिजे. चेंडूच्या वेगावर अधिक भर देऊन त्याने फलंदाजास नामोहरम करावयास हवे. परंतु खेळपट्टी चेंडूच्या गतीला फारच अडथळा आणीत असेल किंवा चेंडू मंद गतीने पुढे जात असतील तर गोलंदाजाने आखूड टप्प्याचे चेंडू टाकण्याचे टाळले पाहिजे.

द्रुतगती गोलंदाजी करावयाचे हे केवळ शारीरिक कष्टाचे काम नाही. गडी बाद करण्यासाठी गोलंदाजास शक्तीचा तसेच युक्तीचाही उपयोग करावा लागतो. शिवाय अतोनात कष्ट व खडतर प्रयत्न हे त्याचे ब्रीद असते. यात अपयश आले तर त्यास ते पचवावे लागते आणि पुढे त्याचा खडतर प्रयत्न चालूच राहतो.

द्रुतगती गोलंदाज होण्यास तुम्हांस फारच लांबचा पल्ला गाठावयाचा आहे. पण प्रयत्न करण्यास कोणती हरकत आहे? आणि तुमच्या प्रयत्नास यश आले तर त्यात तुम्हांस क्रिकेटच्या साऱ्या वैभवाचा साठा गवसेल !

१७

उपयुक्त सूचना

छोट्या मित्रांनो, तुमचे रविवारचे सामने सुरू झाले का? यंदा सामन्यात तुम्ही भरघोस यश मिळविले पाहिजे. गेल्या तीन वर्षांचा अनुभव व तपश्चर्या तुमच्या पाठीशी आहे. तुमची गोलंदाजी जशी प्रेक्षकांना मनमोहक तशी फलंदाजांना धोकादायक वाटली पाहिजे, इतकेच नव्हे तर तुमच्या प्रभावी गोलंदाजीमुळे खेळावयास येणाऱ्या फलंदाजांमध्येसुद्धा घबराट निर्माण झाली पाहिजे. तरच तुम्ही गोलंदाजीची कला अवगत केली असे मी म्हणेन.

आज मी तुम्हांस गोलंदाजीबद्दल काही मुद्दे स्पष्ट करून सांगणार आहे. या मुद्यांपैकी काही नवीन असतील तर काही तुम्ही सरावात कळत न कळत अंमलात आणीत असाल.

गोलंदाजी करताना शरीराच्या अवयवांचे एकमेकांस सहकार्य लागते. सहकार्य देण्यास शरीराचा प्रत्येक अवयव कार्यक्षम असला पाहिजे. शरीराचा प्रत्येक अवयव कार्यक्षम राहण्यासाठी तुम्ही रोज काहीतरी व्यायाम करावा. या व्यायामाने शरीराचे स्नायू कडक न होता त्यांत जोम आला पाहिजे. पळण्याचा व्यायामही आवश्यक आहे. कारण गोलंदाजी करताना धावावे लागते. दम वाढविण्यासही पळण्याच्या व्यायामाचा उपयोग होतो.

क्रिकेटचा मोसम नसेल त्या वेळी दुसरा कोणता तरी खेळ खेळावा. इतर खेळांचाही क्रिकेट खेळण्यास अप्रत्यक्षपणे उपयोग होतो. क्रिकेट

मोसमात रोज निदान दहा मिनिटे, फलंदाज खेळत नसताना, गोलंदाजीचा सराव करावा.

तुमच्या गोलंदाजीची धाव कमीअधिक करावयाची असेल किंवा तुमच्या गोलंदाजीच्या पद्धतीत बदल करावयाचा असेल किंवा गोलंदाजीचा प्रकार बदलावयाचा असेल तर ते क्रिकेट मोसमाच्या सुरवातीलाच करावे. काही कारणांमुळे असा बदल आवश्यक असतो. पण गोलंदाजीच्या पद्धतीत वारंवार बदल केल्याने मात्र नुकसान होते. गोलंदाजी टाकण्याच्या प्रकारात बदल अगदी क्वचितच करावा.

गोलंदाजी टाकताना वातावरण, वारा, खेळपट्टी व फलंदाज यांचा अभ्यास करा. मग फलंदाजास बाद करण्यासाठी विचारपूर्वक योजना आखा. चेंडू टाकण्यास धाव घेण्यापूर्वी कोणता चेंडू टाकावयाचा ते निश्चित करा. धाव घेताना चेंडूचा टप्पा कोठे टाकावयाचा व चेंडू कोणत्या बाजूस वळवावयाचा याचे स्वच्छ चित्र तुमच्या मनश्चक्षूंपुढे उभे असले पाहिजे. तसेच चेंडूचा टप्पा जेथे टाकावयाचा आहे, त्या जागी सुरवातीपासून शेवटपर्यंत लक्ष पाहिजे.

'नो बॉल' टाकल्यामुळे गोलंदाजाचा आत्मविश्वास डळमळित होतो. त्याचे तो चेंडू टाकण्याचे कष्ट वाया जातात. म्हणून सरावात व सामन्यात कधीही 'नो बॉल' टाकू नका. यासाठी पावले मोजून धावेची खूण करा. धावण्याची लांबी व पद्धत एकच ठेवा. सरावात 'नो बॉल' पडल्यास धावेची लांबी त्या प्रमाणात वाढवा.

आपल्या ताकतीबाहेर कधीच गोलंदाजी करू नका. त्यामुळे चेंडू टाकताना शरीराचा तोल जाईल व चेंडू वेडावाकडा पडेल.

आखूड टप्प्यापेक्षा ओव्हरपिच्ड् चेंडू बरा. तसेच चेंडू लेग्‌ला टाकण्यापेक्षा ऑफ्‌ला टाकलेला बरा.

क्षेत्ररचनेप्रमाणे गोलंदाजी करा. ऑफ्‌ला अधिक क्षेत्ररक्षक ठेवून सतत लेग्‌ला चेंडू टाकणे चुकीचे ठरेल. तसेच फलंदाजाचा चांगला फटका अडविण्यासाठी त्या जागी क्षेत्ररक्षक जरूर ठेवा.

चेंडू टाकल्यावर झेल पकडण्यासाठी, चेंडू अडविण्यासाठी व फलंदाजास धावबाद करण्यासाठी तयार राहा. तसेच फलंदाजास धावबाद

करण्यासाठी क्षेत्ररक्षकाने चेंडू फेकल्यास तो अडविण्यास व फलंदाजास धावबाद करण्यास स्टंप्स्च्या मागे चटकन जा.

तुमच्या गोलंदाजीवर झेल सुटला तर त्रागा करू नका. क्षेत्ररक्षकास वेडेंवाकडें बोलू नका. त्याला रागावून काहीच फायदा होणार नाही. उलट तुम्ही व क्षेत्ररक्षक दोघेही नाउमेद व्हाल. म्हणून झेल सुटल्यास क्षेत्ररक्षकाचा दोष पोटात घालून त्यास धीर द्या, म्हणजे झेल पुन्हा उडाल्यास तो झेलण्याची शक्यता राहील.

तुम्ही एकटे गोलंदाजी करीत असला तरी इतर दहा क्षेत्ररक्षक फलंदाजास बाद करण्यात भाग घेत असतात हे विसरू नका. क्षेत्ररक्षकांच्या सहाय्याची व सहकार्याची गडी बाद करण्यास आवश्यकता असते. उत्कृष्ट यष्टिरक्षक तर तुमच्यात आत्मविश्वास निर्माण करू शकतो. तुमच्या गोलंदाजीस वळण लावू शकतो. तुमची गोलंदाजी अधिक प्रभावी करू शकतो.

तुम्हांस गडी बाद करता आला नाही तर नाउमेद होऊ नका, धीर सोडू नका. तसेच एक गडी बाद केला तर हुरळून जाऊ नका.

प्रतिपक्षाचे सर्व गडी तुम्ही एकट्यानेच बाद करावेत असा आग्रह धरू नका. संघातील सर्व गोलंदाजांनी मिळून प्रतिपक्षाचे सर्व गडी बाद करून विजय मिळवावयाचा आहे हे लक्षात ठेवा. गोलंदाजाने गडी बाद केले म्हणजेच त्याने उत्कृष्ट गोलंदाजी केली असे समजणे चुकीचे आहे. काही वेळा गोलंदाजास एकही गडी बाद करता येत नाही. परंतु त्याच्या उत्कृष्ट गोलंदाजीमुळे दुसऱ्या बाजूच्या गोलंदाजास गडी बाद करणे सोपे जाते.

एखादी जोडी जमली किंवा एखादा वरच्या क्रमांकावरचा फलंदाज व शेवटचा फलंदाज यांची जोडी जमली आणि त्यांना शॉर्ट् रन्स् घेण्यात यश मिळत असले तर गोलंदाज फारच नाउमेद होतो. अशा वेळी योग्य क्षेत्ररचना ठेवून प्रथम धावा थांबवा व नंतर फलंदाजास बाद करण्याचा प्रयत्न करा.

गोलंदाजावर कोणताही कठीण प्रसंग आला तरी त्याने आपण आखलेल्या योजनेस चिकटून राहून ती अमलात आणण्याचा कसोशीने प्रयत्न करावा.

उत्कृष्ट गोलंदाजी करून संघनायकाचा आत्मविश्वास मिळवा. त्यातच सर्वांचे हित आहे.

फलंदाज बाद आहे असे तुम्हांला वाटले तर पंचाकडे दाद जरूर मागा, पण पंचाने फलंदाजास नाबाद ठरविल्यास त्या पंचावर कोणत्याही प्रकारे अविश्वास न दाखविता त्याचा निर्णय मान्य करा.

सरावाचे जाळे ही गोलंदाजाची प्रयोगशाळा आहे. निरनिराळे चेंडू टाकून त्याचे काय परिणाम होतात हे शोधून काढावे. इतरांपेक्षा निराळा किंवा आपला स्वत:चा एक विशिष्ट चेंडू शोधून काढावा. त्यावर प्रभुत्व मिळवावे आणि मग त्याचा सामन्यात उपयोग करावा.

येत्या रविवारी तुम्ही सामना खेळणार आहात ना? मग आपण रविवारी सामना झाल्यावर गप्पा मारू या.

१८

फलंदाजाचे स्वभावदोष

छोटया मित्रांनो, आज रविवार, खेळलात का सामना ? वा ! सहज जिंकलात का? शाबास! परंतु तुम्ही गोलंदाजी कशी केलीत? फलंदाजाच्या शैलीवर तुम्ही आपल्या गोलंदाजीच्या कौशल्याने मात करण्याचा प्रयत्न केलात का ? अचूक टप्प्यावर चेंडू टाकलेत का ? चेंडू पाहिजे तितके हवेत झुकविलेत का ? आणि पाहिजे तितके वळविलेत का ? चेंडूचा मार्ग, उंची व गती यांत वारंवार योग्य बदल घडविलात का ? कौशल्यपूर्ण गोलंदाजी करताना खेळपट्टीचा अभ्यास करून तिला साजेशी गोलंदाजी केलीत का ? फलंदाजाच्या फलंदाजीतील दोष हेरून व त्या दोषांचा फायदा घेऊन योजनापूर्वक गोलंदाजी केलीत का ? या प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्यास मी उत्सुक आहे. तुम्ही गडी बाद कसे केलेत ते एकेकाने सांगा पाहू.

(१) " आघाडीचा फलंदाज फॉर्वर्ड् डिफेन्सिव्ह् स्ट्रोक् करताना आपला पुढचा किंवा डावा पाय अर्धवट पुढे टाकीत होता. त्यास किंचित आखूड टप्प्यावर वेगाने तीन आउटस्विंग् टाकले. ते तो मागे पाय नेऊन खेळला. चौथा चेंडू मी किंचित उंची देऊन आउटस्वर्व्ह् केला. त्या चेंडूचा टप्पा किंचित पुढे व मधल्या स्टंप्च्या रेषेत पडला. फलंदाज चटकन पुढे खेळला आणि त्याचा झेल स्लिप्मध्ये गेला. "

" फलंदाजाच्या तांत्रिक दोषाचा फायदा घेतला. "

(२) " फलंदाज पुढे पाय टाकून व्यवस्थेशीर खेळत होता, परंतु

बॅकवर्ड् डिफेन्सिव्ह् स्ट्रोक करताना तो अगोदर स्टंप्स्मध्ये येऊन उभा राहत असे आणि मग ऑफ्स्टंप्च्या बाहेरून बॅट खाली चेंडूवर तिरपी आणीत होता. मी त्याला चार चेंडू वेगाने टाकले. त्यांतील पहिले दोन तो पुढे पाय टाकून खेळला व दुसरे दोन पाय मागे नेऊन खेळला. चारही चेंडू खेळला तरी तो माझ्या चेंडूच्या वेगाला दबला होता. मी पाचवा चेंडू ऑफ्स्टंप्च्या किंचित बाहेर गुडलेंग्थ् स्पॉटवर टाकला आणि चेंडूचा वेग कमी करून मोठा इन्स्विंग् केला. फलंदाज मागे खेळला व पायचीत झाला."

"वेगाला घाबरला व अचूकतेला डळमळला!"

(३) ऑफ्स्टंप्च्या रेषेत मी लेट् इन्स्विंग् टाकला. तो चांगलाच 'डीप' झाला. फलंदाज पुढे खेळला आणि त्याचा झेल शॉर्ट्लेग्ला गेला."

"फलंदाजाचे कौशल्य अपुरे पडले."

(४) "फलंदाज चांगलेच फटके मारीत होते त्या वेळी मला गोलंदाजी मिळाली. माझ्या पहिल्या दोन चेंडूंना फलंदाजाने फॉर्वर्ड् ड्राइव्हच्या सहाय्याने दोन चौकार मारले. नंतर मी अधिक वेगाने किंचित आखूड टप्प्यावर व ऑफ्स्टंप्च्या रेषेत तीन इन्कटर्स् टाकले. ओव्हर्मधील शेवटचा चेंडू ऑफ्स्टंप्च्या बाहेर गुडलेंग्थ् टप्प्यावर आउटकट् केला. फलंदाजाने आणखी एक चौकार मारण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा झेल शॉर्ट् थर्डमॅन्ला गेला."

"पूर्वी मारलेल्या चौकारांची मस्ती गेली नव्हती."

(५) "नुकताच खेळावयास आलेला फलंदाज माझ्या आउटकट् चेंडूला त्रिफळाबाद झाला. टप्पा होता लेग्स्टंपच्या रेषेत आणि गुडलेंग्थ् स्पॉटवर. फलंदाजाने पाय पुढे टाकून बॅट लेग्स्टंप्च्या रेषेत आणली. परंतु चेंडू वळला आणि ऑफ्स्टंप् उडाली."

"कौशल्याने मात केली."

(६) "फलंदाज टोलेबाजी करीत होता. मी ऑफ्स्टंप्च्या रेषेत अधिक उंची देऊन किंचित आखूड टप्प्यावर एक गुग्ली चेंडू टाकला. फलंदाजाने फटका मारण्यास बॅट उगारली. परंतु चेंडूचा टप्पा पडताना

त्याने आपला बेत बदलून चेंडू ढकलण्याचा प्रयत्न केला आणि चेंडू अलगद माझ्या हातात आला ! "

" द्विधा मन. "

(७) " फलंदाज डावखुरा आणि मीही डावखुरा. ऑफ्स्टंप्च्या बाहेर चेंडूचा टप्पा टाकून चेंडू बराच आत वळविला. तो चेंडू डावखुऱ्या फलंदाजाने पाय मागे नेऊन मारण्याचा प्रयत्न केला. परंतु चेंडू पॅड्स्ना लागून स्टंप्वर आदळला. "

" विचित्रच ! पण असे बऱ्याच वेळा होते ! "

(८) " फलंदाज पुलस्ट्रोक चांगला मारीत होता आणि धावा जमवीत होता. त्याला तो स्ट्रोक् मारू न देण्याचे मी ठरविले. परंतु त्याने गुडलेंग्थ् लेग्ब्रेक चेंडूला पुलस्ट्रोक मारलाच आणि मिड्विकेटला झेल उडविला ! "

" धावांचा लोभ. "

(९) " माझ्या ऑफ्ब्रेक चेंडूला त्याने जवळजवळ षट्कारच मारला होता. पण क्षेत्ररक्षकाने एका हाताने झेल चांगलाच झेलला हं ! "

" क्षेत्ररक्षकाचे कौशल्य ! "

(१०) " एक गडी धावबाद झाला. "

उत्तम ! गडी बाद करण्यासाठी तुम्ही केवळ गोलंदाजीच्या कौशल्याचा उपयोग केला नाही तर फलंदाजीतील दोष हेरून योजनापूर्वक गोलंदाजी करण्याचा प्रयत्न केला, इतकेच नव्हे तर तुम्ही फलंदाजांच्या स्वभावदोषांचा फायदा घेऊन त्यांस चुकीचे फटके मारण्यास उद्युक्त केलेत. फलंदाजांचा स्वभावदोष त्यांच्या नाशास कसा कारणीभूत होतो याविषयी मी तुमच्याशी दर शनिवारी संध्याकाळी बोलेन.

× × ×

फलंदाजास अस्थिर करावे

गोलंदाजाने चेंडू हातातून सोडल्यापासून ते तो चेंडू खेळपट्टीवर पडेपर्यंत फलंदाजाची नजर चेंडूवर असते. इतकेच नव्हे तर चेंडूला बॅटीने टोलविताना आणि टोलविल्यानंतरसुद्धा फलंदाजाची नजर चेंडूवर पाहिजे.

चेंडू हवेत असताना तो फलंदाज निरखून पाहतो आणि त्या चेंडूचा टप्पा कोठे पडेल, तो टप्पा पडून कसा व किती वळेल व किती वर येईल याचा अंदाज फलंदाज करीत असतो आणि या अंदाजावरून त्या चेंडूस कोणता फटका मारावयाचा याबद्दलचा निर्णय घेण्याच्या बेतात तो असतो. परंतु चेंडू प्रत्यक्ष कोठे पडतो, किती व कसा वळतो व टप्पा पडून किती वर येतो, हे निरखून पाहूनच फलंदाज चेंडूस कोणता फटका मारावयाचा याबद्दलचा आपला निर्णय बरोबर आहे याची खात्री करतो आणि आपला निर्णय अंमलात आणतो.

चेंडू निरखून पाहणे, चेंडूबद्दलचा अंदाज करणे आणि फटक्याबद्दलचा निर्णय घेणे या गोष्टी फलंदाज क्षणार्धात अचूकतेने करू शकतो. परंतु ते केव्हा ? ज्या वेळी फलंदाजाचे मन चेंडूवर एकाग्र झाले असेल, स्थिर असेल किंवा समतोल असेल त्या वेळी तो या गोष्टी कार्यक्षमतेने करू शकेल. ज्या वेळी फलंदाजाचे मन स्थिर आणि समतोल नसेल त्या वेळी त्याचा चेंडूबद्दलचा अंदाज व त्या चेंडूला मारावयाच्या फटक्याबद्दलचा निर्णय चुकण्याची शक्यता राहील. तेव्हा फलंदाजाचे मन अस्थिर करून, त्याचा समतोलपणा नाहीसा करून आणि एकाग्रता ढळवून त्यास त्याचा चेंडूबद्दलचा अंदाज आणि फटका मारण्याबद्दलचा निर्णय चुकविण्यास भाग पाडावयास हवे.

माणूस मूळचाच चंचल असतो. त्यातच त्याच्या स्वभावदोषामुळे तो अधिक अस्थिर होतो. भीती, अहंकार, गर्व, आत्मप्रौढी, फाजील आत्मविश्वास, घमेंड, मोह, लोभ, वगैरे सहजप्रवृत्ती, भावना किंवा स्वभावदोष यांपैकी काही फलंदाजामध्ये अतिरेकाने असू शकतात. या स्वभावदोषांचा फायदा घेऊन फलंदाजास अस्थिर करावयाचे आहे. आणि तो एकदा अस्थिर झाला, की त्याचा चेंडूबद्दलचा अंदाज व फटक्याबद्दलचा निर्णय चुकविणे सोपे जाईल. तसेच फलंदाज अस्थिर झाला की गोलंदाजाने फलंदाजाच्या तांत्रिक दोषांवर बोट ठेवून आपला उत्कृष्ट चेंडू टाकला पाहिजे. तेव्हा फलंदाजास अस्थिर करून त्यास बाद करण्याची कला तुम्ही आत्मसात केली पाहिजे.

काही वेळा फलंदाज स्वतःच काही कारणांमुळे अस्थिर झालेला असतो. अशा वेळी गोलंदाजाने फलंदाज अस्थिर आहे, हे प्रथम ओळखले पाहिजे.

म्हणजे गोलंदाजाने ,फलंदाजाच्या हालचालींवरून, त्याच्या खेळावरून आणि त्याच्या चेहऱ्यावरील हावभावांवरून तो स्थिर आहे की अस्थिर आहे, त्याला आत्मविश्वास आहे की त्याचा आत्माविश्वास डळमळित झाला आहे, गर्वाने धुंद झाला आहे की समतोल आहे हे ओळखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. फलंदाज अस्थिर असेल, त्याची एकाग्रता ढळली असेल, त्याचा आत्मविश्वास डळमळित झाला असेल किंवा तो गर्वाने फुगला असेल तर गोलंदाजाचे आपोआपच फावेल. परंतु फलंदाज आत्मविश्वासाने खेळत असेल तर गोलंदाजाने त्याचा आत्मविश्वास डळमळित केला पाहिजे. तो स्थिर आणि समतोल असेल तर त्यास गोलंदाजाने अस्थिर केले पाहिजे. × × ×

फलंदाजाची काळजी व भीती

काही वेळा फलंदाजास खेळताना कशाची तरी भीती वाटते, काही कारणामुळे त्याचा आत्मविश्वास डळमळित होतो किंवा तो पराभूत वृत्तीने खेळतो. यामुळे साहजिकच फलंदाज अस्थिर किंवा बेचैन होतो. बेचैन झालेल्या फलंदाजाचा चेंडूबदलचा अंदाज व फटक्याबद्दलचा निर्णय चुकू शकतो हे तुम्हास गेल्या शनिवारी पटवून दिले.

आपण बाद होऊ, आपण लवकर बाद झालो तर आपला संघ हरेल किंवा आपली पुढच्या सामन्यासाठी निवड होणार नाही अशा विचाराने काही वेळा फलंदाज भयभीत होतो. अर्थात ही भीती फलंदाजाने स्वत:च निर्माण केलेली असते.

काही फलंदाजांचा खेळावयास जाण्यापूर्वीच आत्मविश्वास डळमळित झालेला असतो. अनेक क्रिकेटपटू फलंदाजीस गेल्यावर सुरवातीस आत्म-विश्वासाने व स्थिर मनाने खेळू शकत नाहीत. काही फलंदाजांस द्रुत-गती गोलंदाजीची तर काहींना मंदगती फिरकी गोलंदाजीची भीती वाटते. पूर्वीच्या एखाद्या सामन्यात ज्या गोलंदाजाने बाद केले होते त्याची गोलंदाजी खेळण्यास काही फलंदाजांस आवडत नाही. काही फलंदाज दोन्ही बाजूंच्या गोलंदाजांपैकी एकाची गोलंदाजी खेळण्यास नाखूष असतात. एखाद्या नावाजलेल्या गोलंदाजास तोंड देण्यास काही फलंदाज घाबरतात. खेळपट्टीवर वेडेवाकडे चेंडू उडत असतील किंवा खेळपट्टीवर

पाऊस पडला असेल, ती वाळत असेल किंवा गोलंदाजास अतिशय मदत करीत असेल तर काही फलंदाज दबून जातात. दुसऱ्या बाजूने फलंदाज पटापट बाद होत असतील, संघ अडचणीत असेल किंवा हरण्याच्या मार्गावर असेल, तर काही फलंदाजांचे हातपाय गळून जातात. तेव्हा खेळातील अप्रिय किंवा धोकादायक घटना आणि तंग वातावरण यांचा काही फलंदाजांवर अनिष्ट परिणाम होऊन ते अस्थिर होतात आणि त्यामुळे त्यांना पराभूत वृत्तीने खेळणे भाग पडते.

फलंदाज अस्थिर झाल्यास, त्याचा आत्मविश्वास डळमळल्यास, त्याचा धीर सुटल्यास किंवा तो पराभूत वृत्तीने खेळू लागल्यास गोलंदाजाने ते चटकन ओळखून त्यास बाद करण्याचा प्रयत्न करावयास हवा. परंतु फलंदाज न भिता आणि न डगमगता धीराने खेळत असेल तर मात्र गोलंदाजाने त्याचा आत्मविश्वास डळमळित करून आणि त्याच्या भोवती तंग वातावरण निर्माण करून त्यास अस्थिर केले पाहिजे.

गोलंदाजाने आपल्या कौशल्याने फलंदाजाच्या शैलीवर मात करून त्यास अस्थिर करण्याचा राजमार्ग प्रथम अवलंबिला पाहिजे. त्याने आपले उत्कृष्ट चेंडू टाकून फलंदाजास आश्चर्यचकित करावयास हवे. अनपेक्षित चेंडू तर फलंदाजाचे काळ ठरतात. काही वेळा गोलंदाजाची कला, अनपेक्षित व उत्कृष्ट चेंडू आणि योजनापूर्वक गोलंदाजी फलंदाजास चेंडूबद्दल विचार करण्यास भाग पाडते. ज्या वेळी फलंदाज पुढील चेंडूबद्दल काळजी करतो त्या वेळी तो अस्थिर झाला आहे असे समजण्यास हरकत नाही.

गोलंदाजाने आपल्या अचूकतेने, कौशल्याने व आत्मविश्वासाने खेळणाऱ्या फलंदाजाच्या फटकेबाजीस किंवा त्याच्या आवडत्या फटक्यास संपूर्ण आळा घातल्यास फलंदाज अस्थिर होतो.

फलंदाजाचा कमजोर व दोषयुक्त फटका शोधून काढावा आणि तो फटका मारण्यास फलंदाजास भाग पडेल अशा ठिकाणी चेंडूचा मारा करावा. अशा वेळी आत्मविश्वासाने खेळणारा फलंदाज तो फटका काळजीपूर्वक व सावधगिरीने मारण्याचा प्रयत्न करील. फलंदाजामध्ये सावधगिरी आणि काळजी निर्माण केल्यावर त्यास अनपेक्षित चेंडू गोत्यात आणू शकेल.

असे समजा की फॉर्वर्ड् शॉर्ट् लेग्ला एकही क्षेत्ररक्षक नाही आणि ऑफ्ब्रेक चेंडूला फलंदाजाचा झेल तेथेच उडाला. तेव्हा गोलंदाजाने दोन फॉर्वर्ड् शॉर्ट लेग्ला आणि एक बॅकवर्ड् शॉर्ट लेग्ला क्षेत्ररक्षक ठेवले. पुढचा चेंडू लेग्स्टंप्च्या रेषेत येईल व तो आपल्याला जपून खेळावयास पाहिजे असे फलंदाजास साहजिकच वाटेल. याचा अर्थ असा की आपला झेल लेग्ला उडेल व आपण बाद होऊ अशी भीती फलंदाजास वाटते. फलंदाजास बाद करण्यास ही संधी उत्तम असते. अशा वेळी गोलंदाजाने गुडलेंग्थ् स्पॉट्वर ऑफ्स्टंप्च्या रेषेत बाहेर जाणारा अनपेक्षित चेंडू टाकला तर फलंदाजाचा झेल स्लिप्स्मध्ये जाईल.

क्षेत्ररचनेत योग्य बदल घडवून आणल्यावरसुद्धा फलंदाज बेचैन होऊ शकतो. ज्या ठिकणी फलंदाजाचा पूर्वी झेल उडाला आहे, ज्या ठिकाणी फलंदाज उत्कृष्ट व आपल्या आवडीचा फटका मारतो, त्या ठिकाणी क्षेत्ररक्षक ठेवल्यास फलंदाज अस्थिर होऊ शकतो. योग्य क्षेत्ररचना करून फलंदाजाच्या फटक्याची नाकेबंदी केल्यास किंवा त्याच्या भोवती क्षेत्ररक्षकांचे कडे करून त्याच्यावर दबाव आणल्यास तो अस्थिर होतो.

सिली मिड् ऑफ्ला आणि सिली मिड्ऑन्ला क्षेत्ररक्षक ठेवल्यावर काही कच्चे फलंदाज दबून जातात व अस्थिर होतात. अशा वेळी ते अत्यंत काळजीपूर्वक, सावधगिरीने व बचावात्मक खेळतात किंवा बेफाम होऊन वाटेल तसा चेंडू मारण्याचा ते प्रयत्न करतात व आपला डाव फेकून देतात.

तेव्हा फलंदाजाचा आत्मविश्वास डळमळित व्हावा, त्याचा धीर सुटावा किंवा तो अस्थिर व्हावा म्हणून गोलंदाजाने त्यास आपल्या गोलंदाजीबद्दल काळजीपूर्वक विचार करावयास लावावे, त्यास सावधगिरीने व बचावात्मक खेळावयास भाग पाडावे, त्याच्या फलंदाजीच्या तांत्रिक दोषांवर आघात करावेत आणि त्यास काळजी निर्माण करणारी क्षेत्ररचना करावी. एकदा फलंदाज अस्थिर झाला की त्याच्या तांत्रिक दोषांवर बोट ठेवून गोलंदाजाने आपल्या उत्कृष्ट आणि अनपेक्षित चेंडूने त्यास बाद करावे.

× × ×

फलंदाजाचा अहंकार

अहंकार किंवा मीपणा, गर्व, आत्मप्रौढी, फाजील आत्मविश्वास, घमेंड यांमुळे मनाचा समतोलपणा नाहीसा होतो. अहंकारामुळे फलंदाजाचे दोन प्रकारांनी नुकसान होते. एक : तो गोलंदाजास कमी लेखतो आणि त्यामुळे बेसावधपणे खेळतो. दुसरे : फलंदाजाच्या अहंमन्यतेला थोडा जरी धक्का लागला तरी तो गांगरून जातो.

काही छोटे फलंदाज फलंदाजीस जाण्यापूर्वीच ' आपण अमुक इतक्या धावा काढणार आहोत, अमक्या गोलंदाजास चोपणार आहोत ' अशा बढाया मारतात. अशा बढाया मारल्यामुळे त्यांना सत्य परीस्थितीची जाणीव होत नाही व ते फलंदाजीस आल्यावर लवकरच फसतात.

सुरुवातीला एखादा चेंडू चांगल्या रीतीने खेळल्यावर, वैयक्तिक पन्नास किंवा शंभर धावा झाल्यावर काही फलंदाजांचा अहंकार बळावतो. फलंदाजाच्या दृष्टीने कोणतीही चांगली गोष्ट होत असल्यास त्याचा गर्व वाढण्याचा संभव असतो.

साधारण प्रतीचे चेंडू टाकून फलंदाजास बेसावध करता येईल. एकदा फलंदाज बेसावध झाला की त्यास उत्कृष्ट किंवा अनपेक्षित चेंडूने किंवा अधिक गतीच्या किंवा अधिक फिरकीच्या चेंडूने बाद करता येईल.

फलंदाजास त्याचा आवडता फटका मारण्यासाठी चेंडू द्यावेत. त्यामुळे तो स्वतःवर बेहद्द खुश होईल आणि बेसावध होईल. त्या वेळी गोलंदाजाने चुकीच्या चेंडूला त्याचा आवडता फटका मारण्यास फलंदाजास उद्युक्त करावे.

अहंमन्य फलंदाज गोलंदाजाने दिलेले आव्हान कधीही नाकारणार नाही. निर्धाव ओव्हर टाकण्याचा निर्धार गोलंदाजाने केला असल्यास तो धोका पत्करून एखादी तरी धाव काढण्याचा निश्चित प्रयत्न करील. क्षेत्ररचनेत जाणूनबुजून ठेवलेल्या पोकळीतून तो चुकीचा चेंडू मारण्याचा प्रयत्न करणारच.

अहंमन्य फलंदाजास त्याचे आवडते फटके मारू दिले नाहीत, त्याला दोनचार उत्कृष्ट चेंडूंनी चकविले, त्याच्या तोंडासमोर क्षेत्ररक्षक ठेवले

तर त्यास अपमानास्पद वाटते आणि तो गांगरून जातो. शेवटी त्याचा चेंडूबद्दलचा अंदाज आणि फटक्याबद्दलचा अंदाज चुकतो.

अहंकार बळावलेला फलंदाज सहज बेसावध होतो. कठीण परीस्थितीत गांगरून जातो आणि आव्हान स्वीकारताना त्याचा तोल राहत नाही. × × ×

मोहाचे जाळे

मोह फलंदाजाच्या नाशास कारणीभूत होतो. मोहामुळे फलंदाज गोलंदाजाच्या जाळ्यात सहज अडकला जातो.

काही फलंदाजांना आपला आवडता फटका मारण्याची फारच हौस असते. ते तो फटका चांगला मारतातही. परंतु काही वेळा नको त्या चेंडूला तो फटका मारण्याचा मोह त्यांना आवरत नाही.

नेहमीची उंची देऊन तीनचार चेंडू टाकल्यावर एखादा चेंडू थोडी अधिक उंची देऊन टाकला तर तो चेंडू जोराने मारण्याचा मोह फलंदाजास होतो. हाच अधिक उंचीचा चेंडू चांगल्या उंचीचा असल्यास फलंदाजाचा चेंडूबद्दलचा अंदाज चुकेल.

नेहमीच्या वेगाने तीनचार चेंडू टाकल्यावर एखादा कमी वेगाने चेंडू टाकल्यास फलंदाजास तो चेंडू खेळण्यास सोपा वाटून त्यास जोराने फटका मारण्याचा मोह होईल. परंतु हा कमी वेगाचा चेंडू डोळ्यात धूळ टाकणारा असला पाहिजे. अशा चेंडूस फलंदाज झेल देण्याचा संभव असतो.

एखाद्या फुलटॉस, आखूड टप्प्याच्या किंवा अगदी सोप्या चेंडूससुद्धा काही वेळा फलंदाज भुलतो. असा चेंडू खेळताना त्याच्या मनाचा तोल जातो व तो आपली सर्व शक्ती एकवटून फटका मारतो. अशा वेळी फलंदाजाचा मानसिक व शारीरिक तोल जाऊन त्याचा फटका कच्चा किंवा चुकीचा बसतो.

क्षेत्ररचनेत जाणूनबुजून पोकळी ठेवली तरी मोहास बळी पडणारा फलंदाज त्या पोकळीतून चेंडू मारण्याचा प्रयत्न करील. अशा पोकळीतून चुकीचा चेंडू मारण्यास फलंदाजास भाग पाडावे. तसेच अशा

फलंदाजाचा अहंकार

अहंकार किंवा मीपणा, गर्व, आत्मप्रौढी, फाजील आत्मविश्वास, घमेंड यांमुळे मनाचा समतोलपणा नाहीसा होतो. अहंकारामुळे फलंदाजाचे दोन प्रकारांनी नुकसान होते. एक : तो गोलंदाजास कमी लेखतो आणि त्यामुळे बेसावधपणे खेळतो. दुसरे : फलंदाजाच्या अहंमन्यतेला थोडा जरी धक्का लागला तरी तो गांगरून जातो.

काही छोटे फलंदाज फलंदाजीस जाण्यापूर्वीच ' आपण अमुक इतक्या धावा काढणार आहोत, अमक्या गोलंदाजास चोपणार आहोत ' अशा बढाया मारतात. अशा बढाया मारल्यामुळे त्यांना सत्य परीस्थितीची जाणीव होत नाही व ते फलंदाजीस आल्यावर लवकरच फसतात.

सुरुवातीला एखादा चेंडू चांगल्या रीतीने खेळल्यावर, वैयक्तिक पन्नास किंवा शंभर धावा झाल्यावर काही फलंदाजांचा अहंकार वळावतो. फलंदाजाच्या दृष्टीने कोणतीही चांगली गोष्ट होत असल्यास त्याचा गर्व वाढण्याचा संभव असतो.

साधारण प्रतीचे चेंडू टाकून फलंदाजास बेसावध करता येईल. एकदा फलंदाज बेसावध झाला की त्यास उत्कृष्ट किंवा अनपेक्षित चेंडूने किंवा अधिक गतीच्या किंवा अधिक फिरकीच्या चेंडूने बाद करता येईल.

फलंदाजास त्याचा आवडता फटका मारण्यासाठी चेंडू द्यावेत. त्यामुळे तो स्वतःवर बेहद्द खुश होईल आणि बेसावध होईल. त्या वेळी गोलंदाजाने चुकीच्या चेंडूला त्याचा आवडता फटका मारण्यास फलंदाजास उद्युक्त करावे.

अहंमन्य फलंदाज गोलंदाजाने दिलेले आव्हान कधीही नाकारणार नाही. निर्धाव ओव्हर टाकण्याचा निर्धार गोलंदाजाने केला असल्यास तो धोका पत्करून एखादी तरी धाव काढण्याचा निश्चित प्रयत्न करील. क्षेत्ररचनेत जाणूनबुजून ठेवलेल्या पोकळीतून तो चुकीचा चेंडू मारण्याचा प्रयत्न करणारच.

अहंमन्य फलंदाजास त्याचे आवडते फटके मारू दिले नाहीत, त्याला दोनचार उत्कृष्ट चेंडूंनी चकविले, त्याच्या तोंडासमोर क्षेत्ररक्षक ठेवले

तर त्यास अपमानास्पद वाटते आणि तो गांगरून जातो. शेवटी त्याचा चेंडूबद्दलचा अंदाज आणि फटक्याबद्दलचा अंदाज चुकतो.

अहंकार बळावलेला फलंदाज सहज बेसावध होतो. कठीण परीस्थितीत गांगरून जातो आणि आव्हान स्वीकारताना त्याचा तोल राहत नाही. × × ×

मोहाचे जाळे

मोह फलंदाजाच्या नाशास कारणीभूत होतो. मोहामुळे फलंदाज गोलंदाजाच्या जाळ्यात सहज अडकला जातो.

काही फलंदाजांना आपला आवडता फटका मारण्याची फारच हौस असते. ते तो फटका चांगला मारतातही. परंतु काही वेळा नको त्या चेंडूला तो फटका मारण्याचा मोह त्यांना आवरत नाही.

नेहमीची उंची देऊन तीनचार चेंडू टाकल्यावर एखादा चेंडू थोडी अधिक उंची देऊन टाकला तर तो चेंडू जोराने मारण्याचा मोह फलंदाजास होतो. हाच अधिक उंचीचा चेंडू चांगल्या उंचीचा असल्यास फलंदाजाचा चेंडूबद्दलचा अंदाज चुकेल.

नेहमीच्या वेगाने तीनचार चेंडू टाकल्यावर एखादा कमी वेगाने चेंडू टाकल्यास फलंदाजास तो चेंडू खेळण्यास सोपा वाटून त्यास जोराने फटका मारण्याचा मोह होईल. परंतु हा कमी वेगाचा चेंडू डोळ्यात धूळ टाकणारा असला पाहिजे. अशा चेंडूस फलंदाज झेल देण्याचा संभव असतो.

एखाद्या फुलटॉस, आखूड टप्प्याच्या किंवा अगदी सोप्या चेंडूससुद्धा काही वेळा फलंदाज भुलतो. असा चेंडू खेळताना त्याच्या मनाचा तोल जातो व तो आपली सर्व शक्ती एकवटून फटका मारतो. अशा वेळी फलंदाजाचा मानसिक व शारीरिक तोल जाऊन त्याचा फटका कच्चा किंवा चुकीचा बसतो.

क्षेत्ररचनेत जाणूनबुजून पोकळी ठेवली तरी मोहास बळी पडणारा फलंदाज त्या पोकळीतून चेंडू मारण्याचा प्रयत्न करील. अशा पोकळीतून चुकीचा चेंडू मारण्यास फलंदाजास भाग पाडावे. तसेच अशा

फलंदाजास क्षेत्ररक्षकाच्या डोक्यावरून चेंडू मारण्याचा काही वेळा मोह होतो.

तेव्हा चेंडूच्या उंचीत व गतीत बदल करून आणि क्षेत्ररचनेत पोकळी ठेवून फलंदाजासमोर गोलंदाजाने मोहाचे जाळे पसरले पाहिजे.

एकंदरीत भीती, डळमळित आत्मविश्वास, धीर सुटणे, पराभूत वृत्ती, अहंकार, आत्मप्रौढी, घमेंड, गर्व, फाजिल आत्मविश्वास, मोह वगैरे स्वभावदोषांचा फायदा घेऊन गोलंदाजाने फलंदाजास अस्थिर करून त्यास बाद करण्याची योजना आखण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

× × ×

समारोप

छोटया मित्रांनो गेल्या चार क्रिकेटच्या मोसमांत मी तुम्हांला गोलंदाजीची सर्व दालने उघडून दिली. तुम्हीसुद्धा चिकाटीने मन:पूर्वक आणि एकाग्रतेने सराव करून गोलंदाजीची कला आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. यापुढेही गोलंदाजीचा अभ्यास आणि सराव चालूच ठेवा. तसेच चेंडू टाकण्याबाबत प्रयोग चालूच ठेवून अनुभवाचा अमोल ठेवा वाढवीत जा. एक दिवस असा उगवेल की तुमच्या खुबीदार गोलंदाजीमुळे तुम्ही क्रिकेट जगताचे नेत्र दिपवून टाकाल! माझी सदिच्छा आणि आशीर्वाद तुमच्या पाठीशी उभे आहेत! × × ×

दा. क्र. 265 दिनांक ....
विषय किशोर क्र. 265
BVBK-0400286



१९

काही जागतिक विक्रम

एका डावात नऊ किंवा दहा गडी बाद

१. १०-५३, जे. सी. लेकर, (मॅन्चेस्टर, इग्लंड वि. ऑस्ट्रेलिया, १९५६)
२. ९-२८, जी. ए. लोहमॅन्, (जोहॅन्स्बर्ग, इंग्लंड वि. द. आफ्रिका, १८९५-९६)
३. ९-३७, जे. सी. लेकर, (मॅन्स्चेटर, इंग्लंड वि. ऑस्ट्रेलिया, १९५६)
४. ९-६९, जे. एम्. पटेल, (कानपूर, भारत वि. ऑस्ट्रेलिया, १९५९-६०)
५. ९-१०२, एस्. पी. गुप्ते, (कानपूर, भारत वि. वेस्टइंडीज, १९५८-५९)
६. ९-१०३, एस्. एफ्. बार्न्स्, (जोहॅन्स्बर्ग, इंग्लंड वि. द. आफ्रिका, १९१३-१४)
७. ९-११३, एच्. जे. टेफील्ड्, (जोहॅन्स्बर्ग, इंग्लंड वि. द. आफ्रिका, १९५६-५७)
८. ९-१२१, ए. ए. मॅले, (मेल्बर्न्, ऑस्ट्रेलिया वि. इंग्लंड, १९२०-२१)

एका डावात सतरा किंवा अधिक गडी बाद

१. १९-२०, जे. सी. लेकर, (मॅन्चेस्टर, इंग्लंड वि. ऑस्ट्रेलिया, १९५६)
२. १७-१५९, एस्, एफ्. बार्न्स् (जोहॅन्स्वर्ग, इंग्लंड वि. द. आफ्रिका, १९१३-१४)

दोन्ही डावांत हॅट्-ट्रिक्

१. टी. जे. मॅथ्यूज्, (मॅन्चेस्टर, ऑस्ट्रेलिया वि. द. आफ्रिका, १९१२)

• • •

• • •

ंळा मोह

ा पोकळी

पराभूत
स, मोह
अस्थिर
हिजे.

× × ×

गोलं-
पूर्वक
ाचा
वा.
ेवा
ध-
ा